**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.** : रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतकरी यांची भूसंपादनाच्या बाबतीत होणारी फसवणूक आणि वारंवार ओढवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती यामुळे असंतोष वाढणे.

**मु.शी.** : रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतकरी यांची भूसंपादनाच्या बाबतीत होणारी फसवणूक आणि वारंवार ओढवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती यामुळे असंतोष वाढणे यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रायगड जिल्ह्यात विविध प्रकल्पात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी काढलेला मोर्चा, बल्क ड्रग्ज फार्मा पार्क, जे एस डब्ल्यू या खाजगी कंपनीसाठी शासनाने चालवलेले सक्तीचे संपादन, विरार, अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉर या महाकाय व खर्चिक तसेच अनावश्यक प्रकल्पासाठी चाललेले तातडीचे संपादन, त्यासाठी संसदेने २०१३ मध्ये पारित केलेला भूमी संपादन कायदा गुंडाळून सरकारने चालवलेला अन्याय सदर प्रकल्पांना

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील ....

शेतकऱ्यांचा असलेला विरोध, ते रद्द करण्याची मागणी, जिल्ह्यातील वाढते प्रदूषण, भाताखालील क्षेत्र गेल्या वीस वर्षात व सध्याच्या संपादनामुळे दीड लाख एकरने घटणे, त्यामुळे उपजीविका, रोजगार व पर्यावरण यावर होणारा परिणाम, शेतकऱ्यांची सतत होणारी फसवणूक, उद्योगांसाठी यापूर्वी संपादित केलेल्या जमिनी न वापरता पडून रहाणे, त्यामुळे होणारे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान, इको सेन्सिटिव्ह झोन व अभयारण्यालगतचे क्षेत्र संपादित केले जाणे, त्याचे पर्यावरणावरील परिणाम, वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यावर वारंवार ओढवणाऱ्या अतिवृष्टी व पूर, दरडी कोसळणे इ. आपत्ती, त्यामुळे होणारी हानी यामुळे जिल्ह्यात वाढत असलेला असंतोष व यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री. सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, शासनाने दिलेल्या उत्तरामध्ये शेतकरी वर्गाने भूसंपादन प्रक्रियेला विरोध केला आहे या बाबीशिवाय कोणत्याही बाबीचा विचार करण्यात आलेला नाही. फक्त मोबदला या विषयावरच उत्तरामध्ये भूमिका मांडलेली आहे. शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा विचार करताना शेतकऱ्यांना ही जमीन द्यायचीच नाही अशी ठाम भूमिका त्यामध्ये दिसून येत आहे. जेएसडब्ल्यू कंपनीला अजिबात जमीन देणार नाही असा देखील जमीनधारक शेतकरी वर्गाचा निर्णय आहे. शासनाला विविध आंदोलनांमार्फत वेळोवेळी कळविण्यात आले आहे, त्यावर शासनाने कोणतीही भूमिका यामध्ये स्पष्ट केलेली नाही. जेएसडब्ल्यू कंपनीमुळे होणाऱ्या प्रदुषणाला कधीही आळा घालण्यात आला नाही. या प्रदुषणामुळे जमीन नापीक व हवामान प्रदुषित झाल्याबद्दल व ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आणल्याबद्दल महाराष्ट्र शासन जेएसडब्ल्यू कंपनीला अधिक जमीन देऊन बक्षिस देत आहे का ? डॉ. पतंगराव कदम राज्याचे उद्योगमंत्री असताना त्या मतदारसंघातील आमदार, माजी मंत्री मोहन पाटील, मी व माजी सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील अशी एक बैठक तेथे झाली होती. त्यावेळी असा निर्णय देण्यात आला होता की, यापुढे .... हा प्रस्ताव आला होता, हा प्रस्ताव जुना आहे, त्यावेळी डॉ. पंतगराव कदम यांनी शासनाच्या वतीने सांगितले होते की, आम्ही यापुढे जेएसडब्ल्यू कपंनीला देण्यासाठी कोणतीही जमीन शेतकऱ्यांकडून घेणार नाही आणि ती जी मागणी करण्यात आली, त्याला जेएसडब्ल्यू कंपनीने मान्यता दिल्याचे कार्यवृत्त माझ्याकडे आहे आणि आम्ही ते आपल्याकडे देखील दिलेले आहे. आपल्याला त्याची जाणीव आहे. आता पुन्हा जेएसडब्ल्यू कंपनी तेथे जमीन संपादित करीत आहे. मी विविध प्रश्न मांडले आहेत, त्यांची आपल्याकडून उत्तरे देण्यात आलेली आहेत. विरार, अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉर होत आहे. विरार, अलिबाग येथे देखील जमीन संपादित होत आहे. विरार, अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉर हे या भागात होणारे नागरीकरण यासाठी करीत आहोत. आमच्याकडे चौथी मुंबई करायला मागत आहेत. मग असे असताना तुम्ही तेथे इंडस्ट्रियल हब कशासाठी करीत

श्री. जयंत प्र. पाटील ....

आहात ? तुम्ही एकीकडे निवासी सोयीसाठी सिडकोला जागा घेत आहात आणि त्याच ठिकाणी पुन्हा इंडस्ट्रियल झोन करीत आहात. ही तफावत असून आरोग्याला हानीकारक आहे. जेएसडब्ल्यू कंपनीने आतापर्यंत शेतकऱ्यांवर अन्याय केले आहेत. आमची तशा पध्दतीची मागणी आहे. विरार, अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉर झाल्यानंतर १० मिनिटांमध्ये पनवेलला, कल्याणला जाणार आहोत. पनवेलला आज एक कोटी रुपये गुंठा जागेच भाव आहे आणि आज ही जमीन ते मातीमोल किंमतीने घ्यायला मागत आहेत, हे बरोबर नाही. मला ही तफावत काही कळत नाही.

सभापती महोदया, रोहा तालुक्यातील बल्क ड्रग्ज फार्मा पार्क याला आमचा अजिबात विरोध नाही. आम्ही तुम्हाला बोललो आहोत. पण येथे जमीन घेतली आहे. येथे बल्क ड्रग्ज फार्मा पार्क येत आहे म्हणून शेतकऱ्यांकडून कमी दराने ३ वर्षांच्या आधी जमीन घेतली आहे. आता आम्ही त्याचा वाढीव मोबदला मागत आहोत. त्यातील ५० टक्के हिस्सा तेथील शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे. त्यांचे रजिस्ट्रेशन ५ लाख रुपये एकर असे झाले आहे आणि आता जमीन २ कोटी रुपयांनी होणार आहे. त्यामुळे त्या नफ्यातील ५० टक्के हिस्सा शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे. शासनाची भूमिका याबाबत काय आहे, त्यामध्ये शासनाचे पैसे कुठे जाणार आहेत ? दिल्लीच्या, काश्मिरच्या माणसांनी तेथे येऊन जमिनी खरेदी केल्या आहेत. ते त्या जमिनी पिकविणार नाहीत. शेती अजून पिकविली देखील नाही. तरी अशा लोकांच्या संदर्भात शासनाने सहानुभूतिपूर्वक विचार करावा.

सभापती महोदया, तेथील शेतकऱ्यांची दुसरी प्रामुख्याने अशी मागणी आहे आणि जी मी सातत्याने आपल्यापुढे मांडत आहे की, येथे बल्क ड्रग्ज फार्मा पार्क होणार आहे, यामध्ये येणारे उद्योग कोणते आहेत, त्यांना मनुष्यबळ किती लागणार आहे आणि त्यांना क्वॉलिफाईड करण्यासाठी काय करणार आहात हे समजले पाहिजे. उद्योग आले तरी ते काही लगेच होणार नाहीत, त्यासाठी २-३ वर्षे लागणार

श्री. जयंत प्र. पाटील ....

आहेत. त्यामुळे त्यांना लागणारी शैक्षणिक पात्रता तेथील स्थानिक शेतकऱ्यांच्या मुलांची झाली पाहिजे. शासन या संदर्भात धोणात्मक निर्णय घेईल का ? एवढेच नाही तर तेथे जे क्वॉलिफाईल लोक लागणार आहेत, त्यांच्याबाबत देखील विचार झाला पाहिजे. आता गावोगावी मुले शिकलेली आहेत. पूर्वीचा जमाना राहिलेला नाही. पण आपल्याकडे केमिकल इंजिनिअर असला की सांगतात आम्हाला सिव्हिल इंजिनिअर पाहिजे. त्यामुळे तेथे ज्या कंपन्या येणार आहेत, त्या कंपन्यांमध्ये येणाऱ्या मनुष्यबळाच्या संदर्भातील शैक्षणिक सोय करण्याची भूमिका राज्य शासनाने नव्हे तर कोणत्याही परिस्थितीत एमआयडीसीने घ्यावी. एमआयडीसीने त्यांना सांगायचे आहे की, त्याचा बोजा नवीन येणाऱ्या कंपन्यांवर टाकावा म्हणजे पैशाचा प्रश्न नाही. तुमचे मनुष्यबळ प्रशिक्षित करतो असे सांगावे. शासन त्याचा विचार करेल का आणि त्याबाबतचा एक धोरणात्मक निर्णय घेऊन शासन कार्यवाही करेल का ?

सभापती महोदया, रायगड जिल्ह्यात घेतलेल्या विविध प्रकल्पांबाबत शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. माननीय उद्योग मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. रायगड जिल्ह्यात केमिकल फॅक्टरी आल्या आहेत. त्यामुळे केमिकल झोनचा पर्यावरण विभागने सर्व्हे केला आहे आणि त्याबाबत सांगितले आहे की, आशिया खंडामध्ये सर्वात जास्त धोकादायक जिल्हा कोणता असेल तर तो रायगड जिल्हा आहे. विषय व्यापक आहे. गंभीर बाब आहे. आपण मांडलेलाच हा विषय आहे. मी सभागृहात या संदर्भात समिती नेमून घेतली. माननीय सभापतींनी त्याला मान्यता दिली. आपण बरोबर काम करीत आहोत. आपण दोन बैठकींच्या वेळी ऑनलाईन उपस्थित झाला होता. मी माननीय सभापतींच्या दालनात बैठकीसाठी आलो होतो. गंभीर बाब असल्यामुळे आपणाला त्यामधील ज्ञान जास्त आहे. रायगड जिल्ह्यात वादळे येत आहेत आणि सातत्याने येणार आहेत. वर्षातून दोन वेळा वादळे येणार आहेत असा अहवाल आहे. मी माननीय सभापतींच्या दालनात झालेल्या मागच्या बैठकीत हे मांडले होते. ही गंभीर बाब आहे. आपल्याकडे केमिकल झोन आल्यामुळे

श्री. जयंत प्र. पाटील ....

आपल्याला पर्यावरणाबाबत ठरवावे लागेल. सुरुवातीला एमआयडीसी करताना पर्यावरण विभागाची एनओसी घेतली पाहिजे. केमिकल झोनमध्ये असलेल्या कंपन्यांची या संदर्भातील माहिती घ्यावी आणि मागाहून तेथे जाहीर करावे की, येथे आम्ही हा झोन तयार करीत आहोत. राज्य शासन या मागणीचा विचार करेल का ?

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदया, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य व नेते श्री. जयंत प्र. पाटील यांनी महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अनेक प्रश्न समोर आणले आहेत. हे सर्व प्रश्न रायगड जिल्ह्याचे आहेत. रायगड जिल्ह्याबाबत इतका अभ्यासपूर्ण विचार त्यांच्या व्यतिरिक्त कोण करु शकते ? आम्ही त्यांच्या सूचनांचे नक्की स्वागत करु. मला काही गोष्टींचा खुलासा करण्याची संधी मिळत आहे. सन्माननीय सदस्यांनी जेएसडब्ल्यू कंपनीसंदर्भात प्रश्न विचारला आहे. जेएसडब्ल्यू कंपनी ही स्टील उत्पादन करणारी कंपनी आहे. त्यांनी जाहीर केले आहे की, भारतातील सर्वात जास्त स्टील उत्पादन क्षमता असलेला उद्योग ते येथे स्थापन करु इच्छितात, त्याप्रमाणे उद्योग विभागाशी एक सामंजस्य करार केला आहे. १५ दशलक्ष टन एवढा मोठा उद्योग भारतामध्ये आणखी कोणाचाही नसेल, मग जमशेदपूर असेल किंवा दुसरे कोणी असेल, त्यापेक्षाही मोठा उद्योग करण्याचा त्यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे.

नंतर श्री. खर्चे

श्री.सुभाष देसाई....

आता असा प्रकल्प आपणाकडे येऊ नये काय, हा प्रकल्प रासायनिक नसून स्टील उत्पादक आहे. या प्रकल्पाचा दुसरा फायदा असा आहे की, मागील कोरोना काळात जेव्हा ऑक्सीजनची टंचाई भासली व अनेक ठिकाणावरुन ऑक्सीजन मिळविण्याची परिस्थिती आली त्यावेळी या उद्योगात तयार होणारा कच्चा ऑक्सीजन आपणाला तातडीने उपलब्ध झाला. तो ऑक्सीजन अनेक दूरच्या जिल्ह्यात पाठविता आला. त्यावर प्रक्रिया करुन तो रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात आला. अशा प्रकारचे मोठे प्रकल्प जेथे असतात तेथे त्याठिकाणी ऑक्सीजनसारखी अनुषंगिक उत्पादने मिळत असतात. जामनगर येथे रिलायन्सचा मोठा उद्योग आहे तेथून ऑक्सीजन मिळतो. त्यामुळे महाराष्ट्रात असा प्रकल्प उभारला तर दुसऱ्या राज्यावर ऑक्सीजनसाठी आपणाला अवलंबून राहावे लागणार नाही. या प्रकल्पाचा राज्याला फायदा होणार आहे.  या प्रकल्पापासून प्रदूषण होणार नाही. अर्थात त्याबाबत काही तक्रारी असू शकतात. या उद्योगाच्या वाढीसाठी वाढीव जमिनीची मागणी आहे, त्यासाठी शेतकऱ्यांचा काही ठिकाणी विरोध असेल तर जबरदस्तीने भूसंपादन करण्याची एमआयडीसीची भूमिका नाही. त्यामुळे जमीन घेण्यासाठी शेतकऱ्यांवर जबरदस्ती केली जाणार नाही. शेतकऱ्यांच्या सहमतीने भूसंपादन केले जाईल व व्यवहार झाला तर सर्वोच्च मोबदला दिला जाईल. त्यांना त्यांच्या कारखान्याच्या लगत जमीन पाहिजे असेल व ती मिळत नसेल, तेथील शेतकऱ्यांचा विरोध असेल तर माझ्याकडे कारखान्यापासून थोड्या अंतरावर जमीन असणारे काही शेतकरी व गावकरी आले होते. त्याबाबत आपण बोललो आहोत. ते शेतकरी स्वच्छेने जमीन देण्यास तयार असतील व त्यांना चांगला मोबदला मिळत असेल तर त्यांना आपण नकार देऊ शकत नाही. त्यामुळे विरोधासाठी विरोध असणे शक्य नाही. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांची संमती असेल तर भूसंपादन केले जाईल. हे भूसंपादन करताना शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला दिला जाईल.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी बल्क ड्रग्ज फार्मा पार्कबाबत विषय उपस्थित केला आहे. ही योजना केंद्र शासनाची आहे. दोन वर्षात आरोग्यावरील

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई....

संकट काळात भारताला औषधांसाठी परदेशावर अवलंबून रहावे लागते ही बाब चांगली नाही. चीन मधून एपीआय म्हणजे ॲक्टीव फार्मा इन्क्रेडिएन्स हे अजूनही आणावे लागतात. आपण कितीही नाके मुरडली तरी औषधांना पर्याय नाही. त्यासाठी एपीआय चीनमधून येतात. चीन वरील अवलंबित्व कमी करण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. त्यामुळे भारतात असे बल्क ड्रग्ज पार्क करण्याची योजना असून ती महाराष्ट्राला देखील देण्यात आली आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करायच्या आहेत. त्यामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते खोल समुद्रात नेऊन सोडणे. हा फार मोठा खर्चिक प्रकल्प आहे. त्यासाठी केंद्र शासन तीन हजार कोटी रुपये देऊ इच्छिते. हा प्रकल्प महाराष्ट्राने करावा तसेच हा प्रकल्प करण्यासाठी इतर काही राज्ये उत्सुक आहेत. हा प्रकल्प आपण हळूहळू करतो असे लक्षात आले तर आजूबाजूची सर्व राज्ये या प्रकल्पाचे स्वागत करण्यास तयार आहेत. त्यामुळे तो प्रकल्प पटकन तिकडे निघून जाईल. त्यामुळे समोरच्या बाकावरुन आमच्यावर टीका होईल. बघा तुमच्या शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे उद्योग निघून गेले. त्यामुळे हा प्रकल्प आपल्या राज्यात येणे हे देशासाठी, राज्यासाठी व आरोग्यासाठी आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे एक लाख रोजगार निर्माण होणार आहेत. बल्क ड्रग्ज पार्कच्या पट्ट्यात भूसंपादन करताना जी गावे व खेडी आहेत ती वगळण्यात आली आहे.त्यामुळे या ठिकाणी कोणतेही गाव विस्तापित होणार नाही. जेथे गावे नाहीत अशा जागा निवडण्यात आल्या आहेत. त्या ठिकाणी जे होतकरु तरुण आहेत, नोकऱ्या करणारे आहेत, त्यांचा सर्व्हे करण्यात येत आहे. त्यांच्यासाठी एमआयडीसीतर्फे एक चांगले नमुनेदार कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. हे केंद्र कंपनी स्थापन करणार नसून मध्यवर्ती कौशल्य विकास केंद्र एमआयडीसी स्थापन करेल. त्यासाठी विद्यापींठाकडून मदत घेण्यात येईल. लोणेर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ आहे. त्यांची मदत घेऊन चांगले अभ्यासक्रम तयार करण्यात येतील. तेथील आपल्या मुलांना नोकरीसाठी पात्र करण्यात येईल. हा प्रकल्प अतिशय भव्य असल्यामुळे तेथे एक लाख रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. याबाबत जनतेमध्ये काही समज गैरसमज असतील तर चर्चा करुन ते सोडविण्यात येतील.

श्री.सुभाष देसाई...

सभापती महोदया, मागील दोन वर्षात प्रदूषणावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळविण्यात सरकारला यश आले आहे. मुख्यमंत्री महोदय, व पर्यावरण मंत्री महोदय हे याबाबत अतिशय संवेदनशील आहेत. जल,जंगल व जमीन याबाबत पहिले प्राधान्य सरकार देते व त्यानंतर विकासाच्या कामांना प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे आमच्यावर देखील मोठी जबाबदारी आलेली आहे. यावर फक्त प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियंत्रण आहे असे नसून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जी मानके ठरविली ती अतिशय कडक आहेत. त्यांच्याकडे सर्व बाबी ऑनलाईन पाठवाव्या लागतात. कोठे सांडपणी जाते, त्याचा दर्जा काय आहे हे तातडीने त्यांना पाठवावे लागते व दुसऱ्या क्षणाला त्यांना कळते आपणाला कळते तसेच हरित लवाद यांना कळते. त्यामुळे यामध्ये आता कोणत्याही लांड्या लबाड्या करण्याची सोय राहिलेली नाही. अनेक कारखाने या कारवायांच्या कचाट्यात सापडली आहेत. त्यामुळे ती बंद ठेवावी लागतात किंवा ते बंद होण्याच्या मार्गावर आहेत. उद्योगांकडून आमच्याकडे अशी मागणी करण्यात आली आहे की, यातून काही तरी मार्ग काढा व आमचे उद्योग सुरु राहतील असे बघा. ही दुसरी समस्या असून प्रदूषणाबाबत कोणतीही तडजोड केली जात नाही. याबाबत नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

सभापती महोदया, विरार-अलिबाग हा महामार्ग अतिशय महत्वाचा आहे. जेएनपीटी या बंदरात देशातील ४० टक्के कॉर्गो हाताळले जातात. महाराष्ट्राच्या उत्तरेला व दक्षिणेला जी राज्ये आहेत त्या ठिकाणावरुन ही वाहतूक होत असते ती बरोबर व्हावी म्हणून याचा फायदा होणार आहे. त्यामुळे भिवंडी- वसई येथून या महामार्गाने उत्तरेकडील व दक्षिणेकडील राज्याकडे ही वाहतूक जाणार आहे त्यासाठी हा महामार्ग आवश्यक आहे. हा रस्ते विकास महामंडळाचा प्रकल्प आहे. ते अधिक जास्त तपशीलाने माहिती देतील. उद्योग व पायाभूत सुविधा हातात हात घालून चालतात. पायाभूत सुविधा या आवश्यक आहेत. त्यामुळे विरार-अलिबाग हा महामार्ग होणे रायगड जिल्ह्याचा सर्वांगिण विकासाठी आवश्यक आहे. यासाठी जमिनीच्या मोबदल्याचा विषय असेल तर नागपूर-मुंबई महामार्गासाठी ज्या जमिनी

श्री.सुभाष देसाई....

संपादित करण्यात आल्या त्यासाठी सर्वोच्च मोबदला देण्यात आला आहे. इतिहासातील दाखले बाजूला ठेऊन अधिकाधिक मोबदला दिला म्हणून तो महामार्ग होऊ शकला. या ७०० किलोमीटर महामार्गाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. महामार्गाचे काम करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्यात येणार आहे. यामध्ये काही गैरसमज व विरोध होत असेल तर सन्माननीय सदस्यांनी यामध्ये मदत करुन गैरसमज दूर करण्यास सहाय्य करावे अशी मी विनंती करतो. भूसंपादनाचा हा अत्यंम महत्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. गेल्या दोन वर्षापासून याबाबत काम करण्यात येत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी अशी सूचना केली होती की, भूसंपादनाची जाहिरात दिल्यानंतर ही प्रक्रिया सुरु होऊन पूर्ण होईपर्यंत दोन तीन वर्षे जातात. त्यावेळी काही हुशार लोक शेतकऱ्यांना काही पैसे देऊन जमिनी अडकवून ठेवतात. जेव्हा अंतिम मोबदला जाहीर होतो तो अनेक पटीमध्ये असतो. त्याचा फायदा या गुंतवणुकदारांना होतो. मूळ मालक शेतकरी लाभापासून वंचित राहतात. असे होऊ नये याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री महोदयांनी दिल्या आहेत. त्यासाठी सर्व विभागांची एकत्रित बैठक घेऊन कायद्यात सुधारणा करण्याचे ठरविले आहे. शक्य झाले तर याच अधिवेशनामध्ये या कायद्यात सुधारणा केली जाणार आहे. आपण सूचना केली म्हणून मी उत्तर देतो नाही तर मला अगोदर तो पेपर फोडायचा नाही. धोरण असे आहे की, पहिली सूचना निघते त्यावेळी जे जमिनीचे मालक होते त्यांच्या जमिनीचे फेरफार मधल्या काळात होऊ नयेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई......

परंतु काही लोकांनी हक्क घेतलेले असले तर ते कोर्टात जातात आणि कोर्टात त्यांच्या बाजूने निवाडा लागल्यानंतर आपण गप्प बसतो. तसे होऊ नये म्हणून आता कायद्यात अशी सुधारणा करण्यात येईल की, पहिली अधिसूचना निघाल्यानंतर झालेल्या व्यवहारांमध्ये दर वाढलेला असेल म्हणजे सुरुवातीचा रेडीरेकनरचा दर आणि अंतिम मोबदल्याच्या तारखेच्या वेळी असलेल्या रेडीरेकनरमध्ये फरक असेल तर मधला जो फरक आहे त्यातील अर्धे पैसे मूळ मालकाला दिलेच पाहिजेत. आपण अशा प्रकारची सुधारणा करणार आहोत. आपण म्हणाल की, ही डावी विचारसरणी आहे आम्हाला काही फरक पडत नाही. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची मी उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी ते विचारावेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे. आम्हाला जी अपेक्षा आहे, ज्यासाठी आम्ही दोन वर्षांपासून लढत आहोत तो विषय मंत्री महोदयांनी आता मार्गी लावलेला आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, मूळ मालकाला ५० टक्के मोबदला मिळाला पाहिजे. मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. आम्ही जेएसडब्ल्यू कंपनी संदर्भात देखील सहकार्य करण्यास तयार आहोत. स्थानिक आमदार श्री.रविशेठ पाटील यांनी स्वत: बैठकीत सांगितले की, दादर गावातील लोक जागा देण्यास तयार आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे ते त्याच किनाऱ्यावर आहे. आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला त्यावेळी ते आमच्या बरोबर होते. त्यांचे रावेगाव तेथून जवळच आहे. तेथे ४-५ हजार एकर जागा आहे. मी शेतकऱ्यांच्या वतीने आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. आपण जेएसडब्ल्यू कंपनी संदर्भात सांगत आहात. आम्ही त्यांना जागा देण्यास तयार आहोत. शासनाने डोलवी गावाचे पुनर्वसन करावे. डोलवी, कारावी, गडप या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर आवाज येत असल्यामुळे तेथे लोक राहू शकत नाहीत, अशी परिस्थिती आहे. आपण अनेक वेळा तेथे गेलेला आहात. तेथे मोठ्या

श्री.जयंत पाटील......

प्रमाणावर प्रदूषण होते. आम्ही सर्व जागा देतो. आपण त्याप्रमाणे मोबदला द्यावा. आपण मोबदल्याविषयी बोलत नाही. जेएसडब्ल्यू कंपनी आणि विरार-अलिबागसाठी वेगळा रेट नाही. विरार-अलिबागसाठी जो रेट देण्यात येईल तोच आजुबाजूच्या लोकांना मिळाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदया, सदर लक्षवेधी सूचना रायगड जिल्ह्याशी निगडीत आहे. रायगड जिल्हा उद्योग क्षेत्रात देशातील पहिल्या ५ ते १० क्रमांकामध्ये आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे यांनी कृपया स्पेसिफक प्रश्न विचारावा.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदया, रायगड जिल्ह्याला स्वराज्याची राजधानी म्हटले जाते. पुढील काही वर्षात राजगड जिल्ह्याला उद्योगाची राजधानी म्हटले जाईल, अशा पद्धतीने वाटचाल सुरु आहे. रायगडवासीयांवर व स्थानिक भुमिपूत्रांवर अन्याय होणार नाही याबाबत शासनाने खबरदारी घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी यासाठीच सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात "बल्क ड्रग पार्क" संदर्भात सर्वेक्षण करुन सर्वोत्तम मोबदला देण्याच्या संदर्भात विचाराधीन असल्याचे म्हटले आहे. परंतु बल्क ड्रक पार्क जाहीर करुन जवळपास दोन ते अडीच वर्षे झालेली आहेत. मग सर्व्हेक्षण केव्हा पर्यंत होणार आहे आणि त्या संदर्भात केव्हा पर्यंत निश्चिती होईल याबाबत मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात उल्लेख केलेला नाही. या संदर्भात स्पष्टता आली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे शेतकरी जागा विकणार नाहीत. मोबदल्याची रक्कम समजू शकली तर शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे.......

मेसेज जाईल. म्हणून सर्व्हेक्षण केव्हा पर्यंत होईल आणि जे ॲक्विझिशन करण्यात येणार आहे त्या संदर्भातील दर सन २०१३ प्रमाणे केव्हा पर्यंत निश्चित करण्यात येणार आहेत ? तसेच, सदर प्रकल्प निर्धारित वेळेत सुरु करण्यात येणार आहे काय ? आपण जागा ॲक्विझिशन करतो. परंतु १०-१५ वर्षे तेथे काहीही होत नाही. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॉरीडॉरसाठी सन २०१३-१४ मध्ये ॲक्विझिशन सुरु केले. परंतु आपण अद्याप ७० ते ८० टक्क्याच्या पलीकडे ॲक्विझिशन करु शकलो नाही. त्यामुळे कळत न कळत पूर्वी ज्या लोकांनी या संदर्भात सकारात्मक भूमिका घेतली त्यांच्यावर अन्याय झालेला दिसतो. त्यामुळे विशिष्ट कालावधीत प्रकल्प पूर्ण केले जावेत. शासनाने या संदर्भात नियोजन केलेले आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, एन्व्हॉयरमेंट ॲसेसमेंट रिपोर्ट नुसार उद्योगधंद्यांचा जिल्ह्यावर कोणता परिणाम होणार आहे, जिल्ह्यातील शेती व बागायतदारांवर नक्की कोणता इम्पॅक्ट होणार आहे, या संदर्भात मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यासाठी विलंब झालेला आहे हे बरोबर आहे. विलंब होण्याचे कारण असे आहे की, जी मोजणी सुरु झाली होती त्यासाठी काही गावकऱ्यांनी विरोध केला होता. जबरदस्तीने कोणतीही कार्यवाही करावयाची नाही असे शासनाचे धारेण आहे. म्हणून ती मोजणी थांबविण्यात आलेली आहे. हे काम लवकरात लवकर कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावे अशी सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. आपण सर्वांनी शेतकऱ्यांसमवेत चर्चा करुन त्यांचे गैरसमज दूर करावेत. आमची गावे विस्थापित होणात आहेत असा आरोप होत होता. आम्ही एकही गाव विस्थापित होणार नाही असे लिहून दिलेले आहे. कोणतेही गाव विस्थापित होणार नाही. त्यामुळे हा गैरसमज दूर केला पाहिजे. आम्ही मोबदल्याविषयी चर्चा करीत आहेत. आमची चांगला मोबदला देण्याची तयारी आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यासाठी शासनाला सहकार्य केले तर काम लवकरात लवकर पूर्ण होईल. हे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी आम्ही सुद्धा उत्सूक

श्री.सुभाष देसाई......

आहेत. कारण, केंद्र शासनाकडून वारंवार विचारणा होत असते. केंद्र शासनाकडे इतर राज्ये मागणी करीत आहेत. सदर प्रकल्प इतर राज्यात जाऊ नये यासाठी हे काम लवकरात लवकर व्हावे, अशी आमची सुद्धा इच्छा आहे. आपण सर्वांनी त्यासाठी सहकार्य करावे. मोजणी झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे लवकरात लवकर हे काम पूर्ण केले जाईल. दुसरे म्हणजे इको सेन्सेटिव्ह झोन म्हणजे संवेदनशील क्षेत्राबाबत मोठा गैर समज पसरला होता. खरे म्हणजे बल्क ड्रग पार्कच्या भूसंपादनाचे क्षेत्र संवेदनशील क्षेत्रात येतच नाही. संवेदनशील क्षेत्र सह्याद्री डोंगररांगांमध्ये लागू आहे. हे क्षेत्र समुद्र काठावरील क्षेत्रासाठी लागू होत नाही. परंतु हा गैरसमज दूर करण्यामध्ये आमची काही वर्षे गेली....

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदया,....

**उप सभापती** : आपण कृपया मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदया, संवेदनशील क्षेत्राबाबत गैरसमज असतील तर त्याचे निराकरण केले जाईल. आपण ते तसेच ठेऊन कायदेभंग करुन काम करु शकत नाही. वन विभाग, पर्यावरण विभागाचे नियम, अटी व शर्तींचे पालन करुनच सदर प्रकल्पाचे काम पुढे नेले जाईल. सदर प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाईल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, रायगड, पनवेल परिसरात एमआयडीसीसाठी एकूण किती जागा अधिग्रहीत करण्यात येण्यात येणार आहे आणि त्यासाठी एमआयडीसीकडे निधी उपलब्ध आहे काय ? मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण प्रस्ताव तयार करतो. त्यानंतर जमिनींची खरेदी होते. परंतु एमआयडीसीकडे निधी नसल्यामुळे संबंधिताना १०-१५ वर्षे मोबदला मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सिडको व एमआयडीसी रायगड, पनवेल विभागात जागा ॲक्विझिशन करीत आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात उत्तर द्यावे. आपण ब्लक ड्रग पार्क उभारणार

श्री.शशिकांत शिंदे.........

आहोत. सदर पार्क उभारण्यासाठी कोणत्या वर्षी प्रस्ताव तयार करण्यात आला होता, सदर पार्क केव्हा पूर्ण होईल याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा. आपण मघाशी वसई-विरार-अलिबाग संदर्भात उत्तर दिले. दिघी येथे अडानी यांनी पोर्ट घेतलेले आहे. केंद्र शासनाने ते पोर्ट अहमदाबाद पर्यंत जॉईंट करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. केंद्र शासनाने सदर पार्क उभारण्यासाठी किती दिवसांचा अवधी दिलेला आहे, सदर पार्क केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ? आपण मघाशी सांगितले की, शासनाने सर्वोच्च मोबदला देण्याबाबत निकष ठरविलेले आहेत. खरे म्हणजे आता काही लोकांची मागणी आहे की, एअरपोर्ट प्रमाणे मोबदला देण्यात यावा. आपण मघाशी सांगितले की, ॲक्विझिशन केल्यानंतर ज्यावेळी नोटिफिकेशन काढले जाईल त्यावेळी जे असतील त्यांना मालक समजण्यात येईल. माझी या संदर्भात सूचना आहे. नोटिफिकेशन काढण्यापूर्वी काही लोकांना माहिती असते की, येथे अमूक प्रकल्प होणार आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, नोटिफिकेशन निघाल्यानंतर जे मालक असतील त्यांना द्यावे लागेल. आपण नोटिफिकेशन निघण्यापूर्वी जे मूळ मालक असतील त्यांच्या विषयी निर्णय घेणार आहात काय ?

**उप सभापती :** सन्माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात स्पष्ट विवेचन केलेले आहे. शासन या संदर्भात कायदा करणार असल्याचे सांगतले. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांची भूमिका काय आहे हे देखील सांगितले आहे.

यानंतर श्री.गागरे......

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी थोडक्यात उत्तर देतो. खरे तर एकूण किती जमीन रायगड जिल्हयात संपादीत केली जाणार आहे असे या लक्षवेधी सूचनेमध्ये कोठेही विचारलेले नाही. पण मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, १७००० हेक्टर जमीन रायगड जिल्हयात औद्योगिकीकरणासाठी अधिगृहीत करण्याचा प्रस्ताव आहे. किती शक्य होईल आम्हाला माहिती नाही. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी विचारले की, जमीन विनावापर पडून आहेत. हे पूर्वी होत होते हे मी मान्यच करतो. पूर्वीच्या अशा अनेक औद्योगिक क्षेत्रात अधिगृहीत केलेल्या जमिनी विनावापर पडून आहेत. ही चूक पुढे चालू राहू नये म्हणून आता असे धोरण आहे की, जेथे पटकन औद्योगिकीकरण होईल, लवकर उद्योग येतील व त्या जमीनी वापराखाली येतील असे क्षेत्र आता संपादीत करावयाचे आहे. त्यामुळे आग्रह बरेच असतात, लोकप्रतिनिधींचेही आग्रह असतात. पण जी जमीन उद्योगपती घेणार नाहीत ती कशाला घेऊन ठेवायची. त्यामुळे विकली जाणारी किंवा वाटप होऊ शकणारी जमीन आपण भूसंपादीत करावी हे आता धोरण आहे. त्यामुळे विनावापर जमीन पडून राहण्याचे प्रकार निदान नवीन भूसंपादनाच्या बाबतीत घडणार नाहीत असे मी स्पष्ट करु इच्छितो. चांगला व जास्तीत जास्त दर देण्याची आमची तयारी आहे. फक्त तुलना केली जाते की हायवेला दिलेला दर द्यावा. पण त्याची व याची तुलना होऊ शकत नाही. कारण औद्योगीक विकास महामंडळाने घेतलेली जमीन दुसऱ्या कोणाला द्यायची आहे, त्यामुळे त्या घेणारासही परवडली पाहिजे. रस्त्यासाठी घेतलेली जमीन स्वत: वापरायची असते, दुसऱ्या कोणाला देण्याचा प्रश्न नाही, त्यामुळे बाजारभावाची चिंता करण्याची गरज नाही, येथे मात्र चिंता करावीच लागते, पण चांगला व सर्वोच्च दर देण्याची आमची तयारी आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी चांगला निर्णय घेतला आहे. मुळ मालकाला ५० टक्के देण्याची आमची मागणी आहे, याबाबत विचारु करुन कायदा करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासन करणार आहे. त्यामुळे मी रायगड जिल्हयातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. जेएसडब्ल्यूसह मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तरे दिलेली आहेत, याबद्दल मी देखील मंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देतो.

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उप सभापती : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उदार भूमिकेतून, एका बाजूला शेतकरी व कामगारांच्या प्रश्नावर लढत असताना या महत्वाच्या लक्षवेधी सूचनेद्वारे आवाज उठवला आहे. त्याचबरोबर कायदा करण्याचा महत्वाचा निर्णय होत आहे, शेतकऱ्यांना संरक्षण कसे मिळणार हा आपल्या सर्व प्रश्नांचा मतितअर्थ होता.

आता मी लक्षवेधी क्रमांक ३ पुकारत आहे, लक्षवेधी क्रमांक २ ही माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांची आहे, त्यांना ओबीसी आरक्षणाबाबत बैठक आहे, ते सभागृहात उपस्थित असताना लक्षवेधी सूचना घेण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांची लक्षवेधी क्रमांक ३ पुकारत आहे.

--------

असुधारित प्रत

**पू. शी.** : मोखाडा तालुक्यातील ( जिल्हा पालघर ) पायरवाडीतील पहिलीत शिकणाऱ्या कुमार अजय युवराज पारधी या ६ वर्षीय बालकाचा जव्हार कुटीर रुग्णालयात दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू

**मु. शी. :** मोखाडा तालुक्यातील ( जिल्हा पालघर ) पायरवाडीतील पहिलीत शिकणाऱ्या कुमार अजय युवराज पारधी या ६ वर्षीय बालकाचा जव्हार कुटीर रुग्णालयात दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू या संबंधी सर्वश्री सुनील शिंदे, विलास पोतनीस, रवींद्र फाटक, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री. सुनील शिंदे ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) पायरवाडीतील पहिलीत शिकणाऱ्या कु. अजय युवराज पारधी या ६ वर्षीय बालकाचा जव्हार कुटीर रुग्णालयात दि. २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू, सदर बालकास त्याच्या कुटुंबियांनी दि. २४ जानेवारी, २०२२ रोजी उपचारासाठी त्र्यंबकेश्वर येथील दवाखान्यात नेणे, तेथे एक दिवसाच्या उपचारानंतर त्याला सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा त्र्यंबकेश्वर येथील डॉक्टरांनी दिलेला सल्ला, तदनुसार मुलाच्या पालकांनी त्याला मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनीही बालकाला जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल करण्यास सांगणे, पालकांनी जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्या बालकावर उपचार मिळण्यास विलंब झाल्यामुळे दि.२५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान

श्री. सुनील शिंदे.....

झालेला मृत्यू, मृत बालकाचा मृतदेह घरी नेण्यासाठी कुटुंबाकडे पैसे नसल्याने त्यांना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्यास जव्हार येथील कुटीर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून झालेला हलगर्जीपणा, मृतदेह रुग्णवाहीकेतून नेण्यासाठी पैसे न दिल्यास रुग्णवाहीका मिळणार नाही, असे रुग्णवाहीकेच्या चालकाने मृत बालकाच्या वडिलांना सांगणे, परिणामी मुलाचा मृतदेह ३५ ते ४० किमी अंतरावर असलेल्या स्वतःच्या घरी दुचाकीवरुन नेण्यात येणे, या दुर्देवी घटनेला जबाबदार असलेल्या रुग्णालयाच्या प्रशासनाच्या कारभाराविषयी जनमानसात वाढता तीव्र असंतोष, शासनाने या दुर्देवी घटनेची व प्रशासनाच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदया, या लक्षवेधी सूचनेवरील प्राप्त निवेदनात म्हटले आहे की, सहा वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाला, त्याला वेळेत रुग्णवाहिका न दिल्याने नातेवाईक परस्पर दुचाकीवरुन घेऊन गेले. त्या अनुषंगाने रुग्णवाहिका चालकावर कारवाई झाली, ज्यांच्यासमोर मृतदेह घेऊन गेले तेथे उपस्थित असलेले डॉक्टर, परिचारीका यांनी दुर्लक्ष केले त्यामुळे त्यांची याबाबत चौकशी करणार का. तसेच येथे २०० खाटांचे रुग्णालय मंजूर झालेले आहे, परंतु आजतागायत रुग्णालय उभारण्यास तेथे हालचाल दिसत नाही.याबाबत शासन तातडीने निर्णय घेईल का ?

सभापती महोदय, माझा पुढील प्रश्न आहे की, आदिवासी बांधव व भगिनींसाठी डॉ.तुषार पाटील या खाजगी सोनोग्राफी तज्ज्ञांशी शासनाने एमओयु केलेला आहे. सोनोग्राफीसाठी ४०० रुपये आकारले जातात. जव्हार, मोखाडा दुर्गम तालुक्यात आदिवासी व गरीब जनता राहते, ४०० रुपये देखील त्यांच्यासाठी खूप महागडे आहेत. माझी शासनाला विनंती आहे की, या विभागाची भौगोलिक परिस्थिती पाहता तेथे सोनोग्राफी मोफत करणार का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, अतिशय दुर्गम भागाबाबत विषय सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी उपस्थित केलेला आहे. हे नक्की आहे की, त्या बालकाचा अतिशय दुदैवी मृत्यू झाला. त्यांना शववाहिनी तेथील नगरपालिकेने उपलब्ध करुन देणे हा त्यांच्या कार्याचा भाग आहे किंवा अनिवार्य आहे, त्यांची ती जबाबदारी आहे. परंतु दुदैवाने अनेक नगरपालिका शववाहिन्यांची व्यवस्था करीत नसल्याने, सध्या तरी आमच्याकडील १०२ क्रमांकाच्या ॲब्युलन्स डिलीव्हरी पेशंटला घेऊन जाण्यासाठी वापरल्या जातात, पण शववाहिनी म्हणून ॲब्युलन्स वापरण्याची प्रथा नाही. पण तरीसुध्दा तेथील डॉक्टरांनी दु:खद घटना पाहून संबंधीत ड्रायव्हरलाही बोलावले, परंतु ड्रायव्हर यायला उशीर झाला, त्यामुळे लहान बालकाचे शव मोटारसायकलवर घेऊन गेले. या संबंधी चौकशी केली आहे, दोन्ही ड्रायव्हर विलंबाने आले, त्यांच्यावर कारवाई केलेली आहे, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, डॉक्टर व परिचारीकांची देखील चौकशी व्हावी पण प्रथमदर्शनी त्यांचा दोष दिसत नाही. त्यांनी पूर्ण प्रयत्न केल्याचा अहवाल सिव्हील सर्जन पालघर

श्री.राजेश टोपे.....

यांनी दिलेला आहे. परंतु सदस्यांची विनंती लक्षात घेता निश्चितपणे याबाबतची अधिक खातरजमा केली जाईल. डॉक्टर व परिचारीका यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली की नाही याची नक्की खातरजमा करुया.

सभापती महोदय, २०० खाटाच्या रुग्णालयास मान्यता दिलेली आहे, मला सांगण्यास आनंद वाटतो की, सुमारे ४००० कोटी रुपये हुडकोकडून कर्ज देखील उपलबध झालेले आहे, यामुळे मंजूर व चालू असलेले बांधकाम हे ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय या स्तरावरील बांधकामांना पूर्ण प्राधान्याने निधी दिला जाईल. याकरीता निधी कोठेही कमी पडणार नाही. २०० खाटांचे काम लवकर कसे पूर्णत्वाला येईल. या दृष्टीकोनातून मी स्वत: लक्ष देऊन प्रयत्न करेन. मी हा विश्वास सन्माननीय सदस्य व सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो.

सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पुढील प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, सोनोग्राफीसाठी ४०० रुपये आकारले जातात. त्यास जननी सुरक्षा कार्यक्रमांतर्गत एनएचएम म्हणजे नॅशनल हेल्थ मिशन मार्फत तो निधी देतो. त्यामुळे रुग्णाला पैसे लागणार नाही, त्यांना मोफतच उपचार दिले जातील किंवा त्यांची सोनोग्राफी केली जाईल. सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो, कोणत्याही महिलेकडून एक रुपयाही याकरीता घेतला जाणार नाही.

श्री.रविंद्र फाटक : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी प्रश्नांची उत्तरे दिल्याने मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दोन उपप्रश्न विचारु इच्छितो. पालघर ग्रामीण रुग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध करुन मिळावी. त्यामुळे या हॉस्पीटल, डॉक्टर व रुग्णावर आलेला प्रसंग येणार नाही. पालघरमध्ये प्रत्येक ठिकाणी रुग्णवाहिका व शववाहिका मिळावी अशी विनंती करतो, ती मिळाल्यास चांगले होईल.

यानंतर श्रीमती नाफडे

श्री.रविंद्र फाटक......

तेथे शववाहिनी जर मिळाली तर फार बरे होईल. पालघर जिल्हयातील फुटाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा द्यावा, ही कायमस्वरुपी मागणी सभागृहासमोर जी केली जात आहे, त्याचा देखील शासनाने विचार करावा, असे मला वाटत आहे. दिनांक २५ रोजी पालघर येथे हा जो अपघात झालेला आहे, त्याच्यामध्ये ज्या मुलाचा मृत्यू झालेला आहे, त्याचे नाव कु.अजय युवराज पारधी असे आहे. या बाबत मी स्वत: संबंधित डॉक्टर आणि कलेक्टर यांच्याशी बोललेलो आहे. रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे ही समस्या उद्भवलेली आहे. त्यामुळे संबंधित रुग्णाला मोटारसायकलवरुन घेऊन जाण्यात आलेले आहे. त्यामुळे सरकारची किंवा आपली जी बदनामी झालेली आहे, यापुढे अशी बदनामी होऊ नये, याकरिता याचा विचार करावा, असे मला वाटते.

श्री.राजेश टोपे :सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी दोन महत्त्वाचे प्रश्न विचारलेले आहेत, त्यांचा पहिला आणि तिसरा प्रश्न सारखाच आहे. शववाहिनी ही नगरपालिकेच्या जबाबदारीचाच भाग आहे. मुंबई आणि पुणे या महानगरपालिका आहेत, येथे शववाहिनींची व्यवस्था केलेली आहे. श्रीमंत महानगरपालिका यांनी ही व्यवस्था केलेलीच आहे. परंतु नगरपालिका अ वर्ग किंवा नगरपालिका ब वर्ग असेल त्यांचा देखील शववाहिनी हा जबाबदारीचाच भाग आहे. ही जबाबदारी त्यांच्याकडून पार पाडली जात नाही. आरोग्य विभागाचा मंत्री म्हणून शासनाची सामुहिक जबाबदारी म्हणून मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री, नगरविकास मंत्री यांच्या समवेत या विषयाबाबत आरोग्य संदर्भात पुढाकार घेऊन, बैठक घेऊन यामधून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. सगळया नगरपालिकांना शववाहिनी सक्तीची असायलाच पाहिजे, महानगरपालिका अ,ब,क,ड यांना देखील शववाहिनी सक्तीची असणे आवश्यक आहे. हे निश्चितच आहे की, गरीब व्यक्तीला शव त्याच्या गावाला घेऊन जाण्याकरिता उपलब्धतता असू शकणार नाही. ही आमच्या आरोग्य विभागाची जबाबदारी नसल्यामुळे आमच्या निधीतून ते घेणे संयुक्तिक होणार नाही.

असुधारित प्रत

श्री.राजेश टोपे....

नगरविकास विभागाला हे सांगून त्यांच्याकडून करुन घेण्यासंदर्भात महाविकास आघाडीचे सरकार पूर्ण प्रयत्न करेल, हा विश्वास मी या निमित्ताने सभागृहाला देऊ इच्छितो. फुटाळा या प्राथमिक आरोग्य केंद्राला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणी सातत्याने केली जात आहे, त्या संदर्भात तातडीने त्यांच्या निकषानुसार उप संचालक, आरोग्य, ठाणे यांना सांगून संबंधित प्रस्ताव मागविण्यात येईल. जर तो प्रस्ताव निकषात बसत असेल तर १०० टक्के त्याला मान्यता देण्याविषयी आम्हाला आनंदच होईल, हा देखील विश्वास मला द्यायचा आहे.

डॉ.मनिषा कायंदे :सभापती महोदया, आमदार निधी देताना आम्हाला जी अडचण येते, ती मी मंत्रीमहोदय आणि सभागृहापुढे मांडू इच्छिते. आम्हाला अनेक निवेदने येतात की, अमुक एक ठिकाणी शववाहिनी किंवा रुग्णवाहिकेची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे ते देत असताना अमुक एक सेंटरला देता येते किंवा अमुक सेंटरला देता येत नाही, या ज्या बाबी असतात किंवा त्याच्यात जी क्लिष्टता आहे, ती जर दूर करता आली तर अनेक ठिकाणी आम्ही या शववाहिनी वा रुग्णवाहिनी आमदार निधीतून देखील पुरवू शकतो. याबाबतचे जे क्लॉजेस, नियम आहेत, यामध्ये जर का थोडा फेरफार केला तर बरे होईल. एखाद्या सब सेंटरला शववाहिनी देता येत नाही. मुख्य सेंटरला शववाहिनी देता येते, अशा देखील याबाबत अडचणी आहेत. याबाबत स्पष्टीकरण मिळाले तर बरे होईल.

श्री.राजेश टोपे :सभापती महोदया, ही अत्यंत चांगली सूचना आहे. "सजेशन फॉर ॲक्शन." शासनाकडून कोणत्याही परिस्थितीत शववाहिनीसंदर्भात फ्लेक्झिबिलिटी आणण्याचा प्रयत्न केला जाईल. ज्या आमदारांना त्यांच्या मतदारसंघात शववाहिनी द्यायची असेल, ती सढळहस्ते त्यांना देता यावी, याबाबत स्पष्टता नियोजन विभागाकडून देण्यात येईलच. कोणत्याही परिस्थितीत शववाहिनीचा पुरवठा राज्यभरामध्ये मोठया पध्दतीने होईल. आमदार निधीच्या स्वरुपात, नगरविकास विभागाच्या वतीने मोठया पध्दतीने शव वाहिन्या स्वत: खरेदी करण्याचा विषय असो,

असुधारित प्रत

श्री.राजेश टोपे.....

दोन्हीही स्त्रोतांच्या माध्यमातून शव वाहिनी पुरवठा करणे ही महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाब आहे, ती गांभीर्याने घेऊन त्याला गती दिली जाईल.

श्री.विलास पोतनीस :सभापती महोदया, या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांना माझे दोनच उप प्रश्न आहेत. बहुतेक राज्यातील ग्रामीण रुग्णालयात वर्ग १ ते ४ ची सुमारे ५० टक्के पदे रिक्त आहेत, ही पदे रिक्त असल्याने त्याचा रुग्णसेवेवर विपरित परिणाम होत आहे. ग्रामीण रुग्णालयातील १ ते ४ ची रिक्त पदे शासन तातडीने भरणार आहे काय, किती कालावधीत रिक्त पदे भरण्यात येणार आहेत ? कुटीर रुग्णालय, जव्हार, येथे गोर-गरीब रुग्ण मोठया संख्येने उपचाराकरिता येत असतात, तेथे काही औषधांचा तुटवडा भासत असल्याने मागणीप्रमाणे पुरेसा औषध पुरवठा करण्याची विनंती रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी दिनांक ०९ फेब्रुवारी,२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केलेली आहे. त्यानुसार शासनाने औषधांचा पुरेसा पुरवठा रुग्णालयास केलेला आहे का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, हे या सभागृहाला विदितच आहे की, रिक्त जागा भरण्यासंदर्भात जे काही कॅबिनेटने, माननीय मुख्यमंत्री यांनी आदेशित केल्याप्रमाणे अनेक विभागांच्या रिक्त जागा भरण्याची परवानगी अद्यापहि दिलेली नाही. आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण, पोलीस विभाग यांना पदे भरण्याची परवानगी दिलेली आहे. डॉक्टर्सची पदे सर्व भरण्यात आलेली आहेत. मेडीकल ऑफिसर्स ( वर्ग-१) आणि ( वर्ग-ब ) दोन्हीही संवर्ग भरण्यासंदर्भातील कार्यवाही झालेली आहे. वर्ग-१ आणि वर्ग-४ च्या पदांचा प्रश्न आहे. त्यापैकी ५० टक्के पदे परीक्षेच्या माध्यमातून भरलेली आहे. उर्वरित ५० टक्के पदांच्या संदर्भात जो काही विषय निर्माण झालेला आहे, तो आपल्याला माहितीच आहे. त्याबाबत जी पोलीस कारवाई आणि त्याबाबतचा पोलिसांचा रिपोर्ट अपेक्षित आहे, तो रिपोर्ट आता प्राथमिक स्वरुपात किंवा अंतरिम अहवाल त्याबाबतचा आलेला आहे. त्या अनुषंगाने तातडीने निर्णय घेऊन उर्वरित ५० टक्के क आणि ड ची पदे भरायची राहिलेली आहे. ती कार्यवाही शासनाच्या मार्फत निश्चितपणे केली जाईल. अ आणि

श्री.राजेश टोपे.....

ब च्या संदर्भातील पदे निश्चितपणे भरलेली आहेत. औषधांच्या संदर्भातील जो काही विषय आहे, त्याबाबत डीपीसी, पालघर आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने हा औषधांचा पुरवठा केला जात असतो. त्या स्तरावर निश्चितप्रकारे त्या त्या वैद्यकीय अधीक्षकाला ज्या काही आवश्यकता आहेत, त्या सर्व त्यांनी पूर्ण करणे गरजेचे असते. या उपर जर सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांनी जो मुद्दा येथे मांडलेला आहे, त्याबाबत जर त्यांनी काही निवेदन दिले तर काही औषधे कमी असतील वा नसतील तर त्याबाबत संबंधित वैद्यकीय अधीक्षकांनी तो पुरवठा वा साठा का ठेवला नाही, याबाबतची चौकशी निश्चित केली जाईल. त्याबाबतची सुस्थिती निर्माण करण्यासाठी सूचना सिव्हील सर्जन आणि उप संचालक, आरोग्य यांना देण्यात येतील.

श्री.संजय दौंड :सभापती महोदया, या लक्षवेधीसंबंधी माझे दोन उप प्रश्न आहेत. आता आपल्या राज्याचे आरोग्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी डॉक्टरांच्या रिक्त पदांबाबत जी माहिती दिलेली आहे, त्याबाबत मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. बीड जिल्हयामधील ज्या पीएचसी आहेत, राज्यातील अनेक ठिकाणी रिक्त पदे भरलेली आहेत, परंतु जवळपास दहा वर्षांचा माझा अनुभव असा आहे की, जिल्हापरिषदेतील दवाखान्यात एमओ म्हणून डॉक्टर्स जॉईन होतात, त्यानंतर ते पीजी करण्याकरिता लागलीच आठ दिवसांच्या आत निघून जातात, यामुळे ती पदे कायमस्वरुपी रिक्त असतात. याबाबत शासन काय निर्णय घेणार आहे ? मी माननीय आरोग्य मंत्री यांचे अभिनंदन करतो की, प्रत्येक पीएचसीला नवीन गाडया दिलेल्या आहेत, परंतु ज्या जुन्या गाडया आहेत, या गाडयांचा शववाहिनी म्हणून वापर केला तर असे प्रश्न उद्भवणार नाहीत, त्याबद्दल शासन काय कार्यवाही करणार आहे ?

यानंतर श्री.सोनावणे......

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, ज्यावेळी एमबीबीएस डॉक्टरची नेमणूक केली जाते त्यावेळी ही नेमणूक त्याला इनसर्व्हिस पीजी करावयाची असेल तर त्यांना ५ वर्षे मेडिकल ऑफिसर म्हणून सर्व्हिस करावी लागते. त्यानंतरच त्यांना इनसर्व्हिस पीजीच्या संदर्भात परवानगी मिळते. सार्वजनिक आरोग्य विभागाची त्यांचा कोटा ३० टक्क्यांपर्यंत असावा, अशी अपेक्षा आहे. जेणेकरुन ग्रामीण भागामध्ये डॉक्टर्स उपलब्ध झाले पाहिजेत. या विषयाच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभाग एकत्रिपणे निर्णय घ्यावा असा माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्या अनुषंगाने मागील आठवड्यात निर्णय झालेला आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांच्यासमवेत एकत्रितपणे निर्णय घेतला जाणार आहे. जेणेकरुन ग्रामीण भागामध्ये डॉक्टर्स उपलब्ध झाले पाहिजेत. तसेच ते उपलब्ध झाल्यानंतर त्यांनी इतरत्र दुसरीकडे सर्व्हिसेस करता कामा नये, यासाठी देखील प्रयत्न केला जाईल. यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सांगितले असल्यामुळे त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही विभागाकडून केली जाईल.

सभापती महोदया, शववाहिनीच्या संदर्भात दोन ते तीन पर्याय आहेत आणि त्याबाबत मी थोड्याच वेळापूर्वी माहिती दिलेली आहे. हा नगरविकास विभागाचा विषय आहे. यासंदर्भातील उत्तर सामुहिकपणे दिले जात आहे. या विषयाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय श्री. एकनाथ शिंदे आणि संबंधितांसमवेत एकत्रितपणे बैठक आयोजित केली जाईल. आरोग्य विभागाला १ हजार नवीन ॲम्ब्युलेन्सेस दिलेल्या आहेत. जुन्या ॲम्ब्युलेन्सेस आहेत त्याला शववाहिनीत कन्व्हेट करता येऊ शकते आणि ते करण्यासंदर्भातील विचार आरोग्य विभागाने केलेला आहे. शेवटी काही कारणास्तव हा विषय सुटला नाही तर शेवटी कन्व्हेजन करुन त्याला कमी खर्च लागणार असल्यामुळे त्यासाठी मान्यता घेऊन शववाहिनीसाठी तो खर्च वापरता आला तर हा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने संबंधित सन्माननीय सदस्यांनी चांगले प्रश्न विचारले असून, त्यास माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी देखील अतिशय चांगली उत्तरे दिलेली आहेत. आरोग्य विभागाने या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जरुर बैठक घ्यावी याबद्दल मी स्वागत करते.

सन्माननीय सदस्यांना गेल्या वर्षी १ कोटी रुपयांचा निधी आरोग्यासाठी खर्च करण्यासाठी मिळालेला आहे. पालघर जिल्ह्याचे नियोजन अधिकारी आणि पालघर नगरपालिकेचे सीओ आणि त्याचबरोबर विधानसभा आणि विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांनी प्रत्येकी ५० लाख रुपयांचा निधी पालघर जिल्ह्यासाठी दिलेला असेल तर त्यामधून शववाहिनी आणि रुग्णवाहिका दिलेल्या असतील तर त्याचा विनियोग कोठे होत आहे ? या संदर्भात माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी अहवाल तयार करुन तो आम्हाला सादर करावा आणि त्या अनुषंगाने संबंधितांसमवेत बैठक आयोजित केली जाईल.

सन्माननीय सदस्य डॉ. मनिषा कायंदे अशा म्हणाल्या होत्या की, काही वेळेला पत्र देऊनसुध्दा त्याची अंमलबजावणी होत नाही किंवा वेळ लागतो. तरी यासंदर्भात वेगाने प्रक्रिया कशी करता येईल आणि पालघर जिल्ह्यासाठी अचूक रुग्णवाहिका आणि शववाहिनी किती मिळाल्या या प्रश्नाचे उत्तर देण्याची गरज आहे. रुग्णवाहिका आणि शववाहिनीच्या बरोबर वाहनचालकांच्या अनुपस्थितीचा प्रश्न आहे. माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी पुढील महिनाभरात पालघर जिल्ह्याचा आढावा घ्यावा अशी माझी सूचना आहे.

तिसरी लक्षवेधी सूचना झालेली आहे. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली आहे. तत्पूर्वी मला दोन सूचना करावयाच्या आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. अभिजित वंजारी यांची लक्षवेधी सूचना क्रमांक-७ असून, त्यावर विभागाकडून असे उत्तर आलेले आहे की, हा विषय उद्योग विभागास हस्तांतरित करण्यात येत आहे. कारण की, जागा ही एमआयडीसीच्या जागेवर आहे. माननीय गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी ती वगळण्याची विनंती केलेली

आहे. संबंधित विभागाने हस्तांतरण स्वीकारल्यावर ते विधिमंडळास अवगत केले जाईल. त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक-७ आज चर्चेला घेता येणार नाही.

**उप सभापती.......**

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांची लक्षवेधी सूचना क्रमांक-५ असून, ते आज अनुपस्थित असल्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा नंतर घेण्यासाठीची विनंती केलेली आहे.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक ४ चर्चेला घेण्यात येईल.

-----------------

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील : सभापती महोदया, लक्षवेधी सूचना क्रमांक-५ ही सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली आहे. इतर सन्माननीय सदस्य सदनात असल्यामुळे त्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊ शकते. एकदा लक्षवेधी सूचना सभागृहात पुकारल्यानंतर त्या लक्षवेधी सूचनेवर इतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येतात. सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दौंड, शशिकांत शिंदे उपस्थित आहेत. वास्तविक पाहता इतर सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी बोलले पाहिजे होते. पण मीच त्यांच्या न्याय हक्कासाठी बोलत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सदरहू लक्षवेधी सूचना नंतर घ्यावी म्हणून माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांना पत्र दिलेले आहे. जरी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे आज अनुपस्थित असले तरी इतर सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावनांचा विचार करावा.

असुधारित प्रत

**पृ. शी.** : ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मराठवाड्यातील सर्वच शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करणे

**मु. शी. :** ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मराठवाड्यातील सर्वच शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करणे या संबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाडा विभागात जिल्हा परिषदेच्या १२ हजार ६४५ शाळा असणे. त्यातील ५ हजार २७९ शाळेची वीज देयके थकीत असणे, म्हणजे ४१.७४ टक्के शाळांकडे वीज थकबाकी असणे, दर महिन्याला पाचशे ते सातशे रुपये वीज बिल येत असून सदर रक्कम सादिल अनुदानातून भरणे अपेक्षित असणे. परंतू सन २०१२-२०१३ पासून शासनाने शाळांना सादिल अनुदान दिले नसणे, कोरोनामुळे बंद असलेल्या शाळा सुरु झाल्यानंतर वीज मंडळाकडून शाळांमधील वीज कनेक्शन कापण्याचा सपाटा लावला असून मराठवाडयातील १ हजार २४३ शाळांची वीज कट करण्यात आली असणे, त्यामुळे शाळेतील संगणक, उपकरण बंद पडली असणे, शासनाकडून सादिल रक्कम वेळेवर मिळत नसल्याने थकीत वीज बिलाची रक्कम कोणी व कधी भरावयाची असा पेच मुख्याध्यापकांना पडला असणे,

एका बाजूला ऑनलाईन शिक्षण दिले जात असल्याचा दावा केला जात असताना व शाळांच्या संगणकीकरणावर कोट्यवधींचा खर्च होत असताना शाळेत वीज नसल्याने शिक्षकांना नवीन समस्यांना सामोरे जावे लागत असणे, ग्रामीण भागातील शाळेतील

श्री. सतीश चव्हाण.....

विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मराठवाडयातील सर्वच शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प बसविण्याची गरज असणे, ५ हजार २७९ शाळांची थकीत वीजबिल तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यासाठी होत असलेली मागणी, त्यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रया."

श्री. राजेश टोपे ( आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदया, मराठवाड्यातील जिल्हापरिषदेच्या शाळेचा ज्वलंत प्रश्न आहे. अनेक शाळांचे विजेचे कनेक्शन कट केलेले आहे. जवळपास दीड हजार शाळांचे विजेचे कनेक्शन कापलेले आहे. मागील तीन वर्षापासून विजेची बिले भरलेली नाहीत. शिक्षकाकडून विजेचे बिले भरलेली आहेत. कोरोनाच्या काळात वीज मंडळाकडून विजेचे कनेक्शन कापण्याचा सपाटाच लावलेला आहे. मुख्याध्यापकांसमोर विजेचे बिल कोणी आणि कधी भरावे असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदया, निवेदनात असे म्हटले आहे की, विद्युत वितरण कंपनीस ६ कोटी रुपयांचा निधी वितरित केलेला आहे. अजून किती शाळांचे विज बिल भरावयाचे बाकी आहे ?

सभापती महोदया, या सर्व शाळांना व्यावसायिक दराने विज बिल लावले जाते. सर्व शाळांना घरगुती दराने विज पुरवठा करावा, अशी माझी शासनाला विनंती आहे आणि तो आपण करणार काय ?

सभापती महोदया, मराठवाड्यातील सर्व शाळांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचा प्रस्ताव आला होता. त्याबाबतीत नेमके काय झाले असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदया, मराठवाड्यातील अनेक शाळा दुरुस्तीविना तशाच पडलेल्या आहेत. त्या ६० ते ७० वर्षापूर्वीच्या शाळा आहेत. अशा शाळांना डीपीडीसी आणि शासनकाडून निधी मिळत नाही. घोरेगा नावाची एक शाळा आहे. मी संबंधित जिल्हाधिकारी यांना ४ वर्षापूर्वी त्या शाळेला डीपीडीसीमधून तरतूद करावी म्हणून पत्र दिले होते. ती शाळा पूर्णपणे पडलेली आहे. डीपीडीसीमधून किमान २ टक्के किंवा १० टक्के निधीची तरतूद करावी, अशी माझी आग्रहाची विनंती आहे. सदरहू रक्कम ही जिल्हापरिषदेतील शाळांना नवीन खोल्यांचे बांधकाम करण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी वापरली जावी असा प्रस्ताव दिला जाईल काय ?

असुधारित प्रत

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सदरहू लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शिक्षण विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदया, जिल्हापरिषदांच्या शाळा टिकल्या पाहिजेत याबद्दल कोणाचेही दुमत नाही. या विषयी वैयक्तिक लक्ष देण्याची गरज आहे. या शाळांमध्ये गरीब घरातील मुले शिक्षण घेत असतात. त्यानुसार शिक्षण विभाग काम करीत आहे. विज थकित बिल हे ६ कोटी रुपये इतके आहे. कायमस्वरुपी डिस्कनेक्टेड विज थकित देयक हे ५ कोटी ८८ लाख रुपयांचे आहे. या वर्षी शिक्षण विभागाला सादीलमधून ३४.५० कोटी रुपये मिळाले आहेत. जिल्हापरिषदेतील भाड्याच्या इमारतीमध्ये सुरु असलेल्या शाळांना १२ कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. शाळांचे विज बिल भरण्यासाठी पैसे दिले जाणार आहेत. शिक्षण विभागाकडे निधी असल्यामुळे शाळांचे विज बिल भरले जाईल.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदया, अजून किती शाळांचे विज बिल भरावयाचे बाकी आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदया, राज्यात जवळपास १० हजार ६७१ शाळा आहेत. मराठवाड्यतील ८ जिल्ह्यांसाठी पैसे दिले आहेत. २ हजार ६५७ शाळांमध्ये पैसे भरलेले आहेत. मराठवाड्यातील उर्वरित शाळांना पैसे देण्याचे बाकी आहे. सादीलमध्ये पैसे असल्यामुळे विजेची बिले भरण्यासाठी पैसे दिले जातील.

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ....

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न महत्त्वाचा होता की, शाळांना कमर्शियल दराने वीज आकारली जाते. या संदर्भात एक फाईल आम्ही माननीय ऊर्जा मंत्री यांच्याकडे पाठविली आहे. त्यामध्ये कमर्शियल आणि रेसिडेन्शियल नव्हे तर इंडस्ट्रीयल दराने वीज आकारण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. माननीय ऊर्जा मंत्री यांच्याबरोबर या विषयी चर्चा करुन शाळांना इंडस्ट्रीयल दराने वीज आकारण्याबाबत मागणी करण्यात येईल. कारण या जिल्हा परिषदांच्या शाळा आहेत. ग्राम पंचायतीने सुद्धा सांगितले की, ५ टक्के सेस निधीतून शाळांचे वीज देयक भरले पाहिजे. हे खरे आहे की, शाळांना आकारण्यात येणारा कमर्शियल दर हा जादा असतो. जर शाळांना इंडस्ट्रीयल दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने वीज दर आकारण्याबाबत काही करता आले तर ते करण्यात येईल आणि त्या संदर्भातील फाईल अगोदरच सादर केलेली आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सौर ऊर्जेबाबत सांगितले. सौर ऊर्जेच्या बाबतीत मी माहिती घेते. चौथ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात निजामकालीन शाळा आहेत. मागील दोन वर्षात निजामकालीन शाळांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे. या वर्षी १२ कोटी रुपये आणि ८० कोटी रुपये असे एकूण ९२ कोटी रुपये वितरित केले आहेत. मागील पुरवणी मागण्यांमध्ये १६० कोटी रुपये मंजूर झाले असून त्यापैकी ९२ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. ते जिल्हा परिषद स्तरावर पाठविले असून ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून खर्च होणार आहेत. उर्वरित निधीसाठी सुद्धा वित्त विभागाकडे मागणी करीत आहोत. जेणेकरुन हे सर्व १६० कोटी रुपये निजामकालीन शाळांसाठी उपलब्ध होतील. कारण या शाळांतील इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करणे खूप गरजेचे आहे. त्या जुन्या आणि पडीत झालेल्या शाळा आहेत. त्या जिल्हा परिषदेच्या शाळा असल्यामुळे त्या शाळांचा विकास करणे ही सरकारची जबाबदारी आहे.

प्रा.वर्षा गायकवाड .....

सभापती महोदया, या व्यतिरिक्त महाराष्ट्रामध्ये ४८८ आदर्श शाळा असून यामध्ये काही शाळा मराठवाड्यातील आहेत. या वर्षी या शाळांसाठी ५३ कोटी रुपयांचे बजेट ठेवलेले आहे. पुढील वर्षी हे बजेट वाढविण्यात येणार आहे. जेणेकरुन या शाळांना पुरेसे बजेट उपलब्ध होईल. हे सर्व बजेट जिल्हा परिषदेमध्ये पाठवित आहोत. माननीय मुख्यमंत्री यांनी सीएसआर च्या संदर्भात बैठक घेतली आहे. आम्ही कंपन्यांसोबत देखील चर्चा करीत आहोत. आपल्या शाळांमध्ये किती ठिकाणी वाचनालये पाहिजेत, किती ठिकाणी टॉयलेट पाहिजेत, किती ठिकाणी बांधकाम करावयाचे आहे, किती ठिकाणी वर्गखोल्या तयार करावयाच्या आहेत या बाबत सविस्तर सर्व्हे झालेला आहे. ही कामे सीएसआर फंडमधून करण्यासाठी देत आहोत. त्यांना सीएसआर फंडमधून या बाबी करण्यास सांगत आहोत. यासाठी माननीय मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन आम्ही इनिशिएटीव्ह घेत आहोत. उद्या महिला दिनाचे औचित्य साधून सीएसआर फंडींगचे ओपनिंग करीत आहोत. यामध्ये इम्पथी फाऊंडेशन हे आम्हाला शाळा पुनर्बांधणी आणि मुलींच्या स्वच्छतागृहांसाठी पूर्ण मदत करीत आहे. तसेच पाण्याच्या व्यवस्थापनासाठी मदत करीत आहे. या व्यतिरिक्त शांतीलाल मुथा फाऊंडेशन या कामी पुढे आले आहे. त्यांनी सांगितले आहे की, आदर्श शाळांच्या विकास कार्यक्रमामध्ये आम्ही पूर्ण मदत करण्यास तयार आहोत. तसेच स्त्री बल, अक्षयकुमार फाऊंडेशन, नेहरु युवा केंद्र यांच्या माध्यमातून स्वरक्षणासाठी जे प्रशिक्षण लागणार आहे ते आदर्श शाळांमध्ये देण्याचे काम करण्यात येणार आहे. हे सर्व कार्यक्रम सीएसआर फंडच्या माध्यमातून करीत आहोत. एव्हरग्रीन फाऊंडेशन हे उद्योजकता विकास प्रशिक्षण देणार आहे. खान ॲकॅडमी ई-साहित्य निर्मिती व आदर्श शाळांचे पारदर्शी उपक्रम यावर काम करणार आहे. कमला सुंदर फाऊंडेशन हे आरोग्य तपासणी, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट हे चष्मे वाटप करणार आहे. या व्यतिरिक्त युनिसेफ हे स्वच्छता बदल आणि महिलांच्या इतर गोष्टींबाबत त्यांच्याकडे मार्गदर्शन शिबीर आयोजित करणार आहेत. पहिल्या अक्षरच्या माध्यमातून आदर्श शाळांमध्ये ग्रंथालय करीत आहोत. अर्बन फाऊंडेशनच्या माध्यमातून गुड टर्म.....

असुधारित प्रत

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, आपण लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील उत्तर द्यावे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, मी यासाठी सांगत आहे की, आम्ही केवळ शासनाच्या फंडातूनच शाळांच्या विकासासाठी प्रयत्न करीत नसून सीएसआर फंडातून सुद्धा जिल्हा परिषदांच्या शाळांचा विकास करीत आहोत. कारण शेवटी या शाळांमध्ये सक्षमीकरण करणे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हा शासनाचा मुख्य उद्देश आहे.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदया, या लक्षवेधी सूचनेमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहे त्यांना बगल देणारे निवेदन शासनाने सादर केले आहे. माझा पहिला प्रश्न आहे की, सन २०१२-१३ पासून शासनाने शाळांना सादिल अनुदान दिले नाही हे खरे आहे काय, दुसरा प्रश्न असा आहे की, मराठवाड्यातील १२४३ शाळांची वीज कापण्यात आली हेही खरे आहे काय, तसेच तिसरा प्रश्न असा आहे की, ५२७९ शाळांचे वीज देयक थकीत आहे त्याबद्दल शासनाची भूमिका काय आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, मी अगोदर दिलेल्या उत्तरात स्पष्टपणे नमूद केले आहे की, मागील वर्षी सादिल अनुदान दिले आणि या वर्षीच्या सादिल अनुदानाबाबत देखील सांगितले. मागील वर्षीच्या सादिल अनुदानामध्ये जवळपास ५ कोटी ५८ लाख रुपये हे केवळ वीज बील भरण्यासाठी दिले. या वर्षी सुद्धा शाळांची वीज जोडणी करण्यासाठी ३४ कोटी उपलब्ध आहेत. यापैकी १२ कोटी रुपये जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा भाड्याच्या इमारतीमध्ये सुरु आहेत त्यांचे भाडे अदा करण्यासाठी देणार आहोत आणि उर्वरित निधी हा वीज देयक भरण्यासाठी देणार आहोत. या व्यतिरिक्त मी सांगितले आहे की, या विषयी माननीय ऊर्जा मंत्र्यांशी चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या शाळांच्या दुरुस्तीसाठी कुठून निधी उपलब्ध करणार आहात असे विचारले होते. या अनुषंगाने मी सांगितले की, निजामकालीन शाळांसाठी सरकारच्या वतीने १६० कोटी रुपये पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त सीएसआर फंडातून आम्ही काय प्रयत्न

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ....

करीत आहोत हे देखील सांगितले आहे. तसेच ५३ कोटी रुपये आदर्श शाळांच्या माध्यमातून या शाळांना देत आहोत. मराठवाड्यातील एकूण तीन पालकमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आम्ही डीपीसीमधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची फाईल वित्त विभागाकडे सादर केली आहे. डीपीसीतून काही निधी शाळांना उपलब्ध झाला पाहिजे, अशी मागणी केली आहे. आम्ही मागणी केली आहे की, डीपीसीतून ६० टक्के निधी जिल्हा परिषदांच्या शाळांच्या दुरुस्तीसाठी राखीव ठेवला पाहिजे. यामध्ये संरक्षण भिंत, वर्गखोल्या, ग्रंथालय किंवा इतर बाबी असतील . या बाबतचा तपशील वित्त विभागाकडे सादर केला आहे. वित्त विभागाने यास मान्यता दिली तर प्रत्येक जिल्ह्यामध्ये या कामासाठी डीपीसीतून ६० टक्के निधी राखीव राहील.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना ही केवळ मराठवाड्यापुरती मर्यादित नसून संपूर्ण राज्यातील सर्व शिक्षण संस्थांशी संबंधित आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी एनर्जी ॲक्ट-१९५८ अस्तित्वात होता. त्या ॲक्टमधील तरतुदीनुसार बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट किंवा इंडियन सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टमध्ये ज्या संस्थांनी नोंदणी केलेली आहे त्या संस्थांना इलेक्ट्रीसिटी ड्यूटी एक्झम्प्टेड होती. परंतु कालांतराने त्या ड्युटीमध्ये जी प्रोव्हीजन होती ती बदलली. आता कमर्शियल रेटने ती ड्युटी वसूल केली जात आहे. मी विचारु इच्छितो की, या संस्थांना कमर्शियल रेटऐवजी इंडस्ट्रीयल रेट लावण्यात येतील काय ? केवळ शासकीयच नव्हे तर विनाशासकीय अनुदानित महाविद्यालये किंवा विनाशासकीय विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे या शैक्षणिक संस्थांना एक्झम्पशन देण्यासाठी कायद्यात बदल करण्यात येईल काय ?

**उप सभापती** : माननीय ऊर्जा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांची या प्रश्नाला उत्तर देण्याची इच्छा आणि तयारी असेल तर ते उत्तर देऊ शकतात. जेणेकरुन या प्रश्नाला न्याय मिळू शकेल.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदया, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेला सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांकडून जी मागणी करण्यात आली आहे, ती मागणी निश्चितपणे तपासून घेऊन त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्याप अपूर्ण असणे.

**मु.शी.** : मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्याप अपूर्ण असणे, यासंबंधी सर्वश्री प्रव◌ीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, गोप◌ीचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, ॲड. निलय नाईक, सर्वश्री प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रवीण दरेकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय◌ा, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई-गोवा महामार्गाचे काम सन २०११ मध्ये सुरू झाले असून दोन वेळा कंत्राटदार बदलूनही मोठ्या प्रमाणात काम अद्याप अपूर्ण असणे, अनेक ठिकाणी कामे अर्धवट अवस्थेत असणे, त्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना धुळीचा व खड्ड्यांचा सामना करावा लागत असून पावसाळ्यात या संपूर्ण भागात चिखलाचे साम्राज्य पसरत असल्यामुळे अपघाताचे प्रमाणही वाढलेले असणे, मागील दशकापासून मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू असूनही ते पूर्ण न झाल्यामुळे कोकणचा विकास रखडला असणे, महामार्गाच्या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यांमुळे पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्या नादुरुस्त झाल्या असून लगतच्या गावांमध्ये पाणी टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण झाली असणे, कंत्राटदाराकडून नादुरुस्त पाणी पुरवठा वाहिन्या दुरुस्त करुन घेण्याबाबत शासनाकडून कोणताही पुढाकार घेतला जात नसणे, महामार्गाचे काम तातडीने पूर्ण होण्याची तसेच नादुरुस्त पाणी पुरवठा वाहिन्या दुरुस्त करुन दिल्याशिवाय कंत्राटदारांना देयक अदा न करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,

श्री.प्रवीण दरेकर...

परिणामी कोकणवासियांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री.अशोक चव्हाण (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री ) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणच्या विकासाला गतीने पुढे नेणारा अत्यंत महत्त्वाचा महामार्ग आहे. राज्यकर्त्यांनी ठरविले तर समृद्धी महामार्गाप्रमाणे हा महामार्ग देखील वेळेत पूर्ण होऊ शकतो. या रस्त्याची जबाबदारी केंद्र शासनाची की राज्य शासनाची हा प्रश्न मला उपस्थित करावयाचा नाही. आमचे म्हणणे एवढेच आहे की, हा महामार्ग कोकणातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. होळीला लोक मोठ्या प्रमाणावर गावी जातात. माझे या निमित्ताने तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. या महामार्गाच्या कंत्राटदाराला दोन वेळा मुदतवाढ दिली. परंतु अद्यापपर्यंत कामे पूर्ण झालेली नाहीत. कामे पूर्ण न होण्यामागे नेमकी काय कारणे आहेत, या कामावर आतापर्यंत किती खर्च झाला आणि हे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे ?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

विलंब झाल्याप्रकरणी कंत्राटदारावर कारवाई करणार आहात का ? मागील पावसाळ्यात या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात घडले होते. दोन महिन्यांनंतर पाऊस सुरु होईल. अर्धवट कामांमुळे अनेक भागांत तेथे हायवेला चिखल तयार होतो आणि अपघात घडतात, या संदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, कारण मागे पाऊस पडला, दरड कोसळली, मी कोकणात दौऱ्यावर होतो, त्यावेळी रस्त्यावर पाणी तुंबले होते, त्या संदर्भात कोणती दक्षता घेतली आहे ? सिमेंटचे रस्ते तयार करीत असताना अनेक पॅचेसमध्ये पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्या नादुरूस्त झाल्या आहेत. उन्हाळा सुरु झालेल्या कोकणातील अनेक गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. शासनाने अशा क्रॉस होणाऱ्या नादुरुस्त वाहिन्यांचे सर्वेक्षण केले आहे, त्यांचा आराखडा तयार केला आहे का आणि हा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करणार आहात का ? आज गावांत त्या पाण्याच्या वाहिन्यांमुळे पाणी मिळत नाही. माझी या संदर्भात विनंती आहे. केंद्र व राज्य सरकार अशा आपण खूप बैठका घेत आहात. प्रामाणिक प्रयत्न देखील होत आहेत. परंतु आता याची नेमकी सद्य:स्थिती काय आहे आणि कोकणच्या जनतेला कधीपर्यंत हा महामार्ग उपलब्ध करुन देणार आहात ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या संदर्भात एकाच वेळी ३-४ प्रश्न विचारले आहेत. त्या संदर्भातील संपूर्ण माहिती देण्याची आणि त्यांचे व कोकणातील जनतेचे समाधान होईल असे सकारात्मक उत्तर देण्याची निश्चितपणे माझी भूमिका राहणार आहे. पहिले म्हणजे हा विषय राज्य सरकारचा किंवा केंद्र सरकारचा अशी टोलवाटोलवी करण्याची माझी भूमिका आजिबात नाही. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्याला हे काम पूर्ण करायचे आहे. राज्य सरकार हा रस्ता पूर्णत्वास नेण्याच्या बाबतीत काम करीत आहे. ४७१ कि.मी.चा महामार्ग - पनवेल ते झारप हा मार्ग म्हणजे पनवेल ते इंदापूर आणि इंदापूर ते झारप असा ८४ कि.मी. अधिक ३६६ कि.मी. असा मिळून ४७१ कि.मी. चा हा राष्ट्रीय महामार्ग आहे. मुद्दा असा आहे की,

श्री. अशोक चव्हाण ....

येथे वर्क ऑर्डर देणे, कंत्राटदार नेमणे हे सर्व विषय संपूर्णपणे केंद्रीय मंत्र्यांशी संबंधित आहेत. केंद्र सरकारच्या अखत्यारितील हा विषय आहे. सध्या ही सर्व कामे नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडिया आणि नॅशनल हायवे दोन्ही संयुक्तपणे मिळून एक्झिक्युट करीत आहेत. परंतु हे महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर मुंबईमध्ये सह्याद्री अतिथीगृहामध्ये जवळपास ३ ते ४ बैठका श्री. नितीन गडकरी विभागाचे माननीय मंत्री यांच्या उपस्थितीत झाल्या आहेत, त्या बैठकींमध्ये या सर्व गोष्टींचा पाठपुरावा सुरु आहे, हे मला मुद्दाम नमूद केले पाहिजे.

सभापती महोदया, जवळपास १२ पॅकेजेस आहेत. १२ ठिकाणी वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये ही कामे सुरु आहेत. मी पूर्ण माहिती घेतली आहे. मला खरी अडचण अशी दिसत आहे की, माणगाव तालुक्यामध्ये इंदापूर ते वडपाले या सेक्शनमध्ये ४० टक्के काम झाले आहे. ते काम चेतक ॲप्को जॉईंट व्हेंचर यांच्याकडे देण्यात आले आहे. सन २०१७ मध्ये या कामाची वर्कऑर्डर झाली. जवळपास या सेक्शनमधील हे काम रेंगाळलेले आहे. आता त्याचा कालावधी वाढवून देण्यात आला आहे. २ कारणे यासाठी आहेत. राज्यात वनजमिनीचा प्रश्न बऱ्याच ठिकाणी आहे. वनजमिनीच्या संदर्भात बैठका घेऊन तो प्रश्न बऱ्याच ठिकाणी मार्गी लावलेला आहे. भूसंपादनाच्या मोबदल्याच्या फॉर्म्युल्याच्या संदर्भात काही विषय मध्यंतरी झाले होते. त्यामध्ये जवळपास वर्ष गेले. कारण केंद्र सरकारचे म्हणणे असे होते की, महाराष्ट्र हे एकच राज्य असे आहे की, जेथे भूसंपादपाची किंमत फार अवास्तव होऊ लागली आहे. पूर्वीचा घटक गुणांक होता, तो २ गुणांक असायचा. दिनांक ६.१०.२०२१ रोजी एक नवीन शासन निर्णय काढला आहे. केंद्र सरकारशी चर्चा झाल्यानंतर हा शासन निर्णय काढला आहे. गुणांक २ ऐवजी १ धरण्यात आला आहे, हा बदल चालू किंवा प्रगतीपथावर असलेले नॅशनल किंवा स्टेट हायवे आहेत, त्यांच्या प्रकरणी लागू होणार नाही. नवीन अक्विझिशन होईल त्यांना हा बदल करावा लागणार आहे. या

श्री. अशोक चव्हाण ....

शासन निर्णयाप्रमाणे जमिनीच्या रेडिरेकनरप्रमाणे जे मूल्यांकन येईल, त्याच्या गुणिले १ गुणांक ही रक्कम ठरविली जाईल. येणारी रक्कम त्या पध्दतीने रेडिरेकनरच्या दरापैकी मूल्यांकन काढून आणि ते दर २० टक्के कमी करुन गुणांक १ ने गुणाकार करुन तो मोबदला देण्याच्या नवीन शासन निर्णयबाबत श्री. नितीन गडकरी, माननीय केंद्रीय मंत्री यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत विचार झाला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, महाराष्ट्रामधील भूसंपादनाचे दर खूप जास्त आहेत. ते थोडे रॅशनलाईज केले पाहिजेत. संपूर्ण देशात वेगळी परिस्थिती आहे आणि महाराष्ट्रात वेगळी परिस्थिती आहे. त्यामुळे असा नवीन शासन निर्णय आला आहे. तो प्रश्न मार्गी लागला आहे. भूसंपादनासाठी लोकांनी रस्ते अडविले होते, बऱ्याच ठिकाणी कामे होत नव्हती. त्यामुळे हा विषय आता हाती घेतला आहे.

सभापती महोदया, दुसऱ्या सेक्शनमध्ये असलेल्या अडचणीचा विषय आहे. चिपळूण तालुक्यातील परशुराम घाट ते आरवली असा भाग आहे. हे काम जवळपास ५२ टक्के पूर्ण झाले आहे. त्यामध्ये देवस्थानच्या भुसंपादनाचा काही विषय होता. तो वाद निर्माण झाला होता. आता तो विषय मिटलेला आहे. आता काम प्रगतीपथावर आहे. हे संपूर्ण काम अंदाजे दिनांक ३१ मे, २०२३ पर्यंत पूर्ण व्हावे असा प्रयत्न आहे. शेवटचे दोन विषय आहेत. आरवली ते काणटे हा भाग संगमेश्वर तालुक्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील आहे. हे काम मध्यंतरी १८ टक्के झाले होते. तेथे एमईपी कंपनीला सबस्टिट्यूट करुन रोडवेज इन्फ्रा सोल्युशन अशा नवीन कंपनीला केंद्र सरकारने दिले आहे. ते काम डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. काणटे ते वाकेड हा रत्नागिरी व लांजा तालुक्यातील भाग आहे. तेथे देखील १७ टक्के काम पूर्ण झाले होते. ते काम मागे पडले होते. आता तेही काम दिनांकि ३१.१२ म्हणजे पुढच्या डिसेंबर, २०२३ पर्यंत होण्याचे नियोजित आहे. ते काम एमईपी कंपनीकडे होते. सबस्टिट्यूट करुन त्यांच्या जागी आता रोडवेज इन्फ्रा सोल्युशनची नियुक्ती करण्यात आली आहे. हे काम डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन

श्री. अशोक चव्हाण ....

आहे. चारच ठिकाणी सेक्शन्स आहेत, तेथे अडचणी होत्या. ही वस्तुस्थिती आहे. केंद्र सरकारने त्यांना जवळपास २-३ एक्स्टेंशन्स अनेक ठिकाणी दिली आहेत. आमचा त्यास विरोध होता.

सभापती महोदया, मी माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी साहेबांना बैठकीमध्ये सांगितले होते की, अशा लोकांना एक्स्टेंशन्स देऊ नका. ते कोर्टात चालले आहेत, एक्स्टेंशन्स, पैसे घेऊन ते चालले आहेत. ते मोबिलाईज ॲडव्हान्स घेतात आणि कामे करीत नाहीत. तुम्ही अशा लोकांना कामे देऊ नका. मी अशी विनंती केली होती. आता त्यांनी असा निर्णय घेतला आहे की, या चारही ठिकाणी त्यांनी सबस्टिट्यूट कॉंट्रॅक्टर नेमले आहेत आणि त्यामुळे आता कामांना गती आली आहे. सारांश असा आहे की, बरीचशी कामे आता यावर्षी डिसेंबरपयर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. बाकीची कामे मे, २०२३ पर्यंत पूर्ण होतील असे आम्ही प्रयत्न करीत आहोत. हे अतिशय महत्त्वाचे आहे. मुंबई-गोवा महामार्गावर जवळपास २७ पीसीयू ते ४५ हजार पीसीयू एवढी ट्रॅफिक आहे. थोडक्यात असे की, ही लांबी एकूण ४७१ कि.मी. आहे, त्यापैकी २७७ कि.मी.चे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित १६१ कि.मी.चे काम आहे. १६१ कि.मी.च्या कामाचा यावर्षी डिसेंबरपर्यंत बहुतांश भाग पूर्ण होईल आणि पुढील मे, २०२३ पर्यंत उर्वरित काम पूर्ण होणार आहे. आजच्या दिवशी या सर्व कामांची प्रगती साधारणपणे ६७ टक्के आहे. उर्वरित कामे करायची आहेत.

सभापती महोदया, जल वाहिन्याच्या संदर्भातील दुसरा विषय सांगितला आहे. आपल्याला कल्पना आहे की, एखादा रस्ता हाती घेतल्यानंतर आपल्याला तेथील युटिलिटिज शिफ्ट कराव्या लागतात. त्यामध्ये गटारी, इलेक्ट्रिकल लाईन्स, वॉटर कनेक्शन्स आहेत. आम्ही या कामांची सर्व अंदाजपत्रके तयार करुन .... पाणीटंचाई होऊ नये याकरिता एमजेपी देखील त्या कामांवर देखरेख करीत आहे. पाण्याची कमतरता होऊ नये हे पाहत आहे. कुठेही गंभीर अडचण नाही. रस्त्यांचे काम सुरु

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण ....

केल्यानंतर डायव्हर्शन करावे लागतात. रस्ते खोदावे लागतात, ही अडचण आहे. परंतु पाणीटंचाई तीव्र होत आहे असा विषय नाही. एमजेपी त्याकडे लक्ष देऊन आहे. ७० टक्के योजनांची शिफ्टिंगची कामे देखील जवळपास पूर्ण झाली आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.अशोक चव्हाण......

थोडी फार किरकोळ कामे राहिली असतील परंतु कोठे पाण्याची तीव्रता आहे असा विषय नाही. या कामाला गती द्यावयाची आहे. कोविडमुळे कामांबाबत काही निर्बंध होते त्यामुळे कामे होऊ शकली नाहीत. हा प्रकल्प रेंगाळलेला असून केंद्र शासनासोबत सातत्याने संपर्क साधून काम केले जात आहे. हे काम आमचे नाही असे आम्ही म्हणत नसून हे काम केंद्र शासनाचे असले तरी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करुन बैठका घेण्यात आल्या. केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी व मुख्यमंत्री महोदय या बैठकांना स्वत: उपस्थित होते. हा रस्ता पूर्ण झाला पाहिजे व महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना मिळावी तसेच गोव्यासाठी हा रस्ता महत्वाचा असल्यामुळे हे काम तातडीने व्हावे अशी शासनाची धारणा आहे.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिले आहे तरी देखील मी सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी देत आहे. त्यांनी पुन्हा पुन्हा तेच प्रश्न विचारु नयेत. काही उप प्रश्न असतील तर तेवढे विचारावेत.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदया, या लक्षवेधी सूचनेला मंत्री महोदयांनी अतिशय तपशीलवार उत्तर दिले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आता होळी सण आलेला आहे. फार मोठ्या प्रमाणात चाकरमानी कोकणात जात असतात. होळीच्या दृष्टीने या रस्त्यांसाठी काय नियोजन करण्यात आले आहे. या रस्त्यांवर वारंवार अपघात होतात. होळी नंतर पावसाळा येणार आहे त्या दृष्टीने काय उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. कोकणातील बरेच लोक गणपती व होळीच्या वेळी गावी जातात. त्यावेळी या रस्त्यांवर भरपूर वाहतूक कोंडी होत असते. या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम वेळोवेळी सुरु असते. ज्या ठिकाणी खूप अडचणी आहेत, तेथील अधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तेथील खड्डे भरुन सदर रस्ता जेवढा सुरळीत करता येईल तेवढा करण्यात येत आहे. हा रस्ता डिसेंबर,

श्री.अशोक चव्हाण....

२०२२ पर्यंत व उर्वरित कामे मे २०२३ पर्यंत करण्याचे नियोजन असून त्यानुसार मी आढावा घेतला आहे. काही ठिकाणी युजलेस कंत्राटदार होते त्यांना काढून नवीन कंत्राटदारांच्या नियुक्त्या केलेल्या असल्यामुळे डिसेंबर, २०२२ व उर्वरित कामे मे २०२३ पर्यंत मार्गी लागतील. काही ठिकाणी छोटे मोठे प्रश्न आहेत. अनेक लोक होळी व गणपतीच्या सणाला गावी जातात त्याची मला जाणीव आहे. जेथे रस्त्याची खूप वाईट अवस्था आहे तेथे तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश विभागाला देण्यात आले आहेत.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदया, मुंबई-गोवा महामार्गाबाबत मी या सभागृहात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यास आज चार वर्षे झाली आहेत. एक तप होऊन देखील पनवेल ते इंदापूर या रस्त्याचे ८४ किलोमीटरचे काम अपूर्ण आहे. सन २०१७ पासून रायगड जिल्ह्यात जे अपघात झाले ते मी सांगतो. सन २०१७ मध्ये रायगड जिल्ह्यात ३६२ अपघात झाले, सन २०१८ मध्ये ३९०, सन २०१९ मध्ये ३१५, सन २०२० मध्ये २५० व सन २०२१ मध्ये १९० अपघात झाले आहेत. हे सर्व अपघात रस्त्यांमुळे झाले असे म्हणण्याचे कारण नाही. यामध्ये काही मानवी चुका असू शकतात. परंतु जास्तीत जास्त अपघात हे रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे झाले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बरेच मुद्दे मांडले आहेत, मंत्री महोदयांनी त्याबाबत सविस्तर उत्तर दिले आहे. कोकणवासियांवरील अन्याय कधीपर्यंत दूर होईल हा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. आपण मघाशी सांगितले मी, मे २०२३ पर्यंत या रस्त्यांची सर्व कामे पूर्ण होतील. आता ६७ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. मात्र उर्वरित ३३ टक्के कामे कोठे अडली हे अद्याप समजत नाहीत. १२ वर्षापूर्वी करण्यात आलेले स्ट्रक्चरल डिझाईन तसेच पडून आहे. तेथील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे गरजेचे आहे. याबाबत मंत्री महोदय निर्णय घेणार आहेत काय ? एओपी व बीओपींची कामे अपूर्ण आहेत ती कधीपर्यंत पूर्ण होणार आहेत. या रस्त्यांच्या कामांमुळे अनेक गावातील पाणी पुरवठा योजना नादुरुस्त झाल्या आहेत. त्याबाबत आपण उत्तर दिले आहे. परंतु खांब,नागोठणे, कुई, कोलाड, आंबेवाडी या ग्रामपंचायतींच्या पाणी

श्री.अनिकेत तटकरे....

पुरवठा योजनांसाठी निधीची मागणी करुन निधी मिळालेला नाही. त्यामुळे त्या योजना दुरुस्त होऊ शकत नाही. याबाबत योग्य पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल काय ? अजून रस्ता अपूर्ण असून तेथे टोलनाके उभारले आहेत. पनवेल पासून झारापपर्यंत जाणारा रस्ता जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत टोल आकारणी केली जाणार नाही अशी घोषणा मंत्री महोदयांनी करावी अशी माझी मागणी आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे यांनी भरपूर प्रश्न विचारले आहेत. पनवेल ते इंदापूर या सेक्शनमधील त्यांचा प्रमुख प्रश्न आहे. या कामाचा कंत्राटदार सुप्रीम पनवेल-इंदापूर टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड होता. या कंत्राटदाराची वर्क ऑर्डर सन २०११ मध्ये देण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे. त्या कंत्राटदाराला दिनांक १७/११/२०२१ रोजी टर्मिनेट करण्यात आले आहे. या रस्त्याच्या ६३ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. सदर कंत्राटदाराने टर्मिनेशनच्या विरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्याची सुनावणी १५ मार्च २०२२ पर्यंत अपेक्षित आहे. सदर रस्त्याचे काम थांबलेले नसून त्याने उशीर करुन तो कोर्टात गेलेला आहे. त्याचे काय मुद्दे आहेत ते मला माहिती नाही परंतु तो कोर्टात गेला ही वस्तुस्थिती आहे. अपघात होतात ही बाब खरी आहे. सन २०१२ नंतर रायगड जिल्ह्यातील अपघातांची संख्या कमी झालेली आहे. सन २०१२ मध्ये १५० अपघात झाले होते. सन २०२२ मध्ये १६ अपघात झाले आहेत. १६ अपघात देखील जास्त आहेत. अपघात होतात हे मी नाकारीत नाही. त्यामध्ये सुधारणा झाली असली तरी अपघात होता कामा नये. मानवी हानी होऊ नये याकडे लक्ष देण्याची आमची भूमिका आहे. टोल बंद करणे हा केंद्र शासनाचा विषय आहे. हा रस्ता त्यांनी तयार करण्यास घेतला आहे. टोल बंद किंवा चालू करण्याबाबत सभागृहाच्या भावना मी त्यांना कळवेल. यासंदर्भातील निर्णय केंद्र शासनाला घ्यावा लागणार आहे. जलवाहिन्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. जलवाहिन्या शिफ्ट करण्यात येत आहेत, त्यांची देयके महामार्ग विभागामार्फत देण्यात येतात. त्यासंदर्भातील नुकसान भरपाई त्यांच्याकडून देण्यात येते. त्यामुळे

असुधारित प्रत

श्री.अशोक चव्हाण....

याबाबत ग्रामपंचायतीवर कोणताही भार येणार नाही. जेथे जलवाहिन्या बदलण्याची किंवा नवीन टाकण्याची गरज आहे त्याचे पैसे केंद्र शासनामार्फत देण्यात येतात.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी अतिशय तपशीलवार व चांगले उत्तर दिले आहे. भूसंपादनाबाबत वन जमिनीची अडचण आहे, त्याबाबत शासन कार्यवाही करीत आहे. सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत आपण रस्त्याची डागडुजी करण्याचे मान्य केले आहे. होळी किंवा गणपतीला कोकणात जाताना मुलांना घेऊन ८ ते १० तास वाहतूक कोंडीत अडकून रहावे लागते. पर्यायी सर्व्हीस रोड आहेत ही अल्टरनेटीव्ह व्यवस्था आहे, त्याबाबत वाहतूक पोलिसांची एक बैठक घ्यावी. होळीसाठी मुंबईवरुन निघाले तर १० तास कोकणातील गावात जाण्यासाठी लागतात. असा प्रकार गणपतीच्या वेळी देखील होतो. याबाबत वाहतूक पोलीस व कोकणातील संबंधित सन्माननीय सदस्यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी. होळीसाठी यावेळी ४ ते ५ तासात सुखरुप पोहचता येईल अशी आपण व्यवस्था करावी.

श्री.अशोक चव्हाण: सभापती महोदया, एक संयुक्त बैठक घेण्यात येईल.जेथे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो त्या जागा शोधून तेथे पर्यायी मार्ग कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येईल याकडे लक्ष देण्यात येईल.

-------

**उप सभापती** : लक्षवेधी क्रमांक ५ बाबत मी सभापती महोदयांचे मागदर्शन घेतले असून ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल. त्यामुळे ती बाब सभागृहाने मान्य करावी. आता लक्षवेधी सूचना क्रमांक ६ चर्चेला घेण्यात येईल.

**पृ.शी.** : मराठवाड्यातील शेतकऱ्यांना रब्बी पिकांसाठी पाणी देण्यासाठी तेथील वीज पुरवठा सुरळीत करणे

**मु.शी.** : मराठवाड्यातील शेतकऱ्यांना रब्बी पिकांसाठी पाणी देण्यासाठी तेथील वीज पुरवठा सुरळीत करणे यासंबंधी श्री. अंबादास दानवे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अंबादास दानवे ( औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय‍ा, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यावर्षी मराठवाडयातील शेतकऱ्यांकडे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असतानाही केवळ वीजेअभावी शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देता येत नसल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये उघडकीस येणे, मागील आठ दिवसापासून भोकरदन येथील २२० केव्हीचे रोहित्र जळाल्याने तालुक्यातील सात विद्युत उपकेंद्रावरील शेतातील ४०० विद्युत रोहित्रावरील वीज पुरवठा विस्कळीत होणे, परिणामी शेतकरी प्रचंड त्रस्त होणे, आधीच अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर, कापूस, मका आदि पिके नष्ट झाल्याने शेतकरी मेटाकुटीस आलेला असताना आता रब्बी हंगामातील पिकांना वीजेअभावी पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर ओढावलेले आर्थिक संकट, रब्बी हंगामातील पिके अंतिम टप्प्यात असल्याने पिकांना पाण्याची आवश्यकता असताना पाणी मिळत नसल्याने पिकांचे होत असलेले नुकसान, वीज पुरवठा सुरळीत करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

डॉ.नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय‍ा, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अमरनाथ राजूरकर )**

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, मराठवाड्यातील शेतकरी सातत्याने दुष्काळाने त्रस्त आहेत. सदर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील ट्रान्सफॉर्मर संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. एका तालुक्यात दोन ट्रान्सफॉर्मर आहेत. सदर ट्रान्सफॉर्मर दिनांक ९/२/२०२२ रोजी बंद पडले होते. दिनांक २०/२/२०२२ पर्यंत ट्रान्सफॉर्मर बंद होते. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात चक्राकार पद्धतीने वीज वितरण करण्यात आल्याचे नमूद केले आहे. मुंबई शहरात ४० मिनिटे वीज गेली तर हाहाकार माजतो. परंतु ग्रामीण भागातील तालुक्यात ११ ते १२ दिवस वीज मिळत नाही. अधिकारी बेफिकिरीने, बेमुर्वतखोरपणे शेतकऱ्यांबरोबर वर्तन करतात. माझा प्रश्न असा आहे की, दिनांक ९/२/२०२२ ते दिनांक २०/२/२०२२ असे १२ दिवस ट्रान्सफॉर्मर सुस्थितीत येण्यासाठी लागतात. आज शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी आहे, पिके चांगली आहेत, कृषी पंपासाठी विजेची आवश्यकता आहे. परंतु ११ ते १२ दिवस रोहित्र दुरुस्त होत नसतील तर ऊर्जा विभाग या संदर्भात कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहे ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांनी जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील घटनेविषयी प्रश्न उपस्थित केलेला आहे. भोकरदन तालुक्यात महापारेषण कंपनीचे २०० केव्हीचे उप केंद्र होते. सदर उपकेंद्रात २५ एमव्हीए क्षमतेचे २ पॉवर ट्रान्सफॉर्मर आहेत. त्यापैकी पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र.१ दिनांक ९/२/२०२२ रोजी सकाळी ८.४२ वाजता हसनाबाद फिडरवरील तांत्रिक बिघाडामुळे नादुरुस्त झाला. त्यामुळे तो अंदाजे सकाळी १०.०० वाजता पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र.२ वर जोडण्यात आला आणि हसनाबाद उपकेंद्र वगळता ८ उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या कृषी फिडरवरील १२३० रोहित्रांवरील १०८७४ कृषीपंप ग्राहकांना चक्राकार पद्धतीने प्रत्येकी ४ तास विद्युत पुरवठा करण्यात आला. आपण सांगितले की, शेतकऱ्यांना शेतीला पाणी देणे शक्य झाले नाही. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. कृषीपंप ग्राहकांना चक्राकार पद्धतीने विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देण्यात

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत.....

आलेला आहे. या व्यतिरिक्त सदरील आठही उपकेंद्रांवरील गावठाण फिडर २४ तास सुरु होते. ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यानंतर ते दुरुस्त करण्यासाठी एवढा वेळ का लागला असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे ? मी सांगू इच्छितो की, २२० केव्ही उपकेंद्रातील २५ एमव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरचे वजन ५० ते ६० टन असते. त्यामुळे विशेष ट्रेलरने त्यांची वाहतूक करावी लागते. त्यामध्ये साधारणत: ३० ते ३५ हजार लिटर ऑईल असते. सदर ऑईल काढून ट्रान्सपोर्ट करणे हे स्पेशलाईड स्कील वर्क आहे. त्यामुळे यासाठी उशीर लागतो. तसेच, हे सर्व करीत असताना ट्रान्सफॉर्मरच्या इलेक्ट्रिक चाचण्या केल्या जातात. ऑईल फिल्टरेशन तपासणी केली जाते. इलक्ट्रिक चाचण्यांमध्ये वाईंडिंग, बुशिंग, प्रोटेक्शन आणि कन्ट्रोल सर्किटची तपासणी केली जाते. ऑईल फिल्टरेशनची तपासणी करीत असताना सदर ऑईल नॅशनल ॲक्रिडेटेड ब्युरो लेबॉरेटरी यांच्याकडे पाठवावे लागते. साधारणत: ३ ते ४ सायकलसाठी २ ते ३ दिवस लागतात. त्यामुळे विलंब झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या विहिरीला पाणी उपलब्ध होते. परंतु ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त असल्यामुळे कृषी पंपासाठी वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात आला नाही. आपण जे सांगितले तशी परिस्थिती नसून कृषी पंपासाठी वीज पुरवठा सुरु होता.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. आपण प्रत्येक विभागात २५ एमव्हीएच्या १०-२० अधिकच्या ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करुन ठेवली पाहिजे. कारण २५ किंवा ४० एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यानंतर ते दुरुस्त करण्यासाठी ४-५ दिवस लागतात. महापारेषण कंपनीने अधिकच्या ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था केली तर असे प्रश्नच निर्माण होणार नाहीत. पूर्वीच्या काळात असे प्रश्न निर्माण होत होते. परंतु आपण नवीन

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करुन ठेवत होतो. २५ एमव्हीए क्षमतेचा स्टॉक तयार करुन तो स्टॉक त्या त्या विभागात ठेवला तर एकाच दिवशी ट्रान्सफॉर्मर बदलता येतील. शासन या दृष्टीने प्रयत्न करणार आहे काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मी आपल्या माध्यमातून २-३ प्रश्न विचारणार आहे. उपसा सिंचन योजनांमुळे सन २०१४ नंतर अनेक दुष्काळी पट्टयात पाणी उपलब्ध झालेले आहे. आता अनेक ठिकाणी दुष्काळी भागातील क्षेत्र बागायती झालेले आहे. माझ्या आटपाडी तालुक्यात ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. पूर्वीची एमएसईबीची रचना आहे तशीच आहे. ६३ एमएव्हीच्या ट्रान्सफॉर्मरवर जवळपास १०० एमएव्ही क्षमतेचा लोड आहे, १०० एमएव्ही क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरवर १५० एमएव्ही क्षमतेचा लोड आहे. त्यामुळे कृषी पंपासाठी व्यवस्थित वीज पुरवठा होत नाही. विजेची मागणी जास्त आहे. अनेक ट्रान्सफॉर्मरवर ओव्हरलोड आहे. शासन अशा ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करुन देणार आहे काय ? दुसरे म्हणजे शेतकऱ्यांनी विजेचे बिल भरले नाही म्हणून विजेचे कनेक्शन कट केले जाते. मध्यंतरी सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत व मी ऊर्जा विभागाच्या कार्यालयावर मार्चा काढला होता. आम्ही त्यावेळी एमएसईबीच्या चुका पुराव्यासह निदर्शनास आणून दिल्या होत्या. ५ एचपीचा पंप असेल तर ७.५ एचपीचे बिल दिले जाते आणि ७.५ एचपीचा पंप असेल तर १० एचपीचे बिल दिले जाते. मागील महिन्यात विजेचे बिल भरले तरी दोन महिन्यानंतर विजेचे वाढीव बिल दिले जात आहे. आम्ही अधिकाऱ्यांकडे विनंती केली की, शेतकरी विजेचे पैसे बुडवित नाहीत. शेतकऱ्यांची तशी मानसिकता नाही. शेतकऱ्यांनी जेवढी वीज वापरली तेवढ्याच विजेचे तो पैसे देऊ शकतो. आपण वाढीव बिलाची आकाणी केलेली आहे. त्यामुळे आपण एमएसईबीच्या माध्यमातून प्रत्येक गावात बिल दुरुस्तीचे कॅम्प आयोजित करणार आहात काय ? आपण आज तशी घोषणा करावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर.......

परवा पंढरपूर येथील तरुण शेतकऱ्याने विष प्राषण करुन जीवन संपविले. कदाचित, तो व्हिडिओ आपण बघितला असेल. शेतकरी नामर्द आहे, शेतकऱ्याच्या जन्माला कधीच येणार नाही, असे म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आलेली आहे. तो तरुण शेतकरी औषध प्राषण करुन मृत्युमूखी पडलेला आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्याला ही गोष्ट शोभणारी नाही. ग्रामीण भागात खूप अडचणी आहेत. शासनाने एमएसईबी संदर्भात योग्य धोरण ठरवावे, अशी माझी विनंती आहे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी जी सूचना केली ती स्वागतार्ह आहे. माझ्या ऊर्जा विभागाने निर्णय घेतलेला आहे की, यापुढे शेतकऱ्यांना त्रास होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वीज बिलाची दुरुस्ती वेळीच झाली पाहिजे आणि जास्तीची वीज बिले दिली असतील तर ती तपासून घेतली पाहिजेत. आपण त्याप्रमाणे संबंधिताना सूचना दिलेल्या आहेत. तसेच, त्यांनी कॅम्प आयोजित करता येतील काय अशी विचारणा केलेली आहे. कॅम्प आयोजित करण्यास हरकत नाही.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, ट्रान्सफॉर्मरवर लोड आल्यामुळे नादुरुस्त होतात. शासनाने जेथे मागणी आहे तेथे नवीन ट्रान्सफॉर्मर देण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. शासन त्या प्रमाणे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करुन देणार आहेत काय ? दुसरे म्हणजे उन्हाळा सुरु झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर विजेची मागणी वाढते. परवा माझ्या वाचनात आले की, राज्यात लोडशेडिंग होऊ शकते. ग्रामीण भागात कृषी पंपासाठी किती तासाचे लोडशेडिंग असणार आहे, किती तास वीज पुरवठा करण्यात येणार आहे ? भविष्यात तांत्रिक चुका टाळण्यात याव्यात. तसेच, वीज निर्मितीसाठी कोळसा उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याबाबत शासन काळजी घेणार आहे काय ?

यानंतर श्री.गागरे........

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, ट्रान्सफॉर्मर व इतर साहित्य उपलब्ध होणार आहे का याबाबत सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. तसेच याबाबत मी सांगू इच्छितो की, विविध ठिकाणी ऑईल व ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. दुसरा मुद्दा लोडशेडींगबाबत त्यांनी विचारला आहे, याबाबत मी सांगू इच्छितो की, तुर्त तरी लोडशेडींगचा मुद्दा कोठेही नाही.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांनी शेतकऱ्यांच्या विजेच्या कनेक्शनबाबत व ट्रान्सफॉर्मरबाबत महत्वाचा विषय मांडला आहे. मी विचारु इच्छितो की, ट्रान्सफॉर्मरवर जी वीज कनेक्शन असतात, त्यात वीज बिले अवाजवी असतात, परंतु काही लोकांनी बिले भरली नाहीत तर तो ट्रान्सफॉर्मर उतरविला जातो. ४० कनेक्शन असतील, १० लोकांनी भरले नाही तर तुम्ही इतर ३० लोकांना का भुर्दंड लावता. माझी विनंती आहे की, याबाबत तुम्ही कसे व काय करणार. ५० पैकी ४५ लोकांनी बिले भरली व ५ लोकांनी भरली नाही तर ४५ लोकांना कशाला वेठीस धरता. माझी विनंती आहे की, त्याबाबत आपण भूमिका घ्यावी.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, हा अत्यंत ज्वलंत व गंभीर असा मुद्दा असून तो आमच्या लक्षात आहे, त्याबाबत आमची कार्यवाही सुरु आहे, शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये व त्याबाबतच्या सूचना आम्ही निर्गमित केलेल्या आहेत.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, ग्रामीण भागात रब्बीची पिके अंतिम टप्प्यात आहेत, लोडशेडींग मोठया प्रमाणावर आहे. अनेक ठिकाणी लोक आंदोलन करीत आहेत, दिवसाऐवजी रात्री त्यांना वीजपुरवठा केला जात आहे. त्यामध्ये सुध्दा वेळेचे पालन केले जात नाही. मी विचारु इच्छितो की, आपण दिवसाचे किमान आठ तास शेतकऱ्यांना वीज देऊ शकता का. दुसरी बाब अशी की, अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर खराब झालेले आहेत. बदलून मिळत नाहीत, अनेकदा शेतकरी हेलपाटे मारत आहेत, आपण अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करणार आहात का. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी पंढरपूरबाबत सांगितले की, व्हिडीओ

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.....

काढून शेतकऱ्याचा मुलगा शेतात मरण पावला असेल, आपल्या अधिकाऱ्यांचा रिपोर्ट असा आहे की, विजेच्या प्रश्नामुळे तो मरण पावलेला नाही. तेथे स्पष्ट म्हटले आहे की, लोडशेडींग आहे, वीज मिळत नाही त्यामुळे आत्महत्या करीत आहे. खऱ्या अर्थाने वीज महामंडळाचा कारभार आपण सुधारण्यासाठी लक्ष घालणार आहात का, दुरुस्ती करुन देणार आहात का, अनेक अधिवेशनात आम्ही हे प्रश्न मांडलेले आहेत, राज्यातील शेतकरी रस्त्यावर आलेले आहेत, पण आपल्या सरकारला व खात्याला शेतकऱ्यांचे काहीही पडलेले नाही. शेतकरी मातीत गेला तरी चालेल फक्त तुम्ही वसुली करा, कनेक्शन कट करा, पोलीस पाठविले जातात हे आता कोठेतरी थांबवा. उन्हाळा सुरु झाला आहे, याबाबत आपली काय भूमिका आहे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात मी सांगितले आहे. मी आता सांगू इच्छितो की, मागील सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना आणलेली होती. त्या योजनेअंतर्गत दिवसा शेतकऱ्यांना अखंडीत वीज पुरवठा करण्याचा नियोजन असून त्यावर आम्ही काम करीत आहोत. तसेच अनेक ठिकाणी तसे कनेक्शन देण्यात आलेले आहे.

श्री.सुरेश धस : सभापती महोदया, मराठवाडयात ट्रान्सफॉर्मरबाबत अतिशय गंभीर परिस्थिती आहे. दोन्ही जिल्हयातील अधिकाऱ्यांमध्ये ताळमेळ असला पाहिजे. मागील २०-२५ दिवसापासून वीज प्रश्न गंभीर आहे. आमच्या आष्टी तालुक्यातील धानोरा येथे मोठे फिडर आहे ते नगर जिल्हयातील पिंपळा सब स्टेशनला जोडले जावे.

**उप सभापती** : मी सभागृहाची वेळ पाच मिनिटांकरीता वाढवत आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांचा प्रश्न पूर्ण करावा त्यावर मंत्री महोदय उत्तर देतील. त्यानंतर सभागृह १० मिनिट स्थगित करुन आजचे नियमित कामकाज दुपारी १२ वाजता सुरु होईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना क्रमांक ८ आहे.

**उप सभापती** : मी आपणास सांगू इच्छिते की, संबंधित मंत्री महोदयांचे विधानसभेत कामकाज सुरु आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक ८ उद्या घेण्यात येईल.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, मंत्री महोदयांना विनंती आहे की, पिंपळा ३३ केव्हीए सब स्टेशन अहमदनगर जिल्हयात आहे. चिंचोंडी पाटील गावाबाबत अधिक्षक अभियंता बीड यांनी अधिक्षक अभियंता अहमदनगर यांना लेखी पत्र दिलेले आहे की, एक सब स्टेशनचा लोड फक्त कमी करावा. आष्टी तालुक्यातून पुढे नगर जिल्हयात परत वीजपुरवठा होतो. या जिल्हयातील वीज दुसऱ्या जिल्हयात जाऊ द्यायची नाही येथपर्यंत अडचण निर्माण झालेली आहे. मंत्री महोदयांना विनंती आहे की, आम्ही मराठवाडयातील असलो तरी बॉर्डरवरील चिचोंडी पाटील या अहमदनगर तालुक्यातील सब स्टेशनमधून फक्त पिंपळा हे एक सब स्टेशन २०-२५ दिवसासाठी जोडून दिले तर संपूर्ण तालुक्यातील वीजपुरवठा सुरळीत होईल. अन्यथा वीजपुरवठा सुरळीत होणार नाही अशी परिस्थिती आहे. याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या लक्षवेधी सूचनेसंबंधी नाही, त्यामुळे मला तसे त्यांनी पत्र दिले तर निश्चितपणे त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, परळी तालुक्यातील काही गावे लातूर जिल्हयाच्या सिमेवर आहेत. तेथे वीज मिळत नाही. परळीवरुन येणारी विजेची लाईन ४० वर्षापूर्वीची जुनी आहे. तेथील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. पाऊस भरपूर झाला पण वीज नसल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. मी विचारु इच्छितो की, परळी तालुक्यात पाच सब स्टेशन उजनी, धर्मापुरी, सारडगाव, पटटीवडगाव, घाटनांदूर यांना अतिरिक्त १३२ केव्हीएचे सब स्टेशनबाबत मी

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड .....

उर्जामंत्री महोदयांना निवेदन दिलेले आहे. त्यांनी मंजूरीबाबत शब्दही दिलेला आहे. ते लवकर मंजूर करण्याबाबत माझी विनंती आहे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या लक्षवेधी सूचनेसंबंधी नाही, सन्माननीय सदस्यांनी मला दालनात भेटावे, याबाबत मी निश्चित विचार करीन.

**उप सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.५८ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**बीड जिल्ह्यातील देवस्थान जमिनीच्या खरेदी-विक्री गैरव्यवहार प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत**

**(१) * ११९१८ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील देवस्थान जमिनीच्या खरेदी-विक्रीमध्ये गैरव्यवहार झाला असून या प्रकरणी महसूल अधिकाऱ्यांसह १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देवस्थान जमीन खरेदी-विक्री गैरव्यवहाराची चौकशी करुन या गैरव्यवहारातील मुख्य आरोपीचा शोध घेण्याकरीता एस.आय.टी. स्थापन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमीन गैरव्यवहाराप्रकरणी मुख्य आरोपींचा शोध घेण्यासाठी व या गुन्ह्यातील इतर आरोपींची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंभुराज देसाई, **श्री.दिलीप वळसे-पाटील, यांच्याकरिता :** (१), (२) व (३) बीड शहरातील जमीन अपहार प्रकरणी पोलीस स्टेशन, शिवाजी नगर, बीड येथील गु.र.नं.४७४/२०२१, भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४, सह वक्फ बोर्ड अधिनियम, १९५४ मधील कलम ५२(२)(अ) अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये एकूण १५ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वक्फ बोर्डाच्या जमीन अपहार प्रकरणी बीड जिल्ह्यात माहे जानेवारी २०२२ अखेर एकूण ०५ गुन्हे पुढीलप्रमाणे दाखल आहेत.

१. पोलीस स्टेशन आष्टी गु.र.नं.२०५/२०२१

२. पोलीस स्टेशन आष्टी गु.र.नं.२७०/२०२१

ता.प्र.क्र.११९१८.....
श्री.शंभुराज देसाई.......

३. पोलीस स्टेशन अंभोरा गु.र.नं.२४५/२०२१

४. पोलीस स्टेशन शिवाजी नगर गु.र.नं.४७४/२०२१

५. पोलीस स्टेशन बीड शहर गु.र.नं.११/२०२२

आष्टी तालुक्यातील पोलीस स्टेशन, आष्टी अंतर्गत ०२ गुन्ह्यांचा व पोलीस स्टेशन, अंभोरा येथील ०१ गुन्हा, अशा एकूण ०३ गुन्ह्यांचा तपास करण्याकरीता विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना दिनांक २२/१२/२०२१ रोजीच्या विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र यांच्या आदेशान्वये करण्यात आली आहे.

तसेच अन्य ०२ प्रकरणांपैकी पोलीस स्टेशन, शिवाजी नगर, येथील गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन, बीड शहर येथील गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन, बीड शहर यांच्याकडून करण्यात येत आहे.

सदर गुन्हे हे देवस्थान जमीन प्रकरणी नसून वक्फ बोर्डाच्या जमिनीशी संबंधित आहेत. बीड जिल्ह्यात देवस्थान जमीन खरेदी विक्री गैरव्यवहाराबाबत विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले नसून वक्फ बोर्डाच्या जमीन अपहार प्रकरणी SIT ची स्थापना करण्यात आली आहे.

शिवाजी नगर, बीड येथील गु.र.नं.४७४/२०२१ प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखा बीड यांच्याकडून व पोलीस स्टेशन, बीड शहर गु.र.नं.११/२०२२ प्रकरणात पोलीस स्टेशन बीड शहर यांच्याकडून तपास सुरु असून सदर दोन्ही प्रकरणांचा तपास संबंधित यंत्रणांकडून योग्य प्रकारे सुरू असल्याने विशेष तपास पथकाकडे (SIT) तपास देण्यात आला नाही.

(४) विलंब झालेला नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, प्रश्न....(अडथळा)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,हा विषय देवस्थानचा असून उत्तर कब्रस्तानचे आलेले आहे. त्यामुळे नक्की प्रश्न विचारण्यामध्ये गोंधळ आहे की, उत्तर देण्यामध्ये गोंधळ आहे, हे तपासावे देवस्थान कोणते आहे, प्रश्न विचारताना अमुक देवाचे देवस्थान होते, हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

ता.प्र.क्र.११९१८.....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते जे म्हणाले ते खरे आहे. देवस्थानच्या संदर्भात आणि वक्फ बोर्डासंदर्भातील हा प्रश्न आहे. या उत्तरामध्येच सांगितलले आहे की, देवस्थानाकरिता तपासही सुरु नाही, एसआयटी देखील नेमलेली नाही. पूर्णपणे हे उत्तर गोलमाल आहे.

सभापती महोदय, मी जवळपास याबाबतच्या सर्व पुराव्यांसह माननीय मुख्यमंत्री, महसूल मंत्रीमहोदय, मुख्य सचिव या सर्वांना ३१ जमिनींचे प्रकरणे लिखित स्वरुपात दिलेली आहेत. एवढे देऊनही याबाबत यामध्ये उल्लेख केलेला नाही. जे काही उत्तर येथे दिलेले आहे, त्याच्यामध्ये केवळ तपास सुरु आहे. गुन्हे नोंद झालेले आहेत, ते कोणावर नोंदविलेले आहेत ? देवस्थानाकरिता एसआयटी का स्थापन केली नाही ? जे पत्र आम्ही दिले, त्याचे काय झाले ? ज्या जमिनींचे आम्ही पत्र दिलेले आहेत, त्याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे का ? देवस्थानाकरिता एसआयटी स्थापन का करण्यात आली नाही ? माननीय मुख्यमंत्री आणि माननीय महसूलमंत्री यांना मी जमिनीची ३१ लिखित स्वरुपातील प्रकरणे दिलेली होती. या ३१ प्रकरणांची आज काय स्थिती आहे ? सर्वात महत्त्वाचा असा प्रश्न आहे की, मी माननीय महसूल मंत्री महोदयांना याबाबत कितीतरी पत्र दिलेले आहेत, त्यामध्ये त्यांना मी असे सांगितले की, आंबेजोगाईची ३०० एकर जमीन श्री.समीर काजी आणि इतर काही मंडळी यांनी हडप केलेली आहे. त्या समीर काजीला काँग्रेस पक्षाच्या वतीने वक्फ बोर्डाचाच मेंबर करण्यात आलेले आहे. ज्यांनी जमिनी हडप केलेल्या आहेत, त्यालाच काँग्रेसच्या वतीने वक्फ बोर्डावर मेंबर म्हणून नेमण्यात आलेले आहे, हे काय चालले आहे ? आज बीड जिल्हयांमध्ये जवळपास १०,००० पेक्षाही जास्त जमिनी सर्व देवस्थानच्या लुटलेल्या, हडप केलेल्या आहेत. सरकारी अधिकाऱ्यांपासून खाजगी लोक, अन्य मोठमोठे लोक यामध्ये सामील आहेत. याबाबत शासनाने कोणती कारवाई केली, कोणता तपास केलेला आहे ? आरोपी कोण आहेत, त्यांची काय सद्य:स्थिती आहे, पुढे या सर्व प्रकरणांचे शासनाने काय केलेले आहे, याचे उत्तर आपण आम्हाला द्यावे.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय,बीड जिल्हयातील देवस्थान जमिनी, खरेदी-विक्री गैरव्यवहार, त्याला अनुसरुन एकूण ५ गुन्हे हे बीड जिल्हयातील

वेगवेगळया पोलीस स्टेशनमध्ये दाखल केल्या गेलेल्या आहेत. गुन्हयांचे नंबर्स

ता.प्र.क्र.११९१८.....

श्री.शंभुराज देसाई....

आणि तारीख उत्तरामध्ये दिलेली आहे. यातील पाचपैकी एकूण तीन गुन्हयांसाठी मागणीप्रमाणे विशेष तपास पथक म्हणजेच एसआयटी सहायक एसपी आयपीएस दर्जाचे अधिकारी श्री.कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेले आहे. याच्यामध्ये पहिल्या गुन्हयामध्ये १७ पैकी १६ आरोपी अटक केलेले आहेत. दुसऱ्या गुन्हयामध्ये सहा पैकी सहाही आरोपी अटक आहेत. तिसऱ्या गुन्हयामध्ये तीनपैकी दोन आरोपी अटक केलेले आहेत. अशा पध्दतीने एसआयटी जी स्थापन केलेली आहे, त्याप्रमाणे या आरोपींना अटक केलेली आहे, आपल्याला नावे हवी असतील तर ती मी वाचू शकतो. यापैकी जो दुसरा गुन्हा आहे, त्याच्यामध्ये २९.१२.२०११ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ४७४/२०२१ याच्यामध्ये एकूण १५ आरोपी आहेत. त्यापैकी ०६ आरोपींनी कोर्टाकडून दिलासा मिळविलेला आहे. उद्याची कोर्टात ०८ तारीख आहे. ०८ तारखेपर्यंत त्यांना अटक करुन नये, अशा पध्दतीने माननीय न्यायालयाने दिलेले असल्यामुळे या आरोपींना अटक केलेली नाही. याच्यामध्ये तीन आरोपी हे महसूल खात्याशी संबंधित आहेत. त्यातील दोन उप जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी आहेत. त्या दोन उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांना देखील हा दिनांक ०८ मार्चपर्यंतचा रिलीफ आहे. त्यामुळे त्यांना अटक करता आलेली नाही. इतर जी आरोपींची नावे आहेत. गु.र.क्र.४७४/२०२१ अन्वये आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. हबीबउद्दीन सराउद्दीन सिद्दिकी, रशीउद्दीन सराउद्दीन सिद्दीकी, सलीमउद्दीन सराउद्दीन सिद्दिकी, अश्फाक गौड शेख, अजमतुल्लाह, रजाउल्लाह सय्यद, अजीम उस्मान कुरेशी, मुजहिद, मुझीद शेख, प्रकाश आगाव-पाटील, तत्कालीन उप जिल्हाधिकारी. महसूल सहायक, श्री.पप्पासाहेब सिताराम खोड, महसूल सहायक, श्री.वसंत गणपत मंडलिक, पी.के.राक, मंडल अधिकारी, तत्कालीन तलाठी उद्धव मारुती हिंदोळे, पीएस आंधळे, तलाठी, तत्कालीन तहसीलदार व अभिलेख विभागातील महसूल अधिकारी हे सर्व आरोपी एका गुन्हयातील आहेत. सर्व गुन्हयातील आरोपींची नावे वाचणे आवश्यक असेल तर आणि तसे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर मी वाचतो.

ता.प्र.क्र.११९१८.....

श्री.विनायक मेटे ( खाली बसून ): उर्वरित सर्व आरोपींची नावे पटलावर ठेवावीत.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, ठीक आहे. जसे की, यामध्ये सांगितले की, दोन गुन्हे आर्थिक गुन्हे अन्वेषण यांच्याकडे दिलेले आहेत. त्यात महत्त्वाचा रोल महसूल यंत्रणेचा आहे. कारण जमिनीचे खोटे कागदपत्रे तयार करणे, जमिनीच्या खोटया नोंदी तयार करणे, आमच्या विभागाकडून वारंवार महसूल यंत्रणेला संपर्क साधून या गुन्हयांमध्ये आम्हाला जी पोलीस तपासासाठी कागदपत्रे गरजेची आहेत, ती मागितली असता, आमचे अधिकारी महसूल विभागाकडे वारंवार गेले असता, रिमाईंडर दिली, लेखी पत्र दिले, परंतु महसूल विभागाकडून अद्याप जी कागदपत्रे गृह विभागाला उपलब्ध होणे आवश्यक होती, ती त्यांच्याकडून प्राप्त झालेली नाहीत. या प्रश्नाच्या अनुषंगाने ब्रीफींग घेत असताना मी एसपी, बीड यांना सूचना दिलेल्या आहेत. आपण स्वत: जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना भेटावे, जिल्हाधिकाऱ्यांची वेळ घेऊन त्यांच्याकडून ही कागदपत्रे लवकर मिळवावीत.

सभापती महोदय, जो एसआयटी कडे तपास आहे, जो गुन्हे अन्वेषण कडे यांच्याकडे तपास आहे, त्याबाबतीतील महसूलची कागदपत्रे उपलब्ध करायची आहेत, ती करुन घेऊन यात अधिक जलद गतीने तपास करुन घेतला जाईल.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी दिलेल्या उत्तराला अनुसुरुन माझा प्रश्न आहे की, हा जो गैरव्यवहार आहे, त्याचा कालावधी काय आहे ? या काळात आता आपण काही लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहेत, हे मान्य आहे. परंतु त्याच्यातील मूळ तत्कालीन वरिष्ठ अधिकारी, तत्कालीन मंत्री यामध्ये दोषी आहेत का, त्यांचे आदेश काय आहेत ? यावरही शासन कारवाई करणार का ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, हे गुन्हे वेगवेगळया तारखेला घडलेले आहेत, त्यामुळे नेमका गुन्हा रजिस्टर झालेली तारीख मी या ठिकाणी सांगितलेली आहे. परंतु कालावधी हा आज जरी येथे उल्लेखलेला नसला तरीही सन्माननीय सदस्यांना माहिती देईल. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला की, त्या काळात यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का ? याबाबत आजच मी या प्रश्नाचे ब्रिफींग घेताना, या अनुषंगाने जी एसआयटी गठित केलेली आहे.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९१८.....

श्री. शंभुराज देसाई....

श्री. कोमावत नावाचे आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याकडे हा तपास सोपविलेला आहे. इतर दोन गुन्हे हे आर्थिक शाखेकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्यांचा तपास देखील एसआयटीकडे दिला जाणार आहे. एसआयटीला आवश्यकता वाटल्यास त्याची व्याप्ती वाढविली जाईल. एसआयटीमध्ये अधिकाऱ्यांची आवश्यकता भासल्यास त्यांना घेतले जाईल. महसूल विभागातील एखादा अधिकारी घ्यावा लागला तर जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांचा समावेश एसआयटीमध्ये केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. अंबादास दानवे यांनी सांगितल्यानुसार या प्रकरणात आणखी कोणाचा संबंध आहे काय ? त्यानुसार एसआयटीला सर्व तपास करण्यासाठी सूचना दिल्या जातील. या प्रकरणात ज्या कोणाचाही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असेल त्याला दोषी धरले जाईल आणि कोणत्याही परिस्थितीत या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन दोषीला शोधून काढले जाईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी यापूर्वी आणि आता दिलेले उत्तर गोलमाल आहे. महसूल यंत्रणा आणि पोलीस विभागातील संबंधित अधिकारी दोषी आहेत. जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडल अधिकारी आणि तलाठ्यापर्यंतची यंत्रणा या प्रकरणात सामील आहेत. त्यांना वाचविण्याचे काम पोलीस विभागाकडून केले जात आहे. या प्रकरणात केवळ ४ ते ५ गुन्हे संबंधितांवर दाखल झालेले आहेत. कमीत कमी १० हजार एकरावरील मोठा घोटाळा आहे. देवस्थानाच्या अनेक जमिनी आहेत. ज्यावेळी या प्रकरणाशी संबंधित लोकांवर केसेस दाखल व्हायला लागल्या म्हणून काही लोकांनी पुन्हा जमिनी वापस केल्या आहेत. त्यांनी जमिनी वापस केल्या या अर्थ त्यांनी गुन्हा केला नाही असा त्याचा अर्थ होत नाही. देवस्थान आणि वक्फ बोर्डाच्या जमिनी या संबंधित शिपायाच्या नावावर आहेत. त्याच्या पाठीमागे दुसरी लोक आहेत. या लोकांना पोलीस विभाग शोधत नाही. महसूल यंत्रणा यामध्ये गुंतलेली आहे.

ता.प्र.क्र.११९१८.....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांची भावना तीव्र आहे. देवस्थान आणि वक्फ बोर्डाच्या जमिनी आहेत. मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जर कायद्यात बसत असेल तर एसआयटीची कार्यकक्षा तपासून घेण्याची आवश्यकता आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी या प्रकरणात अभ्यास केलेला असल्यामुळे त्यांचीच साक्ष घेण्यात यावी.

श्री. शंभुराज देसाई : सभापती महोदय, होय.

**सभापती** : आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

पुणे जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाचे अध्यक्ष तथा पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांचेवर बदली आदेशातील अपमानास्पद उल्लेख प्रकरणी कारवाई करण्याबाबत

(२) * ११७५६ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय गृह मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस अंमलदार रामचंद्र जोतिराम कानगुड, बक्कल नंबर पोना १९३८ यांची जा.क्र.आशा१/प्रलि/सर्वसाधारणबदल्या/आदेशक्र.४४/पोशिसपोफौ/४७७९/२०२१ अन्वये कामशेत पोलीस स्टेशन येथून ओतूर पोलीस स्टेशन येथे बदली करण्यात आली होती, सदरहू बदली आदेशामध्ये बदलीचे कारण नमूद करताना एका महिलेच्या गावाचा व तिच्या पदनामाचा उल्लेख करुन तिचे व सदरहू पोलीस अंमलदाराचे अनैतिक संबंध असल्याचा अपमानास्पद व चारित्र्यहनन करणारा उल्लेख पुणे जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या अध्यक्षांकडून करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समाजात व प्रशासनात संबंधित अधिकाऱ्याविरोधात असंतोष निर्माण झाला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महिलेचा अपमानास्पद उल्लेख करुनही शासनाकडून त्यांचेवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बदली आदेशात एका महिलेचा अपमानास्पद उल्लेख करणाऱ्या पुणे जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाचे अध्यक्ष तथा पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंभुराज देसाई, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी काढलेल्या दिनांक १७/०३/२०२१ रोजीच्या कार्यालयीन बदली आदेशामध्ये एका महिलेच्या पदनामाचा व गावाचा आक्षेपार्ह उल्लेख केल्याबाबत पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना शासनाच्या दिनांक ३१/१२/२०२१ च्या पत्रान्वये लेखी समज देण्यात आली असून, भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून दक्षता घेण्याचेही निर्देश दिले आहेत. तसेच अशा संवेदनशील

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७५६....

श्री.शंभुराज देसाई......

प्रकरणी बदली आदेश काढताना गोपनीयता बाळगणे अत्यंत आवश्यक असतानाही वरिष्ठ श्रेणी लिपिक यांच्याकडून टंकलेखनात चूक झाल्याने त्यांची चौकशी करुन त्यांना "ठपका ठेवणे" ही शिक्षा देण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी संबंधित महिला व तिच्या कुटुंबियांची भेट घेऊन दिलगिरी व्यक्त केली आहे. उल्लेखित बदली आदेश रद्द करुन सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

श्री. गोपीचंद पडळकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात पोलीस अधीक्षक, ग्रामीण यांनी १७ मार्च, २०२१ रोजी जो बदली आदेश काढलेला आहे, त्या आदेशामध्ये एका संबंधित महिलेच्या पदनामाचा व गावाचा आक्षेपार्ह उल्लेख केल्याबद्दल त्यांना पत्राद्वारे लेखी समज दिलेली आहे. त्यांनी गुन्हा केलेला आहे, हे मान्य केलेले आहे. संबंधित टंकलेखनाकडून चूक झाल्यामुळे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर ठपका ठेवलेला आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून चोर सोडून सन्यासाला फाशी देण्याचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, संबंधित महिलेचे एका पोलीस अंमलदाराबरोबर अनैतिक संबंध असल्यामुळे त्यांची बदली करण्यात येत आहे, असे आक्षेपार्ह संबंधित महिलेचे चारित्र्यहनन करणारा आदेश प्रसिध्द झाल्यामुळे संबंधित महिलेच्या मनात लज्जास्पद भावना निर्माण झाली आहे. तिचा एकांतपणाचा भंग झालेला असल्यामुळे आयपीसी कलम ५०९ नुसार दखलपात्र गुन्हा आहे. असे महिलावरील अत्याचाराचे गुन्हे कायद्याने तातडीने दाखल करणे आवश्यक आहे. महिलावरील अत्याचाराचा दखलपात्र गुन्ह्यात गुन्हा दाखल न करता, तपास न करता संशयीतास समज देण्याचा अधिकार कायद्यानुसार शासनाला दिलेला आहे काय ?

श्री. शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर यांनी महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याचे सविस्तर लेखी उत्तर हे सभागृहाच्या पटलावर ठेवले आहे. अशा प्रकारे बदली आदेश निर्गमित करताना अनवधानाने चुक झालेली आहे. कनिष्ठ पातळीवर आदेशाची टिप्पणी तयार करणारी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ११७५६....

श्री. शंभुराज देसाई....

यंत्रणा कार्यरत असते. कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याकडून अनवधानाने चुक झालेली आहे. एकाच वेळी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे १० ते २० प्रकरणे तपासणीसाठी येतात. अशा वेळी त्यांच्याकडून स्वाक्षरी झाली हे मान्य आहे. शासनामधील गृह विभागाच्या सह सचिवाने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना लेखी समज दिलेली आहे. संबंधित पोलीस अधीक्षकाने संबंधित महिलेच्या घरी जाऊन त्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन दिलगिरी व्यक्त केलेली आहे. जो आदेश चुकीचा काढला होता त्यामध्ये दुरुस्ती करुन फेर बदलीचे आदेश निर्गमित केलेले आहे.

श्री. गोपीचंद पडळकर : सभापती महोदय, आस्थापना विभागात ४ अधिकारी काम करीत असतात. अशा संबंधित अधिकाऱ्याने गंभीर चुक केलेली आहे. त्यांना समज देण्याचा अधिकार शासनाला कायद्याने दिलेला आहे काय ?

सभापती महोदय, विभागाने संबंधित टंकलेखकावर जबाबदारी निश्चित केलेली आहे. माननीय पंतप्रधान, राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि वेगवेगळ्या विभागातील मंत्री असतील किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एखाद्या आदेशावर स्वाक्षरी केली तर तो त्यांचा आदेश समजला जातो. संबंधितांनी केलेल्या आदेशाच्या स्वाक्षरीमुळे तो त्यांचा आदेश धरता येणार नाही. तो त्यांच्या कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या क्लर्कचा आदेश आहे. असा काही नवीन कायदा आणला आहे काय ?

श्री. शंभुराज देसाई : सभापती महोदय, एखादा अधिकारी फिल्डवर काम करीत असताना प्रशासकीय चुक संबंधित अधिकाऱ्याकडून घडली तर ती दुरुस्त करण्यासाठी....ती चुक पुन्हा होऊ नये यासाठी त्यांना समज देणे, त्यांच्या कार्यपध्दतीत सुधारणा करणे हे प्रशासकीय अधिकार राज्य शासनाला आहेत. त्याच आधारे संबंधित एसपींना गृह विभागतील सह सचिवांनी लेखी पत्राद्वारे समज दिलेली आहे. अशा प्रकारची चुक भविष्यात घडणार नाही यासाठी खबरदारी घेण्याची सूचना दिलेली आहे. संबंधित महिला कर्मचाऱ्याच्या घरी जाऊन एसपींनी त्यांची आणि

ता.प्र.क्र. ११७५६....

श्री.शंभुराज देसाई...........

त्यांच्या कुटुंबीयांची दिलगिरी व्यक्त केलेली आहे. ही चुक अनवधानाने झालेली असल्याची माहिती त्या महिलेला आणि कुटुंबीयांना दिलेली आहे. एवढी सर्व बाब घडल्यानंतर संबंधितांना समज दिल्यानंतर आणखी सन्माननीय सदस्यांना काय कारवाई अपेक्षित आहे ? एकदा या प्रकरणावर कारवाई झालेली असल्यामुळे अधिक कारवाई करावी असे वाटत नाही. गरज नाही.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सहजतेने उत्तर दिलेले असून, ते आम्हाला मान्य नाही. मी पुण्याला माझ्या भाषणात एक वक्तव्य केले होते. त्या वाक्याचा विपर्यास्त करीत पोलीस अधीक्षकांनी माझ्यावर पुण्यात गुन्हा दाखल केलेला आहे. याच पोलीस अधीक्षकांनी बदलीच्या आदेशात...त्या ठिकाणी तो लिहत आहे. महिलेचा कुणाशी संबंध आहे ? मंत्री महोदयाकडून दिलगिरी व्यक्त केली, समज दिली आहे असे उत्तर दिलेले आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. आपण काही केले तरी चालते. टंकलेखकावर संबंधित एसपींनी कारवाई केलेली आहे. मग मी भाषण केल्यानंतर संबंधित लाऊडस्पीकरवाल्याच्या विरुध्द कारवाई केली काय ?

यानंतर श्री. बोर्डे....

ता.प्र.क्र.११७५६....

श्री.प्रवीण दरेकर....

यामध्ये लिपिक-टंकलेखकाची चूक नसून, या सर्व प्रकाराला संबंधित पोलीस अधीक्षकच जबाबदार आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, या प्रकरणी संबंधित पोलीस अधीक्षकांना निलंबित करण्यात येईल काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, पूर्वी दाखल झालेला गुन्हा आणि या विषयाच्या अनुषंगाने घडलेली प्रशासकीय चूक यांचा संबंध जोडणे योग्य नाही. मी वारंवार सांगत आहे की, संबंधित पोलीस अधीक्षक यांना लेखी समज दिलेली आहे. अशा पद्धतीची चूक होणार नाही अशा सूचना सुद्धा त्यांना दिलेल्या आहेत. संबंधित पोलीस अधीक्षकांवर अगोदरच कारवाई केलेली असल्यामुळे पुन्हा कारवाई करण्याची आवश्यकता वाटत नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री हे दिशाभूल करणारे उत्तर देत आहेत. उद्या एखाद्या महिलेची छेड काढली आणि माफी मागितली तर....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन फलक

फडकावून घोषण देतात.)

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी मंत्री महोदयांनी अधिक कारवाई करणे अपेक्षित असेल तर सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांची भेट घ्यावी व आपले समाधान करुन घ्यावे.

आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७५६....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक

फडकावून घोषणा देतच असतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.२१ ते १२.३१ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

ता.प्र.क्र.११७५६....

**सभापती** : माझ्या समजुतीने सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला योग्य उत्तर आले आहे. प्रश्न असा विचारला होता की, .... एका ग्रामीण एसपींनी महिलेच्या बाबतीत जे काही केले असेल, ते केले असेल, त्यावर प्रशासनाने स्पष्ट सांगितले आहे की, जे काही झाले असेल, त्याची दिलगिरी व्यक्त झाली आहे आणि समज देण्यात आली आहे. त्यांच्या नियमाप्रमाणे कदाचित ते काम असेल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. मी जरी पुढे गेलो असलो तरी त्यांच्या पदाचा मान ठेवण्यासाठी मी त्यांना एक मिनिट बोलण्यासाठी संधी देतो.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, तुम्ही अशाप्रकारचे लिखाण केल्यानंतर, रेकॉर्डवर आल्यानंतर, भविष्यातील गुन्ह्यांना आपण समज देऊन, दिलगिरी व्यक्त करुन, सोडून देणार आहात का हे या सभागृहात सांगावे. तुम्ही सभागृहात ते आश्वासन द्यावे की, अशाप्रकारची सारखी प्रकरणे समोर आली, लेखी रेकॉर्डवर आली तरी सह सचिवांमार्फत समज देऊन त्यांना दिलगिरी व्यक्त करुन सोडून देणार. मग आमचा विषय संपला. मी आता यासाठी हे विचारीत आहे की, हे सभागृह कशासाठी आहे ? हे सभागृह न्याय मिळविण्यासाठी आहे. मग जर एखादा एसपी दर्जाचा अधिकारी अशाप्रकारचे करीत असेल तर .... आमचे वैयक्तिक कोणाबाबत म्हणणे नाही की, कोण एसपी आहे की दुसरा कोण आहे. आम्ही पोलीस प्रशासन म्हणून पाहत आहोत. अशा गोष्टी पुन्हा होऊ नयेत .... आपण एकीकडे महिला संरक्षणाचा कायदा करीत आहोत. आपण सर्वांनी महिलांसाठी एकमताने कायदा आणला आहे. खुलेआम महिलांच्या इज्जतीचे धिंडवडे काढणार असतील आणि या सभागृहात न्याय मिळणार नसेल तर आम्ही कुठे न्याय मागायचा ? त्यामुळे आपल्याला माझी नम्र विनंती आहे की, याच्यावर कठोर कारवाई

ता.प्र.क्र.११७५६....

श्री. प्रवीण दरेकर ....

झाली पाहिजे. आमची अशी मागणी आहे. आमचा माननीय राज्यमंत्र्यांवर आक्षेप नाही. परंतु आपण अशाप्रकारच्या व्यक्तिंना धडा शिकविला पाहिजे. आम्हाला न्याय हवा आहे. आपण त्यांना निलंबित करावे, अशी आमची ठाम मागणी आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. मला असे वाटत की, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री. गोपिचंद पडळकर, सदाभाऊ खोत आणि तुम्ही आज किंवा उद्या तुमच्या सवडीने एक बैठक घ्यावी, यामध्ये त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काही चुकीचा प्रिसिडंट पडत पडेल तर तो होऊ नये याची काळजी घ्यावी आणि याचा फायदा .... जरी तुम्ही केले असेल ते योग्य असेल किंवा नसेल, हे त्या बैठकीत ठरवून सदनाला अवगत करावे.

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदय, होय.

----

असुधारित प्रत

**कळमनुरी (जि.हिंगाली) तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या अनुदानामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत**

**(३) * १२५३७ डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ४२ गावांची नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत निवड झाली असून यामध्ये ठिबक/तुषार, मोटार व पाईप इ.साहित्याकरीता मिळणाऱ्या अनुदानामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठिबक संचाच्या विक्रीसाठी आवश्यक असलेला दुकानाचा व कंपनीचा परवाना संबंधित दुकानदाराकडे नसतानाही दुकानदाराने बनावट देयके देऊन अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार केला आहे, तसेच मृदसंधारण विस्तार फळबाग अनुदानामध्येही गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व इतरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विश्वजीत कदम, श्री. दादाजी भुसे यांच्याकरिता :** (१) होय, श्री.गजानन प्रभाकर लासिनकर रा.कळमनुरी (जि.हिंगोली) व श्री.राजकुमार केवलसिंग जाधव रा.सुकाळी यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, हिंगोली यांना प्रकल्पाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत तक्रार अर्ज दिले होते.

(२) व (३) दोन्ही तक्रारी तक्रारदारांनी गैरसमजुतीतून दिल्या असल्याने त्या परत घेत असल्याचे पत्र, त्यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र.१२५३७....

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. प्रज्ञा सातव सभागृहात उपस्थित नाहीत. सह प्रश्नकर्ता या नात्याने मला अनुमती द्यावी. माननीय मंत्र्यांनी छापील उत्तर दिले आहे. छापील उत्तराच्या परिच्छेद २ व ३ मध्ये असे नमूद केले आहे की, दोन्ही तक्रारी तक्रारदारांनी गैरसमजुतीतून दिल्या असल्याने त्या परत घेत असल्याचे पत्र त्यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिले आहे. परंतु मूळ प्रश्न असा आहे की, हे दिवाणी स्वरुपाचे प्रकरण नसून फौजदारी स्वरुपाचे प्रकरण आहे. दुकानदाराने परवाना नसताना माल पुरवठा करुन पैसे उचलले आहेत, त्याच्यावर इंडियन पिनल कोडच्या सेक्शन ४२० प्रमाणे, सेक्शन ४७१ प्रमाणे गुन्हा दाखल का करण्यात आला नाही ?

डॉ. विश्वजीत कदम : सभापती महोदय, मूळ तक्रारदार श्री. गजानन प्रभाकर लासिनकर, रा. कळमनुरी, जि. हिंगोली व श्री. राजकुमार केवलसिंग जाधव यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, हिंगोली यांना प्रकल्पाच्या कामात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत तक्रार दिली होती हे खरे आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, दोन्ही तक्रारी गैरसमजुतीतून झाल्या आहेत. त्या त्यांनर मागे घेतल्या आहेत. त्यामुळे फौजदारी गुन्ह्यांच्या बाबतीतील तक्रारीचा उल्लेख येथे नाही. तर त्या बाबतीतील माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझी उत्तरालाच हरकत आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे की, संबंधित दोन्ही तक्रारदारांनी गैरसमजुतीतूल तक्रार दिली असल्यामुळे ती मागे घेतली आहे. खरे म्हणजे असे उत्तर येणे चुकीचे आहे. तक्रारदारांनी गैरसमजुतीतून निवेदन दिले असेल तरीही या संदर्भात पूर्वी झालेल्या तक्रारीची चौकशी करुन खरोखर यामध्ये तडजोड झाली आहे की काय झाले आहे .... याला आम्ही महत्त्व देत नाही. परंतु याबाबतीत गैरव्यवहार झाला असे संबंधित चौकशीमध्ये आपल्याला आढळले आहे काय आणि आढळले असेल तर संबंधित सर्व गोष्टींबाबत चौकशी करुन आपण कारवाई करणार आहात का ?

ता.प्र.क्र.१२५३७....

श्री. दादाजी भुसे : सभापती महोदय, हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील श्री. गजानन प्रभाकर लासिनकर व श्री. राजकुमार केवलसिंग जाधव यांनी साधारणपणे ६ मुद्यांप्रमाणे तक्रार दिली होती. ६ मुद्यांप्रमाणे प्रत्येक मुद्दानिहाय चौकशी करण्यात आली आहे. सर्व नियमांप्रामणे कायदेशीर प्रक्रिया संपन्न झाली आहे. कोणताही गैरव्यवहार झालेला नाही हे त्यातून निष्पन्न झाले आहे. ते संपूर्ण या दोन्ही तक्रारदारांना दाखविण्यात आले आहे. सर्व प्रक्रिया झाल्यानंतर त्यांची तक्रार राहिलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मुद्दा महत्त्वाचा यासाठी आहे की, त्यांनी सांगितले आहे की, गैरसमजुतीने तक्रार केली होती. मग गैरसमजुतीने तक्रार केली म्हणजे खोटी तक्रार केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करणार आहात का ?

**सभापती** : तसे सेक्शन आहेच. माझ्या समजुतीने मॅजिस्ट्रेट यांच्याकडे जाऊन त्यांच्यावर करता येते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अशामुळे हा धंदा होतो. खोटी तक्रार करायची आणि मागाहून तडजोड करायची हे योग्य नाही.

**सभापती** : मी तेच सांगत आहे.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला विषय खूप महत्त्वाचा आहे. कोणी तरी लोक येऊन तक्रार देत आहेत, पुन्हा काही बैठका झाल्या की त्या परत घेत आहेत. आपण चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांची चौकशी करणार का ? आपण त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. तुम्ही कशासाठी चुकीच्या गोष्टीसाठी अधिकाऱ्यांचा वेळ घेत आहात ?

श्री. दादाजी भुसे : सभापती महोदय, हा तारांकित प्रश्न आहे. तक्रारदारांनी ६ मुद्दे दिले होते. इतर संकिर्ण यामध्ये संपूर्ण योजनेत मृद संधारण, विस्तार, फळबाग यामध्ये किती रक्कम आली व कोणाकोणाची बिले जोडली याची चौकशी करण्यात यावी, असे ६ मुद्दे तक्रारदारांनी दिले होते. प्रत्येक मुद्दानिहाय कृषी विभागाने चौकशी केली आणि ती सर्व माहिती तक्रारदारांना देण्यात आली आहे, त्यानंतर त्यांनी सांगितले आहे की, आमचे समधान झाले आहे. आमचा काही विषय राहिलेला नाही.

ता.प्र.क्र.१२५३७....

डॉ. मनिषा कायंदे : सभापती महोदय, चौकशी झाली, मग त्याअंती काय निष्कर्ष आला हे उत्तरात आले असते तर गैरसमजुतीने झाले आणि मागे घेतले असे जे उत्तर आले आहे ते टाळता आले असते. त्यामुळे आमचे प्रश्न पुढे निर्माण होत आहेत.

श्री. दादाजी भुसे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

----

असुधारित प्रत

## महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये म्युकरमायकोसिससह इतर आजारांचा समावेश करण्याबाबत

**(४) * ११८८५ श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १०८०१ ला दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये म्युकरमायकोसिससह इतर १० आजारांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप आणि सद्य:स्थिती काय आहे, सदरहू प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावास मान्यता देवून महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये म्युकरमायकोसिससह इतर १० आजारांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :**

(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने म्युकरमायकोसिस सह इतर आजारांचा महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबावर आंतररुग्णालयीन विनामूल्य उपचार करण्याच्या अनुषंगाने सदर आजारांचा समावेश महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८८५....

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदय, लेखी उत्तराच्या अनुषंगाने मला अशी विचारणा करावयाची आहे की, तातडीच्या प्रसंगी शासकीय निमशासकीय रुग्णालयांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना ॲडमिट केल्यानंतर महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या रुग्णालयात मोफत उपचार घ्यावयाचे असल्यास ट्रान्सफर देण्यात यावी असे परिपत्रक अप्पर पोलीस महासंचालक यांनी काढले आहे. परंतु अनेक ठिकाणी असे लक्षात येते की, ट्रान्सफर नाकारण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना आरोग्य योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे ट्रान्सफरबाबत राज्य शासनाकडून योग्य ते निदेश संबंधित खात्याला देण्यात येतील काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, सेवानिवृत्त झाल्यानंतर अनेक पोलीस कर्मचाऱ्यांचे आजार बळावतात. सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळेल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ट्रान्सफरचा विषय उपस्थित केलेला आहे. ट्रान्सफर झाल्यावर त्यांना त्या योजनेचा लाभ मिळतो.

श्री.सुनील शिंदे : तातडीच्या केसमध्ये कोणत्या तरी रुग्णालयात ॲडमिट करण्यात येते. तेथे या योजना नसतात. ही योजना असलेल्या हॉस्पीटलमध्ये रुग्णाला ट्रान्सफर करा असे परिपत्रक काढण्यात आले आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या राज्यात जवळपास ३१४ हॉस्पीटल प्राधिकृत केले आहेत. तेथे कॅशलेशची सुविधा देण्यात येते. दुर्दैवाने एका ठिकाणी ॲडमिट केले तर त्या रुग्णाला दुसरीकडे ट्रान्सफर करावे लागते.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न म्युकरमायकोसिस या आजारावर इलाज न होणाऱ्या हॉस्पीटलबाबत असावा.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, म्युकरमायकोसिसबाबत असे आहे की, कोविड अंतर्गत जे पेशंट आतापर्यंत आले त्या सर्वांवर उपचार करण्यात आले आहेत. म्युकरमायकोसिसबाबत उपचार केले नाहीत अशा घटना

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८८५....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

आढळून आलेल्या नाहीत. तरी देखील यामध्ये आणखी ११ रोगांचा समावेश करण्याबाबत आरोग्य विभागाना सांगण्यात आले असून ती कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर हा तारांकित प्रश्न विचारला आहे. महाराष्ट्रातील पोलीस दिवस रात्र काम करतात. कोणतीही वेळ काळ न बघता ते काम करतात. सर्व सामान्य जनतेसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू आहे. त्यामध्ये जवळपास १००० आजारांचा समावेश केला असून त्यासाठी राज्य शासन मदत करते. पोलिसांना निकषात बसविण्यात आलेल्या उपचारात आणखी ११ आजारांचा समावेश केलेला आहे. मला असे सांगायचे आहे की, पोलिसांना होणाऱ्या सर्व रोगांचा समावेश पोलीस कुटुंब आरोग्य योजनेत करण्यात येईल काय ? त्यासाठी शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेत जवळपास १००० आजारांचा समावेश करण्यात आला आहे. पोलीस कुटुंब आरोग्य योजनेत ३९ आजारांवर उपचार करण्यात येत आहेत. या योजनेतील राज्यातील आकडेवारी अशी आहे. सन २०२१-२२ मध्ये १० हजार पोलीस व त्यांच्या कुटुंबियांवर उपचार करण्यात आले.. राज्य शासनाच्या तिजोरीतून ६० कोटी रुपयांची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. मागच्या वर्षी ३५ कोटी रुपये प्रतिपूर्ती करण्यात आली. त्याच्या मागील वर्षात ६० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य सांगतात ती वस्तुस्थिती आहे. राज्य शासनाने पोलिसांबाबत नेहमी वेगळी भूमिका घेतली आहे. कोविडमध्ये मृत्यू पावल्यावर त्यांच्या वारसांना ५० लाख रुपये देण्यात आले. कायदा व सुव्यवस्थेचा विचार करुन वेगवेगळ्या माध्यमातून पोलिसांना विशेष ट्रीटमेंट देण्यात आलेली आहे.३९ आजारापेक्षा जास्त

ता.प्र.क्र.११८८५....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

आजारांचा समावेश यामध्ये करण्याबाबत भविष्य काळात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासन सकारात्मक आहे.

**सभापती** : गेल्या ३० वर्षात मी असे पाहिले आहे की, पोलिसांची ड्यूटी १० तास, १२ तास असते ते उभे असतात. मी डॉक्टर नाही, सन्माननीय सदस्य श्री.रणजित पाटील डॉक्टर आहेत, इतका वेळ पोलीस उभे राहत असतील तर त्यांना व्हेरिकोज व्हेन्स होण्याचे प्रमाण जास्त असू शकेल. त्यामुळे त्यांच्या कामाच्या तासाच्या हिशोबाने त्यांना काही स्पेशल सुविधा देण्यात येतील काय असे सन्माननीय सदस्यांना म्हणायचे असेल.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आजारांची संख्या वाढवावी हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे तातडीने याबाबत बैठक घेण्यात येईल. याबाबत सर्व विभाग प्रमुखांकडून नवीन आजार कोणते आहेत त्याची माहिती घेण्यात येईल. त्यांचा समावेश या योजनेत करुन या योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय शासन नक्की घेईन.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाला मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेत १००० आजारांचा समावेश केला आहे. पोलिसांना हे रोग होणार नाहीत काय ? त्यामुळे ठराविक रोगांचा समावेश या योजनेत का करण्यात येतो. दोन लाख कर्मचाऱ्यांना या सर्व आजारांचे कव्हर पाहिजे नाही काय ? माझे असे म्हणणे आहे की, सन २०१४ मधील सीजीएचएसच्या दराने देयके दिली जात आहेत. हे देयके अतिशय कमी असल्यामुळे कोणतेही हॉस्पीटल या योजनेत समाविष्ट होण्यास तयार नसतात. माझी माहिती अशी आहे ज्या हॉस्पीटलने ही योजना स्वीकारली त्यांची देयके हार्डकॉपीने पोलीस मुख्यालयाकडे जातात व तेथून ती मुंबईला येतात. आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. ही सर्व कामे आता डिजिटलायजेशनने होऊ शकतात. त्यासाठी

ता.प्र.क्र.११८८५....

डॉ.रणजित पाटील....

एखादे स्मार्टकार्ड करावे. पहिला प्रश्न असा आहे की, सन २०१४ मध्ये सीजीएचएसचे जे दर आहेत तेच आता आपण देत आहात हे खरे असेल तर ते रिव्हाईज करणार काय ? आज देखील ही कामे हार्डकॉपी देऊन होत असतील म्हणजे तेथून ही सर्व कागदपत्रे एस.पी.कार्यालयात जातात व तेथून येथे येतात. यासाठी चार ते सहा महिने जातात त्यामुळे ही बाब डिजिटलाईज केली तर त्या हॉस्पीटलला सहा महिने थांबण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे त्यांचा सहभाग वाढू शकेल त्यासाठी ही कामे करण्यात येतील काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, ही योजना फक्त इमर्जन्सी केससाठी आहे. पोलिसांना अपेंडीस व हर्निया झाला तर त्याची ट्रीटमेंट यामध्ये व्हायला पाहिजे. यासाठी व्याप्ती वाढविण्यात येईल काय व त्यांचा समावेश करण्यात येईल काय ? असे करीत असताना पोलिस कर्मचाऱ्यांची रिअल टाईम माहिती हॉस्पीटलकडे नसते. सस्पेंड अधिकारी व बडतर्फ झालेला पोलीस कर्मचारी हॉस्पीटलमध्ये भरती होऊन ऑपरेशन होते व तो घरी जातो. त्यानंतर त्या हॉस्पीटलला ती देयके मिळत नाहीत कारण रिअल टाईम माहिती नसते. हॉस्पीटलला माहिती नसते की, हा पोलीस कर्मचारी कर्तव्यावर आहे किंवा नाही. यासाठी स्मार्ट कार्ड असेल तर या बाबी शक्य होतील. त्यामुळे या योजनेत आवश्यक त्या सर्व दुरुस्त्या करुन ती योजना व्यापक करण्याची गरज आहे या बाबी मंत्री महोदय करतील काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी हे खाते सांभाळले आहे त्यामुळे त्यांना याबाबत अनुभव आहे. सीजीएचएसचा विषय असेल किंवा महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेतील आजारांचा समावेश यामध्ये कसा करता येईल यासाठी एक व्यापक बैठक घेण्यात येईल. देयकांची प्रतिपूर्ती वेळेवर होत नसल्यामुळे काही हॉस्पीटल अशा केसेस नाकारतात ही वस्तुस्थिती आहे. मी अमरावती येथे गेलो होतो तेथील काही तक्रारी माझ्याकडे आल्या होत्या. यासंदर्भात एक सविस्तर बैठक घेऊत त्रुटींचा आढावा घेण्यात येईल.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८८५....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

सन २००५ मध्ये ही योजना सुरु झाली आहे. सन २००६ मध्ये काही बदल यामध्ये करण्यात आले. गेल्या १५ ते २० वर्षात फक्त कोविडचा शासन निर्णय सोडला तर यामध्ये कोणतेही आमुलाग्र बदल करण्यात आले नाहीत. सन्माननीय सदस्यांना बैठकीला बोलावून याबाबत एक व्यापक बैठक घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्यात येतील.

-------

असुधारित प्रत

**मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(५) * १२४६२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील निलज बुज, निलज खुर्द, देव्हाडा बुज, मोहगाव, नवेगाव बुज व परिसरातील गावांमध्ये खरीप हंगामात चक्रीवादळासह मुसळधार पावसामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या धान पीकाचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निलज बुज, देव्हाडा बुज परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी खरिपाचा पीक विमा काढला असूनही शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोहाडी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विश्वजीत कदम,श्री.दादाजी भुसे यांच्याकरिता :** (१) हे अंशत: खरे आहे,

भंडारा जिल्हा मोहाडी तालुक्यातील धान (भात) पिकांचे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२१ या महिन्यात चक्रीवादळ/ अवकाळी पावसामुळे नुकसानीचे ७८६ हे. क्षेत्र बाधित होते.

(२) हे अंशत: खरे आहे,

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत २२ शेतकऱ्यांकडून पूर्वसूचना प्राप्त झाली असून त्यापैकी २१ शेतकरी नुकसान भरपाईस पात्र आहेत.

(३) याबाबत नुकसान भरपाईची निश्चिती व वाटपाची परिगणना विमा कंपनीमार्फत सुरु आहे.

असुधारित प्रत

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ता.प्र.क्र.१२४६२....

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, प्रश्नांच्या लेखी उत्तराला माझी हरकत आहे. हे उत्तर सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. मोहाडी तालुक्यात जवळपास ७८६ हेक्टर भागाचे नुकसान झाले आहे. त्यासंदर्भात फक्त २२ लोकांनी मदत मागितली व २१ लोकांना मदत दिली असे त्यांनी उत्तर आहे. ७८६ हेक्टर क्षेत्राच्या नुकसानामध्ये जवळपास पाच ते सात हजार शेतकरी आहेत. फक्त २१ लोकांना नुकसान भरपाई दिली असे लेखी उत्तर देण्यात आले आहे. हे चुकीचे आहे. चुकीचे उत्तर देणारे जे अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.विश्वजीत कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी जो विषय मांडला त्याबाबत भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील धान भात पिकांचे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२१ या महिन्यात चक्री वादळ किंवा अवकाळी पावसामुळे ७८६ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले हे खरे आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४६२......

डॉ.विश्वजीत कदम......

मागील काही वर्षांपासून केंद्र शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणारी प्रधानमंत्री पीक विमा योजना ऐच्छिक करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार पीक काढणी पश्चात नुकसान भरपाई बाबी अंतर्गत २२ शेतकऱ्यांकडून पूर्व सूचना प्राप्त झालेली आहे. त्यापैकी २१ शेतकरी नुकसान भरपाईसाठी पात्र आहेत. आम्ही याबाबत अधिक माहिती घेत आहोत. सन्माननीय सदस्यांनी आणखी क्षेत्र बाधित असल्याचे सांगितले. जे शेतकरी पात्र आहेत, ज्या शेतकऱ्यांनी पीक विम्याचा लाभ घेण्यासाठी हप्ता भरलेला आहे त्यांना निश्चितपणे लाभ देण्यात येईल.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, मी पीक विमा योजनेबाबत प्रश्न विचारलेला नाही. मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, डिसेंबर २०२१ दरम्यान मोहाडी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना महाराष्ट्र शासनाकडून नुकसान भरपाई मिळणार आहे काय, किती नुकसान भरपाई मिळणार आहे आणि केव्हा मिळणार आहे ? परंतु सदर प्रश्नाचे उत्तर मला मिळाले नाही.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याचे दोन भाग आहेत. पहिला भाग नैसर्गिक आपत्ती अंतर्गत शासनाच्या वतीने मिळणारी मदत आणि दुसरा भाग पीक विमा योजनेसंदर्भात आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात १८६२ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. ७८६ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून त्यासाठी ११७ लक्ष रुपयांचा निधी अपेक्षित आहे. यापैकी ६३ कोटी रुपये ऑक्टोबर महिन्यात झालेल्या नुकसान भरपाईसाठी वितरीत करण्यात आलेले आहेत आणि उर्वरित निधी सुद्धा उपलब्ध करुन दिला जाईल. तसेच, पीक विमा योजनेसंदर्भात मघाशी राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामध्ये आपण

ता.प्र.क्र.१२४६२......

श्री.गोपिचंद पडळकर.....

अल्फाबेटिकली गावांचा समावेश करुन त्या पद्धतीने मदत देऊ केली होती. परंतु आटपाडी तालुक्यातील T, U, V, W, X, Y, Z याप्रमाणे विभुतवाडी, वलवण, यपावाडी, वाक्सेवाडी, उंबरगाव, झरे, विटलापूर, तळवडे या गावांना मदत मिळाली नाही. ती रक्कम जवळपास ३.४२ कोटी रुपये इतकी आहे. राज्यात सुद्धा अशी परिस्थिती असू शकते. आपण ती रक्कम केव्हा पर्यंत देणार आहात ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी तारांकित प्रश्नाच्या व्यतिरिक्त प्रश्न विचारलेला आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, आपण या संदर्भात माहिती घेऊन ती सन्माननीय सदस्यांना कळवावी.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, होय.

---------

## राज्य शासकीय सेवेत बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवारांची केलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत

**(६) * ११८३० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०६८० ला दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा विभागाने साडेचार हजार पानांचा तयार केलेल्या अहवालात २५८ बनावट प्रमाणपत्रे वितरित केल्याचे तसेच ५० पेक्षा अधिक उमेदवार सदर बनावट क्रीडा प्रमाणपत्राद्वारे नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक इ. वर्ग-२ च्या तसेच वर्ग-१ च्या पदांवर अन्य ठिकाणी नोकरी करत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट खेळाडू प्रमाणपत्राआधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ३४ उमेदवारांपैकी ११ उमेदवारांच्या नियुक्त्या समाप्त करण्यात येवून उर्वरित उमेदवारांच्या नियुक्त्या समाप्त करण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाची स्थगिती नसलेल्या उमेदवारांची नियुक्ती रद्द करुन सदर जागी प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी निदेश देवूनही याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य शासकीय सेवेत बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त उमेदवारांची नियुक्ती रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे, श्री.सुनिल केदार यांच्याकरिता :** (१) अंशतः खरे आहे.

२५८ उमेदवारांनी बनावट कागदपत्रे व निकाल सादर करुन क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेतल्याचे निदर्शनास आले असून, सदर बनावट कागदपत्रांआधारे, उपरोक्त उमेदवारांपैकी, ३४ उमेदवारांची शासनाच्या विविध विभागांत नियुक्ती झाली आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८३०......
श्रीमती आदिती तटकरे......
(२), (३) व (४) बनावट खेळाडू प्रमाणपत्रांआधारे नियुक्ती झालेल्या १२ उमेदवारांच्या नियुक्त्या समाप्त केल्या आहेत. उर्वरीत उमेदवारांच्या नियुक्त्या रद्द करण्यासंदर्भात क्रीडा व युवक सेवा संचालनालय स्तरावरुन पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, खोटी प्रमाणपत्र तयार करणे हा गंभीर गुन्हा आहे. या गुन्ह्याला फोजदारी गुन्हा समजले पाहिजे. खोटी प्रमाणपत्रे वापरुन नोकऱ्या मिळविणे, दुसऱ्याच्या अधिकारावर घाला घालणे आणि एकंदरीतच संपूर्ण सिस्टीमवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल अशा पद्धतीचा हा विषय आहे. तारांकित प्रश्नाच्या उत्तरात नमूद केलेले आहे की, ३४ उमेदवारांची शासनाच्या विविध विभागात नियुक्ती झाली होती. त्यापैकी १२ उमेदवारांच्या नियुक्त्या समाप्त करण्यात आलेल्या आहेत. मग उर्वरित उमेदवारांनी गैरपद्धतीने नोकऱ्या मिळविलेल्या असल्यामुळे त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात येणार आहेत काय ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वर्ग-३ व ४ मधील विविध पदांवर एकूण ३४ उमेदवारांची नियुक्ती झाली होती. त्यापैकी १२ उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात आलेली आहे. उर्वरित २२ उमेदवार आहेत. या संदर्भातील सविस्तर अहवाल विभागाच्या वतीने नियुक्त प्राधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आलेला आहे. नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून विलंब होत असल्यामुळे क्रीडा विभागाने अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे दिनांक २४/११/२०२१ रोजी पत्र व्यवहार केलेला आहे. या संदर्भात विभागाकडून पाठपुरावा सुरु आहे. संबंधित उमेदवारांची सेवा समाप्त करणे, नियुक्त्या रद्द करणे तसेच नियुक्त्या रद्द झाल्यानंतर रिक्त जागा भरण्यासाठी नवीन उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत संबंधित विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. क्रीडा विभाग या संदर्भात पाठपुरावा करीत आहे. एकूण ३४ जागा रिक्त असून या संदर्भात

ता.प्र.क्र.११८३०......

श्रीमती आदिती तटकरे......

योग्य ती कार्यवाही केली जाईल. भविष्यात बोगस प्रमाणपत्र देऊन कोणीही नोकरी मिळवू नये यासाठी क्रीडा विभागाच्या माध्यमातून सॉफ्टवेअर तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक खेळाडूने भाग घेतलेल्या स्पर्धांची सविस्तर माहिती त्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून अपलोड करावी लागणार आहे. सदर पोर्टल अत्यंत कमी कालावधीत क्रीडा विभागाच्या माध्यमातून तयार करण्यात येत आहे. भविष्य काळात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याची क्रीडा विभागाकडून काळजी घेतली जात आहे.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, ज्यांनी बोगस प्रमाणपत्र मिळविले त्यांना नोकऱ्या मिळालेल्या आहेत. शासनाने या संदर्भात दिनांक ३१ मे २०२१ रोजी शासन निर्णय काढलेला आहे. क्रीडा विभागाने बोगस प्रमाणपत्राबाबत क्रीडा समर्पित योजना राबविलेली आहे. म्हणजे ज्यांनी बोगस सर्टिफिकेट घेऊन नोकरी मिळविली त्यांच्यासाठी समर्पित योजना राबविण्यात येत आहे. माझ्याकडे शासन निर्णयाची प्रत आहे. मी ती प्रत मंत्री महोदयांकडे देतो. सदर योजनेद्वारे बोगस खेळाडू उमेदवारांना त्यांचे बोगस प्रमाणपत्र व पडताळणी अहवाल क्रीडा व युवक सेवा आयुक्तांकडे पत्राद्वारे व व्यक्तीश: जमा करावयाचे आहेत आणि ती तारीख ३१ मे २०२२ पर्यंत आहे. अशा प्रकारे जे नोकरीत कार्यरत आहेत त्यांच्यावर समर्पित योजनेच्या माध्यमातून कारवाई करुन त्यांना सेवेतून काढण्यात येणार आहे काय ? तसेच, ज्यांनी बोगस प्रमाणपत्र तयार केले त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, या संदर्भात एफआयआर नोंदविण्यात आलेला आहे. पोलीस विभागाकडून त्यांच्यावर कारवाई सुद्धा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी शासन निर्णयाचा उल्लेख केलेला आहे. आता पर्यंत झालेली प्रकरणे पुन्हा होऊ नयेत आणि शासन निर्णयानुसार अगोदर ज्या नियुक्त्या

ता.प्र.क्र.११८३०......

श्रीमती आदिती तटकरे......

झालेल्या आहेत, आपण ज्या ३४ उमेदवारांचा उल्लेख करीत आहोत त्यांचा यामध्ये समावेश नाही, ज्यांनी बोगस सर्टिफिकेट घेतले असेल त्यांनी ती स्वेच्छेने परत करावित यासाठी त्यांना मुभा दिलेली आहे. त्यांना माफी दिलेली आहे अशातला भाग नाही. विभागाने २५८ लोकांवर एफआयआर दाखल केलेला आहे.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, सदर घटना नोव्हेंबर महिन्यातील आहे. आता जवळपास ३ महिने झालेले आहेत. आता पर्यंत संबंधितावर कारवाई व्हावयास पाहिजे होती. संबंधितावर कारवाई करण्यासाठी एवढ्या महिन्यांचा कालावधी लागता कामा नये. कारण, त्यांची प्रमाणपत्रे बोगस आहेत हे सिद्ध झालेले आहे. सदर प्रकरणी कारवाई करण्यासाठी विलंब होत आहे, तो चुकीचा आहे. पोलीस उप निरीक्षक म्हणजे ज्यांनी गुन्हा थांबवावयास पाहिजे असे लोक यामध्ये आहेत. मंत्री महोदयांनी शासन निर्णयामध्ये जे नमूद केलेले आहे त्याबाबत अधिक स्पष्टता करावी, अशी माझी विनंती आहे.

श्रीमती आदिती तटकरे : सभापती महोदय, दिनांक २४/११/२०२१ रोजी अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे पत्र दिलेले असले तरीही क्रीडा विभागाचे आयुक्त त्याच बरोबर नियुक्ती प्राधिकारी यांना आजच्या चर्चेच्या अनुषंगाने सूचना देण्यात येतील की, त्यांनी या संदर्भात त्यांच्या स्तरावर बैठक घ्यावी. ज्या ३४ जागा रिक्त होणार आहेत त्या भरण्यात याव्यात आणि २२ उमेदवारांवर अद्याप कारवाई झालेली नाही, त्यांची सेवा समाप्त करण्यात आलेली नाही, ती कारवाई लवकरात लवकर करण्यात यावी. त्यानंतर मंत्री महोदयांच्या सूचनेनुसार त्यांच्या उपस्थितीत या संदर्भातील पूर्तता अहवालाबाबत बैठक घेतली जाईल. पुढील एका महिन्यात या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मागील आठवडयातील विरोधी पक्षाचा प्रस्ताव उद्या घ्यायचे ठरले होते, तो उद्या दर्शविण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी आपणास सांगू इच्छितो की, तो प्रस्ताव स्वाक्षरीसाठी माझ्याकडे आला होता, आपण मला आठवण करुन दिली मी आपला आभारी आहे, तुमच्या प्रस्तावाबाबत उद्या पाहतो. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत आपण घेतलेला निर्णय आपणास माहितच असेल. नियम २६० अन्वये प्रस्ताव, शासनाचा प्रस्ताव किंवा अन्य काही अल्पसूचना असतील त्यावर आपणास प्रॉपर उत्तर पाहिजे असेल तर एकाच वेळी १०-१५ विभागांचे विषय प्रस्तावात समाविष्ट करु नयेत. आपण ठरविले होते त्याप्रमाणे पाच विभागांचे विषय त्या प्रस्तावात घ्यावेत.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, तीन विभाग ठीक आहेत.

**सभापती** : कामकाज सल्लगार समितीच्या बैठकीत पाच खात्याबाबत चर्चा झाली होती, आता आपण तीन म्हणत आहात तर ठीक आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, पाच मंत्री महोदयांची उत्तरे म्हणजे कोणालाच न्याय मिळत नाही. तीन मंत्री व विभाग ठीक आहेत, एखाद्याकडे दोन विभाग असतील तर चालू शकते. शनिवारी सभागृहाची बैठक होऊ शकली नाही, विरोधी पक्षाचा त्यांच्या प्रस्तावाबाबत अधिकार आहे. त्यामुळे त्या प्रस्तावामध्ये विरोधी पक्षाला संधी दिली तर आमची हरकत नाही.

-----

असुधारित प्रत

**नियम २८९ अन्वये सूचनेबाबत**

**सभापती** : आज दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी माझ्याकडे म.वि.प. नियम २८९ अन्वये तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री.सदाशिव खोत व इतर वि.प.स. यांची "कृषी पंपाची वीज तोडणी सुरू असल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या" या विषया संदर्भातील आहे.

दुसरी सूचना माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांची " ओबीसी आरक्षण" या विषया संदर्भातील आहे.

तिसरी सूचना माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांची १९९३ च्या बॉम्बस्फोटाबाबत या विषया संदर्भातील आहे.

सदरहू सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्रीमती आदिती तटकरे (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

डॉ.विश्वजित कदम (कृषी राज्यमंत्री) : डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.अस्लम शेख (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती** : माझ्या आज सोमवार दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेली सूचना व त्यावरील माझा निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

(प्रेस : येथे नियम ९३ ची सूचना व त्यावरील निर्णय जोडावा.)

---------

असुधारित प्रत

## सभागृहापुढील कामकाजाबाबत

**सभापती** : अनुक्रमांक चार अंतर्गत म.वि.प.नियम १०१ अ अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

औचित्याचे मुद्दे शुक्रवारी घेण्यात येतील.

--------

असुधारित प्रत

## माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत

**सभापती** : मला सभागृहाचा सेन्स घ्यायचा आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण व पुरवणी मागण्या या दोन घटनात्मक जबाबदाऱ्या आपल्या सदनावर आहेत, त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री महोदयांनी सदनात उत्तर दिले होते की, ओबीसी आरक्षणाबाबतचे विधेयक आज घ्यायचे आहे. आपल्या संमतीने माननीय राज्यपालांचे अभिभाषण अगोदर घेऊया. यावर सदस्यांनी मर्यादित वेळेत बोलावे. कोणाचीही हरकत नसावी, सर्वांनी सहकार्य करावे अशी माझी विनंती आहे.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण पटलावर ठेवलेले आहे. तसेच या सदनातील सर्वांची भाषणे देखील पटलावर ठेवावीत.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, चुकीचा पायंडा पडू नये. सन्माननीय सदस्यांनी मर्यादित वेळेत बोलावे. भाषणे पटलावर ठेवता येत नाहीत. भाषणे कधीही पटलावर ठेवलेली नाहीत. आपल्या सूचनेप्रमाणे भाषणे पटलावर नियमानुसार घेता आली तर निश्चितपणे घेईन. पण यापेक्षा आपण ती भाषणे माझ्याकडे द्यावीत. माझ्याकडून ती भाषणे शासनाकडे पाठविण्यात येतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्याचा सभागृहाला अधिकार आहे हे मान्य आहे, यावेळी ते भाषण पटलावर ठेवले गेले हा वेगळा मुद्दा आहे. परंतु माननीय राज्यपाल हे केंद्र सरकारच्या वतीने येथे येत असतात. त्यांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करणारी इतकी मोठी छापील पुस्तिका आलेली आहे.

या पुस्तिकेत सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे ते माननीय श्री.भाई जगताप अशी अनेक नावे आहेत. माननीय श्री.भाई जगताप यांचे नाव कसे आले ते पहावे. पण माननीय राज्यपालांबाबत खेद असा शब्दप्रयोग या पुस्तिकेत आहे एवढाच माझा मुद्दा आहे.

------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या

आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

**सभापती** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव श्री.अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी मांडला असून श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. आणि डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी त्यास अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा आज सोमवार दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी होणार असून या दिवसाचे सभागृहातील कामकाज लक्षात घेता राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस एकूण ३ तासांचा कालावधी उपलब्ध आहे. परंतु आता आपण बोलल्याप्रमाणे दीड तासात हा प्रस्ताव संपवावा. उर्वरित दोन तासात प्रस्ताविकांना १५ मिनिटे देण्यात येतील. प्रस्तावाला पाठींबा देणाऱ्या १० मिनिटे भाषण करता येईल, तसेच विरोधी पक्ष नेत्यांना भाषणासाठी २० ते ३० मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यायचा आहे त्यांनी आपली नावे पक्षाच्या प्रतोदामार्फत १० मिनिटात पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय याचा विचार करण्यात येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत, सुधारणांची एकत्रित यादी सदस्यांना मिळाली आहे असे मी समजतो. तसेच सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या नाहीत असेही मी समजतो.

सुधारणांच्या यादीमध्ये माननीय श्री.भाई जगताप यांचे नाव चुकून आले आहे. श्री.भाई जगताप यांचेऐवजी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर अशी सुधारणा करण्यात यावी.

-------

श्री.अभिजित वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरीता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे आभार मानतो."

आदरणीय राज्यपाल यांनी पटलावर ठेवलेल्या अभिभाषणावर आभार प्रदर्शन करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या शासनाने २०१९ पासून जनतेसाठी कोणकोणत्या योजना आखल्या आहेत, त्याचा तपशील त्यांनी आपल्या भाषणात ठेवलेला आहे. त्याची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या शासनाने बऱ्याच क्षेत्रात उचललेल्या पावलांचे कौतुक करण्याची आवश्यकता आहे. राज्यपाल महोदयांच्या भाषणावरुन दिसून येईल की, सर्वसामान्य माणसाच्या सुरक्षेचा प्रश्न, कष्ट करणाऱ्या कामगारांचा प्रश्न, शेतकरी बळीराजाचा प्रश्न, मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहराचा चेहरामोहरा बदलण्याचे काम असेल.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.अभिजित वंजारी......

किंवा या ठिकाणी आपल्या राज्यात वेगवेगळया विभागाच्या विकासाच्या योजना असतील या संपूर्ण योजनांच्या संदर्भात एक विशिष्ट दिशा देण्याचा उल्लेख महामहीम राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे. म्हणून मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये साधारणत: सरकारची पुढील दिशा ठरविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केलेला असतो. या धोरणाला अनुसरुन सरकार निश्चितपणे कोणती गोष्ट करण्याचा प्रयत्न करणार आहे, या बाबतीत काही गोष्टींचा उल्लेख करण्याची गरज आहे. सरकारला काय करायचे आहे, कोणती दिशा ठरवायची आहे, हे सांगत असताना गत वर्षी केलेल्या महत्त्वाच्या गोष्टींचा अहवाल त्यामध्ये मांडण्याची प्रथा आहे, या दृष्टीकोनातून माननीय राज्यपाल महोदयांनी अभिभाषणामध्ये टीकाही होणे आवश्यक आहे, असाही उल्लेख केलेला आहे. त्या संदर्भात माननीय राज्यपालांनी विविध प्रकारच्या विभागाच्या ज्या काही योजना आहेत, त्या योजनांचा तपशील आपल्यासमोर मांडलेला आहे. या ठिकाणी दोन वर्षांमध्ये कोरोनाची जी परिस्थिती आपल्या राज्यामध्ये होती, त्यामुळे जनजीवन त्रस्त झाले होते. त्यामुळे सरकारपुढे खूप मोठे आव्हान होते. परंतु सरकारच्या आरोग्य विभागाकडून आणि वैद्यकीय शिक्षण विभागाकडून अत्यंत चांगली कामगिरी या दोन वर्षात करण्यात आलेली आहे, त्यामुळे राज्यात ६५०० सुविधा केंद्रांमध्ये ४,५०,००० विलगीकरण खाटा, ४०,००० आयसीयू खाटा, १,३५,००० ऑक्सिजन खाटा, १५,००० अधिक व्हेंटिलेटर्स अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध केल्यामुळे जे कोरोना संकट राज्यात आले होते, ते फेस करण्याकरिता सरकारच्या, प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न केला गेला होता. दुसऱ्या लाटेत ऑक्सिजनची कमी मोठया प्रमाणात भासली होती. तो देखील प्रश्न राज्यासमोर होता. याचेही आव्हान सरकार व मंत्रीमंडळासमोर होते. म्हणून त्या ठिकाणी १२५० मेट्रिक टन ऑक्सिजन निर्माण केला जात होता, त्यामध्ये आणखी ५० मेट्रिक टन वाढ करुन ऑक्सिजनची कमतरता पूर्ण करण्याचा प्रयत्न केला गेला होता. या ठिकाणी जवळपास १,४०,००० पेक्षा अधिक प्रकरणांमध्ये राज्यातील नागरिकांना ५०,००० रुपयांची भरपाई देऊन त्यांना

असुधारित प्रत

श्री.अभिजित वंजारी......

आर्थिक आधार आपल्या राज्यातील नागरिकांना मिळाला पाहिजे. या पध्दतीने आपल्या शासनाने पावले उचललेली आहे. या ठिकाणी अनेक प्रकारच्या लसीकरणाच्या मोहीमा देखील आपल्या राज्यात विविध विभागाच्या माध्यमातून राबविल्या गेल्या, त्यात महाविद्यालयात देखील तरुण मुलांना कोरोनाची लागण होऊ नये म्हणून त्यांना देखील महाविद्यालयांच्या, शाळांच्या माध्यमातून लसीकरणाचे मोठया मोहीमा घेण्यात आल्या होत्या,त्यातून कोरोनाची लाट थांबविण्याकरिता आपण सर्वांनी प्रयत्न केलेला आहे. नागपूरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुपरस्पेशालिटी इन्स्टिटयूट ऑफ मेडीकल एज्युकेशन ॲण्ड सायन्स याच्या स्थापनेकरिता मान्यता दिली गेली असून देशात ही पहिल्या प्रकारची संस्था आहे, त्यामध्ये सतरा पदव्युत्तर पदवी, अकरा अति विशेष पाठयक्रम शिकविला जाणार आहे. या निमित्ताने मी शासनाचे अभिनंदन करतो. कोविडच्या काळात आर्थिक भार आपल्या शासनाला उचलावा लागलेला आहे, त्यातून जे काही नुकसान झालेले आहे, त्याची भरपाई करण्यासाठी आणि आर्थिक मंदीमुळे शासनाला आर्थिक निर्णय घेणे आव्हानात्मक होते. केंद्र सरकारकडून राज्याला जवळपास २९,९४२ कोटी रुपयांची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे ते देखील आव्हान आपल्या राज्यासमोर होते. परंतु याही परिस्थितीमध्ये आपल्या राज्याने अत्यंत चांगली कामगिरी बजावून आपले राज्य प्रगतीकडे कसे जाईल, याकरिता प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी पर्यावरणाच्या बाबत देखील शासनाने अत्यंत चांगली कामगिरी केलेली आहे. पर्यावरण विभागाकडून माजी वसुंधरा बियाणे या अंतर्गत आपल्या शासनाने जवळपास २१,९४,००० झाडे लावलेली आहेत, यामुळे १६ पेक्षा जास्त हरित क्षेत्रे निर्माण झालेली आहेत. या संस्थेकडून याकरिता १२००० पेक्षा जास्त नावे नोंदविलेली आहेत. आपल्या राज्यात मोठया प्रमाणात प्रदूषण होत आहे, इलेक्ट्रीक वाहनाचे धोरण राज्याने स्वीकारलेले आहे. त्या तुलनेमध्ये, त्या माध्यमातून आपल्या शासनाने ७००० इलेक्ट्रीक वाहन मालकांना त्यांची किंमत करुन त्यांना प्रोत्साहन दिलेले आहे. इलेक्ट्रीक वाहनांचे धोरण आपल्या राज्यात

श्री.अभिजित वंजारी.....

कशा पध्दतीने मोठया प्रमाणात राबविता येईल, आपल्या राज्यातील प्रदूषण हे कसे कमी करता येईल, याचा विचार देखील या निमित्ताने केलेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी जन-धन योजनेच्या माध्यमातून आपल्या राज्यात शिव-थाळी भोजनाची योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्याच्यामध्ये जवळपास २,७०,००,००० पेक्षा जास्त सर्वसामान्य गरीब नागरिकांना थाळीचे वाटप केलेले आहे. त्या माध्यमातून त्या लोकांना ८ कोटीपेक्षा अधिक शिव-भोजन थाळी वितरित केलेली आहे.

सभापती महोदय, कृषी क्षेत्रामध्ये देखील शेतकऱ्यांकडून २०,३६,००० मेट्रिक टन धानाची व भरड धान्याची विक्रमी खरेदी केलेली आहे. या सर्व योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधार मिळावा, याकरिता देखील शासनाच्या वतीने प्रयत्न केला गेलेला आहे.

सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो की, शासनाच्या ज्या काही वेगवेगळया योजना आहेत, त्या योजना आपल्या सर्व सभागृहाच्या माध्यमातून सर्वांना सांगितलेल्या आहेत, सर्वांसमोर त्या योजना त्यांनी आणलेल्या आहेत. निश्चितपणाने महाविकास आघाडी सरकारच्या वतीने आणखी ही पावले कडक करुन त्या ठिकाणी विकासाच्या दृष्टीने आपल्या राज्यामध्ये वेगवेगळया प्रकारची उपाययोजना करतील, असा मला या ठिकाणी विश्वास वाटत आहे, मी पुन्हा एकदा माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------------

श्री.शशिकांत शिंदे(विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.अभिजित वंजारी यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार मानलेले आहे, त्यांच्या या भाषणाला मी पाठिंबा देण्याकरिता उभा आहे.

सभापती महोदय, या विधीमंडळामध्ये अनेक वर्षांपासूनची एक परंपरा आहे, अर्थसंकल्पीय अधिवेशन ज्यावेळी सादर केले जाते, त्यावेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून राज्याचा असलेला अर्थसंकल्पाचा चेहरा निश्चितपणाने दर्शविला जात असतो. महाराष्ट्रात एक दुर्दैव असे झालेले आहे की, हे अधिवेशन पहिल्या दिवशी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून सुरु होत असताना पहिली घटना अशी आहे की,अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरु होत असताना माननीय राज्यपालांचे भाषण पटलावर ठेवावे लागते. खरे म्हटले तर अशा प्रकारची परिस्थिती पूर्वी कधीही उद्भवली नव्हती. माननीय राज्यपाल महोदय आल्यानंतर माननीय राज्यपालांनी दोन मिनिटांमध्ये या सभागृहातील कामकाजासंदर्भातील आपले भाषण आटोपते घेतले आणि दुर्दैवाने या राज्याची असलेली परंपरा खंडित करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

राष्ट्रगीताच्या संदर्भातील देखील मान न ठेवता त्यावेळचे कामकाज पाहिले गेले. खरे म्हटले तर ते दुर्दैवी आहे, असे माझे मत आहे. कदाचित माननीय राज्यपालांच्या भाषणाच्या सुरुवातीला माझे शासन छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहु महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, इतर थोर महान द्रष्टे व्यक्तींनी घालून दिलेल्या आदर्शांचे पालन करीत आहे, हा शब्द उच्चारण्याकरिता माननीय राज्यपालांना अवघड जात असेल. म्हणून कदाचित माननीय राज्यपालांनी आपले भाषण आटोपते घेतले, असे मला वाटत आहे. दुर्दैव आहे की, महाराष्ट्राचे असलेले आराध्य दैवत,छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श आम्ही सर्व जण घेत असतो आणि अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांबाबतचे वक्तव्य या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेपासून त्याचा सर्व लोकांनी निषेध केलेला आहे.

सभापती महोदय, एवढयावरच ते थांबले नाहीत....(अडथळा)....

असुधारित प्रत

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे आपण माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावाला अनुमोदन देण्याकरिता उभे आहात.

श्री.भाई गिरकर(माईक बंद): सभापती महोदय, (अडथळा)

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर, मीच सन्माननीय सदस्य शशिकांत शिंदे यांना आपण अनुमोदन देत आहात, हे सांगितलेले आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या व मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीतील घेतलेला ऐतिहासिक निर्णय, कार्य याची देशाने व जगानेही दखल घेतलेली आहे, त्याबाबतचे देखील वक्तृत्त्व ऐकल्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांच्या पदाचा अभिमान, महाराष्ट्राला बाळगायला लागतो, त्या पदाचा आदर ठेवणे आवश्यक आहे, याबाबत चिंता व्यक्त केली गेली. माननीय राज्यपाल महोदयांच्या या सर्व संदर्भात राज्यातून आणि देशातून वेगवेगळया प्रतिक्रिया उमटू लागल्या.

यानंतर श्री.सोनावणे....

असुधारित प्रत

श्री. शशिकांत शिंदे....

मी माननीय राज्यपाल महोदयांचा विरोध करीत आहे असे नाही. माननीय राज्यपाल महोदयांच्या पदाचा आदरण सर्वांनी करण्याची गरज आहे. माननीय पंतप्रधान काल रविवार दिनांक ६ मार्च, २०२२ रोजी पुण्यात दौऱ्याच्या निमित्ताने आले होते. त्यावेळी माननीय श्री. अजित पवार यांनी खेद व्यक्त केला होता.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी कोणाच्याही भावना दुखाविण्याच्या उद्देशाने बोललो नव्हतो. माननीय सभापती महोदयांनी देखील अनेक वर्षे समाजकारण आणि राजकारण केलेले आहे. राज्यात लोकप्रतिनिधींकडून वेगवेगळी वाक्ये किंवा शब्दप्रयोग केला जातो. मी ही बाब माननीय पंतप्रधान महोदयांच्या लक्षात आणून दिली होती. या प्रकरणात माननीय राज्यपाल महोदयांना नाहकपणे ओढणे हे उचित होणार नाही. मी माननीय सभापती महोदयांना खाजगीत माझा हेतू काय आहे तो सांगितला आहे. महाराष्ट्र राज्याची संस्कृती, परंपरा काय आहे हे मी त्यांना सांगितले आहे. स्व. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या सर्वांना कोणती परंपरा घालून दिलेली आहे ते देखील मी सांगितले होते. सुसंस्कृत महाराष्ट्रात कसे बोलले पाहिजे हे देखील मी सांगितले आहे. अमुक असा म्हणाला, त्याबद्दल आपले मत काय ? तो तसे म्हणाला म्हणून आपले मत काय हे असे करुन आपण पुढे चाललो आहोत. हे राज्यातील जनतेला अजिबात आवडत नाही. जनता सर्व राजकीय लोकांना कोणत्या अँगलने पाहते याचा सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. हे मी माननीय पंतप्रधान महोदयांच्या लक्षात आणून दिले होते. मी कोणालाही टोकून बोललो नाही. त्यामुळे मला या प्रकरणाशी माननीय राज्यपाल महोदयांशी जोडणे उचित नाही, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी केवळ अनुमोदन देण्याचे काम करावे अशी माझी त्यांना सूचना आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, ठीक आहे. कोरोनाच्या कालावधीत राज्यावर आणि देशावर मोठे संकट आले होते. त्यावेळी संपूर्ण अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. अशी कठीण समयी राज्य शासनाने चांगली कामे केलेली आहेत. कोरोना कालावधीत उत्पन्नाचे निकष न बघता लसीकरण आणि वेगवेगळ्या उपाययोजना राबविण्यासाठी शासनाने सहकार्याची भूमिका घेतली होती. राज्य शासनाला केंद्र शासनाने किती आर्थिक मदत केली किंवा मदत केली नाही यावर मी चर्चा करणार नाही. परंतु, केंद्र शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता राज्य शासनाने कोविडच्या तीन लाटेच्या संकटाच्या काळात समर्थपणे तोंड देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यावेळी राज्यातील अनेक लोकांचे जीव वाचविण्यासाठी आरोग्याच्या माध्यमातून भरघोस आर्थिक मदत केली होती. याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन आणि आभार व्यक्त करीत आहे. राज्यात ज्यावेळी अन्नधान्याचा तुटवडा होता त्यावेळी शासनाने शिवभोजन थाळी योजना सुरु केली होती. त्यामुळे उपासमारीला आळा बसला होता. अशा प्रकारे राज्यातील गरीब लोकांना आधार देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. कोरोना कालावधी अनेकांनी आपल्या परीने मदत केलेली आहे.

सभापती महोदय, राज्यात मिशन ऑक्सिजन स्वावलंबन नावाची योजना सुरु केली. त्यावेळी राज्यतील ऑक्सिजनचा तुटवडा पाहता ५ हजार मेट्रीक साठवण क्षेमतेचे नियोजन केले. ऑक्सिजनच्या बाबतीत आपण स्वयंस्फुर्तीने स्वावलंबी झालो याचा उल्लेख मी करीत आहे. कोरोना संकटाला सामोरे जाताना दुसरीकडे अतिवृष्टी आणि चक्रीवादळाच्या संकटाला सामोरे जावे लागले होते. पुरग्रस्तांसाठी राज्य शासनाने भरघोस मदत केली होती. कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावे किंवा देऊ नये यासंदर्भातील समयसुचकता, निधीचा विचार न करता, अडचणीचा विचार न करता योग्य ती पावले टाकली याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी उपाययोजना केल्या होत्या. त्यावेळी उदध्वस्त झालेल्या घरांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. तसेच दुसऱ्या बाजूला रस्त्याचा विकास आणि

असुधारित प्रत

श्री. शशिकांत शिंदे....

त्याचे जाळे निर्माण करण्यासाठीचा प्रयत्न केला होता. मुंबईपासून इतर शहरांमध्ये जाण्यासाठी रस्त्यांचे जाळे विणले होते. शेवटी दळणवळण महत्वाचे असते. दळणवळण चांगले झाले की, राज्याचा विकास आणि प्रगती होते. शहरीकरणाच्या बाबतीत शहरातील लोकांना संपर्क करण्यासाठी प्रयत्न होतो. मुंबई महानगरपालिकेने ५०० चौ.फु.पर्यंत असलेल्या घरांचा कर माफीचा निर्णय केलेला आहे. कोविडमध्ये अनेक कुटुंबीय उदध्वस्त झाले होते. त्यांना आर्थिक मदत आणि आधार देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे.

सभापती महोदय, पंतप्रधान आवास योजनेमध्ये १५ लाख ३८ हजार निवासी घरे मंजुर करण्यात आली. त्यासाठी शासनाने आतापर्यंत १ हजार ७३९ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे.

सभापती महोदय, स्वच्छ अभियान आणि पर्यावरण योजनेमध्ये राज्य शासनाने कौतुकास्पद कामे केलेली आहेत. पर्यावरणाकडे कोणीही गांभीयाने पाहत नाही. पण गेल्या काही वर्षापासून पर्यावरणाच्या बाबतीत राज्य शासनाने पुढाकार घेतलेला आहे. महाराष्ट्र राज्य पर्यावरणाच्या बाबतीत भविष्यात पोषक वातावरण निर्माण करेल असा विश्वास मी व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, वेगवेगळ्या शासकीय इमारती आणि योजना आहेत. विकास करण्यासाठी शासनाने निधी कधीही कमी पडू दिला नाही. अशा प्रकारे विश्वास निर्माण करणारे महाविकास आघाडी सरकार सर्वांनी पाहिले आहे. अडचणीच्या प्रसंगी न डगमगता माननीय वित्तमंत्र महोदयांच्या माध्यमातून सढळ हस्ते प्रत्येक कामासाठी मदत केलेली असून, मला त्याचा उल्लेख करावासा वाटतो. राज्य शासाने यापूर्वी केलेल्या कार्याला आणि भविष्यकाळातील नियोजनाला पाठींबा देतो आणि थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला व त्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी अनुमोदन दिले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडत असताना सरकारचे ध्येयधोरण, त्यांनी केलेल्या कामाचा आढावा, भविष्यात सरकार कोणत्या दिशेने जाणार आहे, याची स्पष्टता देणारे माननीय राज्यपालांचे अभिभाषण असते. या प्रस्तावावर सरकारमधील दोन नेत्यांची भाषणे मी ऐकली. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला आणि त्या प्रस्तावावर टीकेचे भाषण सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी केले. यावरुन महाविकास आघाडी सरकारमध्ये कशा प्रकारचा विसंवाद आहे हे पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेला दाखवून दिले आहे. आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडत असताना माननीय श्री.अजितदादा पवार यांनी जे सर्वसामान्य वक्तव्य केले होते ते कारण नसताना रेकॉर्डवर आणण्याचा सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांचा काय हेतू होता हे मला समजत नाही. एकंदरीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून दिशाहीन आणि भरकटलेला राज्य कारभार दिसून आला. या अभिभाषणातून सरकारची दुर्दशा आणि दिशाहिनता दिसून आली. या अभिभाषणावर बोलताना या सरकारमध्ये दोन प्रकारची मते असल्याचे दिसून आले. एकंदरीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस किंबहुना महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बाहेर जी वक्तव्ये केली ती सुद्धा विसंवादी होती. माननीय जलसंपदा मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.जयंत पाटील यांनी विरोधकांच्या घोषणांना कंटाळून राज्यपाल निघून गेले असे वक्तव्य केले. काँग्रेस पक्षाच्या माननीय महिला व बालकल्याण मंत्री यांनी राज्यपालांनी छत्रपतींचा अपमान केला म्हणून ते निघून गेले. काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी तर असा शोध लावला की, अभिभाषणातील काही ओळी राज्यपालांना वाचायच्या

श्री.प्रवीण दरेकर....

नव्हत्या म्हणून ते निघून गेले, असे सांगितले. माननीय राज्यपाल अभिभाषण अर्धवट सोडून निघून गेल्यामुळे त्यांच्यावर टीका करण्याचा प्रयत्न आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेमध्ये दुर्दैवाने होतो. यापूर्वी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अनेकदा गोंधळ झालेला आहे. २००७, २०१४, २०१६, २०१८ या वर्षी सुद्धा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावेळी गोंधळ झाला होता. परंतु या वर्षी माननीय राज्यपालांना प्रथमच अभिभाषण अर्धवट सोडून निघून जावे लागले. कारण जनतेची फसवणूक करण्यापेक्षा निघून गेलेले बरे असे त्यांना वाटले असावे. दाऊदशी संबंध असलेल्या मंत्र्यांची पाठराखण करण्याचे महापातक करण्यापेक्षा निघून गेलेले बरे, अशा प्रकारचा विचार माननीय राज्यपालांनी केला असावा असे मला वाटते. मुळात जी गोष्ट माननीय राज्यपाल बोललेच नाहीत त्या बाबत सांगितले गेले. छत्रपतींच्या बाबतीत गुरु-शिष्याच्या परंपरेवर बोलत असताना टीकाटिप्पणी झाली. परंतु मी माननीय श्री.अजितदादा पवार यांचे अभिनंदन करेन की, त्यांनी कोणीही बोलताना सांभाळून बोलावे असे मोकळेपणे सांगितले. कारण जे वक्तव्य केले जाते त्यातून अनेकदा विपर्यास होतो आणि त्यातून पक्षीय वाद निर्माण होऊन वातावरण बिघडते. परिणामी जनतेला राज्यकर्ते, विरोधी पक्ष आणि नेत्यांवर टीकाटिप्पणी करण्यास वेळ मिळतो.

सभापती महोदय, केवळ व्यक्तीचे नाव घेऊन कारभार सुधारता येत नाही, त्यासाठी कृतीची देखील जोड आवश्यक असते. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक असून ते आपल्या सर्वांचे दैवत आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकारचे काय झाले ? या स्मारकारची गेल्या दोन वर्षात काय प्रगती झाली याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नाही. तसेच स्मारकारचे ठिकाण बदलायचे की काय, यावर चर्चा सुरु आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची एकही वीट गेल्या दोन वर्षात रचली गेली नाही. अशा थोर व्यक्तींच्या स्मारकारकडे हे सरकार दुर्लक्ष करीत आहे. दुसऱ्या

श्री.प्रवीण दरेकर....

बाजूला त्यांनी घालून दिलेल्या उच्च आदर्शांचे पालन करीत आहोत असे भासविण्याचा प्रयत्न माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून केला जात आहे.

सभापती महोदय, आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचीच नव्हे तर त्यांच्या स्मारकारची देखील उपेक्षा राज्य सरकारकडून होत आहे. मी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाबाबत सरकारकडून माहिती मागितली होती. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मला असे कळविण्यात आले की, या स्मारकारसाठी अगोदर १०० कोटी रुपये प्रस्तावित होते. नंतर ४०० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. जानेवारी, २०२२ पर्यंत स्मारकावर ४२ कोटी रुपये खर्च झाला आणि स्मारक प्रगतीपथावर असून २६ टक्के भौतिक प्रगती साध्य झाल्याचे नमूद केले आहे. भौतिक प्रगती कोणाची झाली हा चर्चेचा विषय होऊ शकेल. सभापती महोदय, या खर्चाचे जे विवरण देण्यात आले ते मुद्दाम मी सरकारच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, या खर्चातील ४ लाख १५ हजार रुपये ट्री कटींगवर, ६ लाख ३३ हजार ५८४ रुपये डेब्रिज शिफ्टींगवर, ट्राफीक डिपार्टमेंटच्या परवानग्यांसाठी १२.५० लाख रुपये खर्च झाले आहेत. बीटीआरएस ट्रस्टला अगोदर ६६ लाख रुपये व नंतर पुन्हा ६ लाख रुपये दिले गेले. सॉईल इन्व्हेस्टीगेशनसाठी ७-८ लाख रुपये खर्च करण्यात आला. तसेच अनेक कंत्राटदारांना ३७ कोटी रुपयांचे अग्रीम देयक अदा केले आहे. देयक अदा करण्याच्या बाबतीत माझा आक्षेप नाही. बाळासाहेबांच्या स्मारकावर अजून हजारो कोटी रुपये खर्च केले तरी त्यास आमचे समर्थन असेल. कारण ते आपल्या सर्वांसाठी श्रद्धास्थान आहेत. महोदय, या स्मारकासाठी शासनाच्या विभागाकडूनच परवानग्या दिल्या जातात. त्यासाठी १२-१५ लाख रुपये खर्च कशासाठी करायचा, हा खर्च आपण माफ करु शकत नाही काय ? आपण अनेक विकासकांचा कर माफ करतो, परदेशातील मद्यांवरील कर माफ करतो. आपण अशा अनेक गोष्टी माफ करीत असताना बाळासाहेबांच्या

श्री.प्रवीण दरेकर....

स्मारकासाठी परवानग्या घेण्यासाठी १२ लाख रुपये खर्च करण्यात आला. मला वाटते बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे काम पाहिजे त्या गतीने पुढे जात नाही.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकारची सुद्धा तीच परिस्थिती आहे. आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री असताना सर्व अडचणी दूर करुन स्मारकाचे काम अधिक गतीने करणे आवश्यक आहे. या स्मारकाच्या आर्थिक तरतुदीसाठी कोणाचा आक्षेप नाही, आर्थिक तरतुदीसाठी सर्वांचे समर्थन आहे. परंतु गतीने हे स्मारक झाले पाहिजे, अशी मागणी मी या चर्चेच्या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये हिंदुत्वाचा ठसा अपेक्षित होता, परंतु अभिभाषणात साधा पुसटसा स्पर्श सुद्धा केल्याचे दिसत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात ना मराठी माणसाच्या हिताच्या गोष्टीचा प्रभाव दिसत आहे, ना हिंदुत्वाचा प्रभाव दिसत आहे. बाळासाहेबांनी आयुष्यभर तिथीनुसार शिवजयंती साजरी करावी अशा प्रकारचा आग्रह धरलेला होता. आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर शिवजयंती तिथीनुसार साजरी करायची की तारखेनुसार साजरी करायची यावर त्यांचे काही तरी भाष्य येणे अपेक्षित होते. राज्य सरकार म्हणून त्यांच्याकडून एक निर्णय अपेक्षित होता. परंतु बाळासाहेबांना अभिप्रेत असलेला शिवजयंतीचा शासन निर्णय हे सरकार घेऊ शकले नाही.

सभापती महोदय, धाराशीव, संभाजीनगर असे नामकरण करण्यासाठी मंत्रिमंडळासमोर कधी प्रस्ताव आणणार आहात हे सांगण्याची आवश्यकता आहे. यासाठी सरकारला वेळ नसेल तर त्यांच्याकडे कोणत्या कामासाठी वेळ आहे ?

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदय, मला कमी वेळेत अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत. उस्मान सरजीलचे काय झाले ? सामना दैनिकात किती दिवसांत त्याला अटक करण्यात येईल असे सांगितले होते, हिजाबचे काय झाले या संदर्भात इतर आयुधांवरील भाषणाच्या वेळी निश्चितपणे बोलेन.

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

आपली संतांची भूमी आहे. आपल्या येथील तीर्थक्षेत्रांचा विकास रखडलेला आहे. महाराष्ट्राचे दैवत श्री क्षेत्र पंढरपूर आहे. आज त्या क्षेत्राची काय अवस्था आहे ? शासनाच्या भूजल सर्वेक्षण विभागाने याच महिन्यात अहवाल सादर केला आहे की, चंद्रभागेचे पाणी पिण्यास अयोग्य आहे, ते भाविकांनी पिऊ नये. भाविकांना त्यापासून जीवितास धोका आहे, अशाप्रकारे सांगितले आहे. आजही भाविकांना पुरेशा सोयीसुविधा तेथे मिळत नाहीत. सर्व समस्यांवर उपाय म्हणून स्वतंत्र तीर्थक्षेत्र मंत्रालयाची निर्मिती करण्याची मागणी मी गेल्या वेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी केली होती. त्याची कुठेही सरकारला दखल घ्यावीशी वाटत नाही. मागील आर्थिक वर्षातील तीर्थक्षेत्रांवरील खर्च पाहिला तर घोषणा व कृती यांची दयनीय अवस्था दिसत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी आश्रम अमरावती विकास विशेष कृती कार्यक्रमांतर्गत साधारणपणे ४० लाख १० हजार रुपयांची तरतूद केली होती, त्यापैकी फक्त २५ ते २६ लाख रुपये वितरित झाले. २० लाख रुपये एवढे वितरित झालेले, खर्च पूर्ण होऊ शकला नाही. गजानन महाराज, शेगाव तीर्थक्षेत्राबाबतीत देखील ६७ लाख २० हजार रुपये अर्थसंकल्पीय तरतूद केली होती. फक्त २४ लाख रुपये वितरित केले आणि त्यातील फक्त १५ ते २० लाख रुपये खर्च केले. घोषणा, वितरण व खर्च हे वेळेत झालेच नाही तर तीर्थक्षेत्रांचा विकास पूर्ण होऊ शकणार नाही. संत गाडगेबाबा निर्माण भूमी वलगाव अमरावती यासाठी २३ लाख रुपयांची तरतूद केली. मात्र वितरण व खर्च नाही. श्री क्षेत्र कौंडिण्यपूर, अमरावती यासाठी २ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केली. ४० लाख रुपये खर्च वितरित झाला. श्री क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, पुणे यासाठी ४० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केली. केवळ १२ लाख रुपये वितरित झाले आणि १२ लाख रुपयांचा खर्च झाला. घृष्णेश्वर, वेरुळची देखील तीच अवस्था आहे. तरतूद केली मात्र एक रुपया वितरित नाही, खर्च नाही.

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

सभापती महोदय, मी मागच्या वेळी मंगळवेढ्यासारख्या भूमीत संत परंपरेला साजेसे अध्यात्मिक पर्यटन केंद्र झाले पाहिजे अशी मागणी केली होती. मात्र त्याचा देखील उल्लेख दिसत नाही. मला अपेक्षा होती. महानगरपालिकेमध्ये २५ वर्षे शिवसेनेची सत्ता आहे. मात्र आजही महानगरपालिकेमध्ये मराठीचा कारभार पूर्णत: दिसत नाही. मी अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे. मला आलेली बऱ्यापैकी सर्व माहिती इंग्रजीतून आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निदर्शनास मी हे खासकरुन आणू शकतो. कारण ते सातत्याने या सभागृहात मराठीसाठी अगदी टोकाचा आग्रह धरत असतात.

सभापती महोदय, मी उदाहरणादाखल सांगतो. मी दिनांक २९.१०.२०२१ ला पत्र दिले. दिनांक ३.१२.२००१ ला पत्र दिले. सर्व करार, संरचनात्मक अहवाल बैठकीचे इतिवृत्त अशा सर्व गोष्टी इंग्रजीमध्ये आहेत. दिनांक १.१.२०२१ चे पत्र आणि माझे दिनांक २१ जानेवारी तांत्रिक सल्लागार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त देखील मला इंग्रजीमध्ये आले आहे. आपण इतकी वर्षे मराठी माणसांच्या .... मी माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई साहेबांना सागू का ? सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब तसे म्हणत आहेत. माननीय मंत्र्यांकडे गेलो तर त्याची अंमलबजावणी वेगाने होईल, त्यांच्याकडे मराठी भाषा विभाग देखील आहे. पण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हा विषय पोटतिडकीने मांडतात. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई हेच हा विषय मांडतात. मी माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई यांना सांगू इच्छितो की, माझी एवढीच अपेक्षा आहे, ती टीकेच्या अर्थाने घेऊ नका. आज करण्याची वेळ आली आहे. सर्व गोष्टी मराठीतून शंभर टक्के झाल्या पाहिजेत. महापालिकेच्या कामकाजाची अधिकृत भाषा मराठी असावी असा ठराव दिनांक ३० मार्च, १९७२ रोजी त्या ठिकाणी होऊन ५० वर्षे झाली आहे. मात्र अद्यापही मराठी भाषा विभाग तेथे स्थापन झालेला नाही. आपल्याला हे वास्तव मान्य करावे लागेल. मुंबई महानगरपालिकेच्या कामकाजाची व व्यवहाराची मराठी भाषा

श्री. प्रवीण दरेकर ....

असुनही आजही विभागांतर्गत सर्व पत्रव्यवहार इंग्रजीमध्ये होत आहेल. सर्व गोष्टींचा गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्री आपल्या पक्षाचे आहेत. मराठी भाषा आपली अस्मिता, बेस आहे. आपण सत्तेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सोबत असल्यामुळे की काय आपल्याला गतीने निर्णय घेता येत नाहीत, हे मला माहीत नाही.

सभापती महोदय, आज मुंबईतून अनेक मराठी माणसे हद्दपार होत आहेत. अनेक प्रकल्प रेंगाळलेले आहेत. मुंबईतील मराठी माणूस वसई, विरारला जात आहे, कल्याण, डोंबिवलीच्या पुढे कसाऱ्यपर्यंत जात आहे. शिवडी, वरळी उन्नत मार्गीका प्रकल्प आहे. मी एलिफिन्स्टॉन-प्रभादेवी ब्रिजच्या वेळी तेथे भेट दिली होती. तेथे तो प्रकल्प आहे. शेकडो कुटुंबे आज विस्थापित होत आहेत. ते सांगत आहेत की, आमची मुले-बाळे येथे शिकत आहेत, आम्हाला येथेच कुठे तरी जागा द्यावी. आपण जागा देऊ शकत नाही. मराठी माणसांची गरज संपली की काय हे मला कळण्यास मार्ग नाही. मी या संदर्भातील निवेदन सरकारला दिले आहे. त्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी करावे अशी मागणी मी केली आहे. कारण ते १०० वर्षे तेथे राहत आहेत. ते मुंबईतून हद्दपार होणार नाहीत याची दक्षता आपण घेणार नाही तर कोण घेणार आहे ? आम्ही त्यासाठी उपाय देखील सुचवित आहोत. मी केवळ बोललो की, त्यांना येथेच जागा द्यावी. आपल्याकडे येथे जागा आहे. स्व. प्रमोद महाजन गार्डनजवळ भूखंड आहे. तेथे प्रभादेवीला त्यांना शिफ्टिंग करता येईल. आपण तसे का करीत नाही ? आपल्याला त्या भूखंडावर अतिक्रमण करायचे आहे का, दुसऱ्या कोणाला ताब्यात द्यायचा आहे का ?

सभापती महोदय, मला वाटते की, असे येथे केवळ भावनिक बोलण्यापेक्षा आता कृतीची आवश्यकता आहे. आरक्षणाचा खेळखंडोबा पूर्णपणे चाललेलाच आहे. माननीय मंत्री श्री. नवाब मलिक साहेब मुस्लिम आरक्षणासंदर्भात घोषणा करतात आणि नंतर माननीय मुख्यमंत्री भूमिका स्पष्ट करतात. धनगर आरक्षणाच्या

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

संदर्भात देखील विधानसभेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणसदृश सवलती द्याव्यात असे सांगितले आहे. परंतु आज त्या सवलती देखील त्यांना मिळत नाहीत. मराठा, ओबीसी आरक्षणाबाबतीत सरकार काय करीत आहे ? दोन्ही आरक्षणे सरकारने घालविली आहेत. सर्व जिव्हाळ्याचे, अस्मितेचे विषय आहेत, त्यावर कोणत्याही प्रकारचे भाष्य माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आलेले नाही. ५० टक्क्यांपेक्षा जास्त पाने कोविडवर आहेत. कोविडवर ती असलीच पाहिजेत. कारण कोविड संकट होते. कोविडच्या संदर्भात शासन काय करीत आहे, शासन भविष्यात काय करणार आहे, अशी आपत्ती आली, रोग आले, संसर्ग रोग आला तर शासन काय करीत आहे हे सांगण्याची आवश्यकता होती. परंतु कोविडच्या आड सरकारने सातत्याने स्वत:चा नाकर्तेपणा लपविण्याचा प्रयत्न केला आहे. कोविडच्या आडून मास्क, पीपीई किट व्हेंटिलेटर्स अशा सर्व खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे अनेकदा उदाहरणासहित सभागृहात सांगितले आहे. परंतु सरकार त्यावर बोलण्यास अजिबात तयार दिसत नाही. कोरोनाच्या काळात एनसीआरबीच्या अहवालानुसार सर्वाधिक आत्महत्या राज्यात झाल्या आहेत. १९ ते २० हजारांच्या आसपास छोटे व्यावसायिक व्यापारी, विक्रेते अडचणीत आले आहेत. मी माननीय अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्यासमोर गंभीर समस्या मांडत आहे. आपण अर्थमंत्री असल्याने आपल्याला विनंती आहे.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदय, माझी अर्थमंत्री महोदयांना विनंती आहे की, महाराष्ट्रातील रुग्णालये व कमर्शिअल कॉम्पलेक्समध्ये आगी लागल्या होत्या. त्यावेळी फायर ऑडीट करण्याचे आदेश शासनाने दिले. अग्नीकांड घडल्यानंतर तातडीने फायर ऑडीट करण्याचे आदेश दिल्यावर तेथे अग्निशमन यंत्रणा उभारण्यासाठी निधीची मागणी करण्याचे प्रस्ताव शासनाकडे आल्यावर त्या फाईल प्रलंबित आहेत. यामुळे पुन्हा पुन्हा आगी लागत आहेत. सक्षम फायर यंत्रणा उभारण्यासाठी शासनाने निधी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कोरोना काळातील अनेक खरेदीच्या बाबी मी सभागृहात मांडल्या होत्या. त्याबाबत शासनाने दखल घेतली नाही. कोविड सेंटरची उभारणी करताना झालेला भ्रष्टाचार याबाबत मी बोललो. १८० रुपयांचा मास्क ३७० रुपयांत घेतला. ४०० रुपयांचे पीपीई किट २००० रुपयांत खरेदी केले. पाच लाख रुपयांचे व्हेंटिलेटर १८ लक्ष रुपयांना खरेदी केले. कोविड टेस्ट लॅबसाठी अव्वाच्या सव्वा भाडे आकारण्यात आले या बाबी मी आकडेवारीसह दिल्या होत्या त्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेल्या पत्राला गांभीर्याने घेतले जात नाही. हे मला नम्रपणे आपल्या माध्यमातून सरकारला सांगावेसे वाटते. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १६.१०.२०२० रोजी पत्र दिले. दिनांक ०२.११.२०२० रोजी पत्र दिले. ११.१२.२०२० रोजी मी चौकशीची मागणी केली. विधीमंडळाच्या सन २०२० च्या पावसाळी अधिवेशनात दिनांक ०८.०९.२०२० रोजी तसेच हिवाळी अधिवेशात दिनांक १५.१२.२०२० रोजी कोविडच्या नावाखाली जनतेची लुटमार होते याबाबत चौकशी करण्याची मागणी केली. याबाबत दोन ओळीचे उत्तर मला देण्यात आले नाही. असे प्रश्न मी वारंवार मांडत असून या सर्व कृत्यांना संरक्षण देण्याचे काम शासकीय यंत्रणा करीत असल्याचे दिसते. विरोधी पक्षाची ही अवस्था असल्यामुळे शासनाकडे मागणी करुन सर्व मार्ग संपल्यामुळे यामध्ये लक्ष घालण्यासाठी मी लोकआयुक्तांना दिनांक ५.१.२०२२ रोजी पत्र दिले.

श्री.प्रवीण दरेकर.....

राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोविड संदर्भात पारदर्शकपणे काम झाले असे आत्मविश्वास देणारे वाक्य आले असते तर आम्हाला आनंद झाला असता.

सभापती महोदय, सरकारची अशीच परिस्थिती लस निर्मितीमध्ये आहे. कोविडचे मुद्दे १० ते १२ पानांवर नमूद करण्यात आले आहेत. काय केले व काय करणार आहोत यावर कोणतेही भाष्य अभिभाषणात नाही. कोविडची तिसरी लाट ओसरली व केंद्राच्या मदतीने कोविडचा बुस्टर डोस देण्यात सुरुवात झाली.तरी देखील राज्य सरकारकडून हाफकिन संस्थेकडून लस तयार झाली नाही. केंद्र शासनाने परवानगी द्यावी अशी राज्य सरकारने मागणी केली होती. ती मागणी केंद्र शासनाने मान्य केली. याबाबत कोणतीही प्रगती झालेली नाही. दिनांक ८.४.२०२१ रोजी मंत्रिमंडळाने हाफकिन संस्थेत लस तयार करण्याचा निर्णय घेतला. केंद्र शासनाने त्यासाठी ६५ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य राज्य शासनाला दिले. अद्यापही लस निर्मितीचा पत्ता नाही. देशात बुस्टर डोस सुरु झाला असून हे सरकार अद्याप लस निर्माण करु शकले नाही.

सभापती महोदय, ऑक्सीजनबाबत सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी उल्लेख केला. मिशन ऑक्सीजन स्वावलंबन योजनेचे नाव मोठे व लक्षण खोटे कसे आहे हे मी लक्षात आणून देतो. राज्यात ३ हजार मे.टन ऑक्सीजन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेऊन उद्योगांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने दिनांक १२.०५.२०२१ रोजी घेतला. त्यानंतर तिसरी लाट येऊन गेली. जनतेच्या सुदैवाने या लाटेत अप्पर रेस्पीरेटरी इन्फेक्शन असल्यामुळे ऑक्सीजनची आवश्यकता वाटली नाही. अन्यथा ऑक्सीजन लागला असता. ३००० मे.टन पैकी किती उत्पादन झाले. ऑक्सीजन स्वयंपूर्ण करण्याबाबत काय झाले याचे उत्तर मिळत नाही. फक्त मिशन ऑक्सीजन स्वावलंबन हे फक्त नाव मोठे आहे. अशा प्रकारे सरकारचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, शासानाने कोविड काळात पत्रकारांची उपेक्षा केली. कोरोना महामारीच्या काळात पत्रकारांनी जीवाची पर्वा न करता कोराना विषयक बातम्या व माहिती पुरविण्याचे काम केले. त्या पत्रकारांना शासन न्याय देऊ शकले नाही.

श्री.प्रवीण दरेकर....

कोरोना सेंटरमध्ये अव्यवस्था होती, कोरोनाशी लढणाऱ्या यंत्रणेतील त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने प्रत्येक पिडीतापर्यंत पोहचण्याचे व त्याच्या अडचणी शासनापर्यंत मांडण्याचा नेटाने प्रयत्न पत्रकारांनी केला. पत्रकारांना खरे तर फ्रंटलाईन वर्कर घोषित करण्याची आवश्यकता होती. याबाबत शासनाने संवेदनशीलता दाखविली नाही. शासन योजना चांगल्या आणते. या योजना कशा भरकटतात हे मी मिशन वात्सल्य योजनेबाबत सांगू इच्छितो. कोविडमुळे पतीचे निधन झाल्यामुळे विधवा महिलांना विद्यमान शासकीय योजनांचा लाभ देण्याठी वात्सल्य अभियान सुरु केल्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आहे. कोविडमध्ये अनाथ झालेल्या बालकांसाठी मिशन वात्सल्य योजना शासनाने सुरु केली. कोविडमुळे राज्यात १ लाख ४३ हजार मृत्यू झाले. त्यापैकी प्रत्येकाला किमान एक अपत्य आहे असे समजले तरी १ लाख ४३ हजार इतक्या बालकांनी आपले पालक गमावले आहेत. जी बालके अनाथ झाली, महिला विधवा झाल्या त्यांना शासनाद्वारे मिळणाऱ्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तालुका स्तरीय वात्सल्य समितीच्या माध्यमातून आर्थिक योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. मला संबंधित विभागाकडून जी माहिती मिळाली त्यातून भयानक माहिती समोर आली आहे की, किती मदत झाली. मुंबई शहरात १७१ विधवा महिला आहेत, त्यांना २५ प्रकारच्या योजनांपैकी फक्त ३ योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला. त्या तीन योजना अशा आहेत १० महिलांचे बँक खाते उघडण्यात आले. १० महिलांना आधारकार्ड दिले. १० लाभार्थ्यांना जन्ममृत्यूचे दाखले दिले असे हे मोठे लाभ मिळवून दिले आहेत. स्थानिक प्रशासन हे वर्षानुवर्षे देत आले आहे. मिशन वात्सल्य या गोंडस नावाखाली शासनाने काय दिले. मला वेगवेगळया विभागाकडून वेगवेगळी माहिती प्राप्त झाली आहे. त्या माहितीतून शासनाची अनास्था दिसून येते. केवळ सरकारवर आरोप करणे व टीका करणे हा माझा उद्देश नसून एखादी घोषणा केल्यावर त्या घोषणेची अंमलबजावणी होत नसेल तर राज्यपाल महोदयांच्या भाषणात गोंडस चित्र दाखवून त्याचा काय उपयोग होणार आहे. ही सर्व माहिती मी सरकारच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.प्रवीण दरेकर...

सभापती महोदय, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांनी दिनांक २७ ऑगस्ट २०२१ रोजी घेतलेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार असे मला समजते की, उपनगरातील २४ अनाथ बालकांपैकी १४ बालकांचे प्रस्ताव पाठविण्यात आले. उपनगरातील ४९० विधवा महिलांपैकी केवळ १० महिलांना लाभ मिळवून देण्यात आला. त्यामध्ये आधार कार्ड, बँक खाते, काढून देणे व जन्म व मृत्यू दाखला देण्यात आला आहे. शासकीय योजनांसाठी बँक खाते उघडून देण्याचे काम तलाठी देखील करतो.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

स्थानिक प्रशासन अनेक वर्षांपासून जन्म-मृत्यूचे दाखले देत आहे. मग वात्सल्य समिती कोणते काम करते ? नागपूर, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात स्वयंसेवी संस्था या कामात नसल्याचे शासनाचे म्हणणे असून ते हास्यास्पद आहे.

सभापती महोदय, कोविडमुळे पुणे शहरात २२६५ बालके अनाथ झालेली आहेत. त्यापैकी ० ते १८ वयोगटातील बालके ९२ असून केवळ १९ बालकांना ५ लाख रुपये मिळालेले आहेत. ३१६ बालकांना बालसंगोपनाचा लाभ मिळालेला आहे. म्हणजे पुणे शहरात २२६५ अनाथ बालकांपैकी जवळपास हजार बालकांनाच या योजनेचा लाभ मिळालेला आहे. पुणे जिल्ह्यातील बारमतीसह १३ तालुक्यांची माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पुणे या कार्यालयाकडे अनाथ बालके व विधवा महिलांची यादी व संख्या उपलब्ध नसल्यामुळे माहिती सादर करता येत नाही, असे लेखी कारण दिले जाते. म्हणजे पुणे शहर वगळता पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये कोविडमुळे पालक गमावून अनाथ झालेले एकही बालक नाही असे सरकारला सांगावयाचे आहे काय ? माझ्याकडे विविध जिल्ह्यातील आकडेवारी आहे. सोलापूर जिल्ह्यात तीच परिस्थिती आहे. परंतु या संदर्भातील संपूर्ण आकडेवारी देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, कोरोना काळात विधवा झालेल्या महिला शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. १४७१५ विधवा महिलांपैकी ९७ टक्के महिला ग्रामीण भागातील असून त्या महिला शासकीय योजनांपासून वंचित आहेत. अनेक लोकांवर खाजगी सावकारांचे व पतपेढ्यांचे कर्ज आहे. शासनाने या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने त्या गोष्टीकडे लक्ष दिले जात नाही.

सभापती महोदय, सरकारने किमान समान कार्यक्रमाकडे लक्ष दिले पाहिजे. किमान समान कार्यक्रमात काय सांगितले होते ? किमान समान कार्यक्रमात आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शून्य दराने शैक्षणिक कर्ज पुरविण्याची घोषणा केली होती. शेतकऱ्यांना तत्काळ मदत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. सुशिक्षित बेरोजगार

श्री.प्रवीण दरेकर.....

तरुणांना छात्रवृत्ती देण्यात येणार होती. शासनाने महिला संरक्षणासाठी प्राधान्य देण्यासाठी धोरण तयार केले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु या घोषणांचे काय झाले ? आपण वाईनसाठी प्रोत्साहन देत आहात. किमान समान कार्यक्रमात करण्यात आलेल्या घोषणांची पूर्तता होत नाही. शासनाने शेतकरी, विद्यार्थी यांच्यासाठी कोणताही ठोस कार्यक्रम तयार केलेला नाही. किराना दुकानात वाईन विक्रीसाठी परवानगी देण्यात आलेली आहे. आज राज्यात पारंपारीक शेती पूरक उद्योगाबाबत काय परिस्थिती आहे ? या संदर्भात सरकारकडून भाष्य केले जात नाही, निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. त्यामुळे या निमित्ताने सरकारच्या प्रॉयॉरिटी काय आहेत हे समजून घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असताना दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी प्रती लिटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. दूध उत्पादक शेतकऱ्यांची दुधाला प्रती लिटर ३५ रुपये भाव द्यावा अशी मागणी आहे. दुग्ध विकास मंत्र्यांनी ज्या प्रमाणे ऊसासाठी एफआरपी दिली जाते त्या प्रमाणे दुधासाठी मदत केली जाईल अशी घोषणा केली होती. परंतु या संदर्भात कोणतीही कृती होताना दिसत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात शेतकरी केंद्रबिंदू नसल्यामुळे आम्हाला खेद होत आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री, शिवसेना पक्षाने गड किल्ले या संदर्भात सातत्याने चांगली भूमिका घेतली, चांगल्या प्रकारच्या घोषणा केलेल्या आहेत. परंतु अद्याप त्या घोषणा बसनातच आहेत. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो. आपण रायगड किल्ल्यावर जाऊन किल्ल्याची अवस्था बघावी. रायगड प्राधिकरणाकडून तेथे जे बांधकाम करण्यात येत आहे त्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. आपण त्या संदर्भात चौकशी करावी. रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून रस्ते, मूलभूत सुविधांबाबत अनेक तक्रारी आहेत. परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही.

श्री.प्रवीण दरेकर.....

सभापती महोदय, महाराष्ट्र ही कलावंतांची भूमी आहे. परंतु कलावंतांच्या भूमीमध्ये कलावंतांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोविडमुळे आर्थिक ताण सहन करावा लागलेल्या राज्यातील ५६ हजार कलाकारांना व ८४७ संघटनांना ३५ कोटी रुपये एकरकमी आर्थिक सहाय्य दिल्याचा बडेजाव करण्यात आला आहे. परंतु वस्तुस्थिती मात्र निराळीच आहे. मी ती वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कलाकार व संस्थांना अर्थसहाय्य देण्याचा दिनांक १३.१.२०२१ रोजी मंत्री मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयामध्ये कोणत्या संस्था, कोणती व्यक्ती, कोणते निकष, निधीची तरतूद किती असावी अशी कोणत्याही प्रकारची स्पष्टता नव्हती. मी पुणे येथील उदाहरण देतो. भारुड सम्राज्ञी श्रीमती कुलकर्णी पुणे येथे राहतात. मध्यंतरी मला त्यांचा फोन आला होता. त्यांना राज्य शासनाकडून अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. लिमका बुक ऑफ रेकॉर्डने त्यांच्या कलेची दखल घेतलेली आहे. त्या ८० वर्षाच्या गृहीणी असून पुणे येथे एकट्या राहतात. महिला व बाल विकास कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालयात त्यांनी अनेक फोन केले. परंतु कोणीही दाद देत नाही अशी त्यांची तक्रार आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपण संत एकनाथांचे भारुड, संत तुकारामांचे अभंग, ज्ञानेश्वरीच्या ओव्या ऐकत मोठे झालेलो आहोत. आज वयोवृद्ध भारुड सम्राज्ञी सरकारकडे मदतीची याचना करीत आहे. परंतु त्यांचे दु:ख ऐकून घेण्यासाठी सरकारकडे वेळ नाही. सांस्कृतिक वारसा लाभलेल्या राज्यातील कलाकारांची अशी अवस्था आहे.

सभापती महोदय, कोणताही विषय उपस्थित झाल्यानंतर केंद्र शासनाकडे बोट दाखविले जाते. केंद्र शासनावर टीका केली जाते. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी केंद्र सरकारवर टीका केली. केंद्र शासनाने काय केले याचा गोषवारा मी पुन्हा देणार नाही. १५ हजारांपेक्षा अधिक व्हेंटीलेटर्स सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे राज्य शासन सांगत आहे. मात्र कोविडची लाट येण्यापूर्वीच ६५०० व्हेंटीलेटर्स

श्री.प्रवीण दरेकर.....

राज्याकडे होते. केंद्र शासनाने कोविड काळात ४५०० व्हेंटीलेटर्स उपलब्ध करुन दिले. (...अडथळा...) उर्वरित ४ हजारांमध्ये ९० टक्के खाजगी संस्थांनी दिले होते. म्हणजे १ हजार व्हेंटीलेटर्स खरेदी करुन १५ हजार व्हेंटीलेटर्स खरेदी केल्याचे श्रेय लाटण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे "आयजीच्या जीवावर बायजी उदार" असे म्हणण्याची वेळ आली आहे. दररोज ४५० मेट्रीक टन ऑक्सिजनची तूट भारतीय हवाई दल व रेल्वेने दूर केली हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात मान्य करण्यात आले आहे या गोष्टीचे आम्हाला समाधान आहे.

यानंतर श्री.गागरे.......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

सभापती महोदय, अभिभाषणात म्हटले आहे की, महाराष्ट्र लसीकरणाच्या मात्रा दिलेल्या एकूण संख्येच्या बाबतीत आघाडीवर असलेले राज्य आहे. पण यामध्ये राज्य सरकारचा हिस्सा किती आहे, हे माहिती होणे आवश्यक आहे. आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना आघाडीच्या कोरोना योध्दयांना किंवा ६० वर्षावरील नागरीकांना लस प्रभाववर्धक मात्रा देण्याचे काम सुरु झाल्याचे सांगितले आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत ५० लाखाची नुकसानभरपाई देण्याची केंद्र सरकारची योजना आहे. केंद्र सरकारच्या सर्वच योजना मी सांगत नाही पण जे चांगले आहे त्याला चांगले म्हणावे अशा प्रकारची आपणाकडून अपेक्षा आहे. एनडीआरएफ, शिक्षण अभियानात काय मदत केली या सर्व गोष्टींचा मी पाढा वाचत बसणार नाही. त्यामुळे अभिभाषणात २०१५ ते २०१९ या कालावधीत ज्या महत्वाकांक्षी सुरु झालेल्या योजनांना आपल्या योजना असल्याचे दाखविले आहे. मुद्दा क्रमांक ४४ हायब्रिड ॲन्युएटी योजना, मुद्दा क्रमांक ४५ समृध्दी महामार्ग, मुद्दा क्रमांक ४७ मुंबईतील सागरी किनारा मार्ग, मुद्दा क्रमांक ६० वरळी नायगाव येथील बीडीडी चाळीचा पुनर्विकास अशा प्रकारचे सांगण्यासारखे नवीन काही नसल्याने जुन्या काळातील योजना सांगण्याचा व मांडण्याचा प्रयत्न आहे. मुद्दा क्रमांक ३७ मध्ये अभिभाषणात माझ्या शासनाने आपत्तीना तत्परतेने व प्रभावीपणे प्रतिसाद दिला अशा प्रकारचा उल्लेख केला आहे, याकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधी म्हणून १५ हजार कोटी रुपये व राज्याच्या अर्थसंकल्पातून अतिरिक्त ५५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्याचा उल्लेख आहे. वास्तविक पाहता अभिभाषणात गतवर्षातील मागोवा व पुढील वर्षाच्या उपाययोजना व आढावा मांडणे अपेक्षीत आहे. परंतु महाविकास आघाडीकडे सांगण्यासारखे काही नसल्यामुळे तुम्हाला एक वर्षाची सुट आम्ही देतो. हे सरकार आल्यापासून तुम्ही नवीन केलेल्या बाबी सांगण्याची मुभा तुम्हाला देतो.

श्री.प्रवीण दरेकर .....

सभापती महोदय, मदत व पुनर्वसन खात्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार २०२०-२०२१ या वर्षामध्ये ५७९९ कोटी एवढी रक्कम एसडीआरएफमधून प्राप्त झालेली आहे. रत्नागिरी, रायगड व इतर क्षेत्रात आलेल्या तौक्ते चक्रीवादळापासून ते महापूरासारख्या अनेक नैसर्गिक आपत्तींना राज्याने तोंड दिलेले आहे. या आपत्तीमध्ये ४६१ जणांचा मृत्यू झाला. ७३६० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीची सार्वजनिक मालमत्ता नष्ट झाली. माझ्या शासनाने या आपत्तीला तत्परतेने व प्रभावीपणे प्रतिसाद दिला व याकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून १५००० कोटी रुपये व राज्याच्या अर्थसंकल्पातून अतिरिक्त ५५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले.

सभापती महोदय, अत्यंत चीड आणणारी गोष्टी मी सभागृहात मांडत आहे. मदतकार्य व पुनर्वसन विभागाची दिनांक २० डिसेंबर २०२१ ची अधिकृत माहिती माझ्याकडे आहे, याबाबतचा शासन निर्णय माझ्याकडे आहे. सर्व कागदपत्रे मी आपणाकडे पाठवितो. मदत कार्य व पुनर्वसन विभागाने दिलेल्या माहितीनुसार २०२०-२०२१ व २०२१-२२ या दोन वर्षात मिळून एसडीआरएफमधून ५७९९ कोटी ६० लाख रुपये इतका निधी शासनाकडून या विभागास मिळाल्याचा त्यात उल्लेख आहे. अभिभाषणात म्हटले आहे की, एसडीआरएफकरीता १५ हजार कोटी अर्थसंकल्पातून ५५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. त्यामुळे आपण कोणाला खोटी माहिती देत आहोत, हा महाराष्ट्र शिक्षित लोकांचा आहे.

सभापती महोदय, जलविद्युत प्रकल्पाबाबत खोटी घोषणा आहे. अभिभाषणात मुद्दा क्रमांक ६५ आहे, माझ्या शासनाने एकूण २६३६ मेगावॅट स्थापीत क्षमतेचे ३४ जलविद्युत प्रकल्प कार्यान्वीत केले आहेत. हे माजी उर्जा मंत्री महोदयांनाही माहिती आहे. १६० मेगावॅट स्थापित क्षमतेचे लघुविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून कार्यान्वीत केले आहेत अशी घोषणा करण्यात आली. वस्तुस्थिती काय आहे, महाराष्ट्र शासनाने जलसंपदा विभागामार्फत्त कार्यान्वीत केलेले २६ जलविद्युत प्रकल्प आजपर्यंत उभारलेले आहेत. ते परिचालन व देखभालीसाठी महावितरणकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत, ६ जलविद्युत प्रकल्प जलसंपदा

श्री.प्रवीण दरेकर .....

विभागामार्फत चालविण्यात येतात, २ जलविद्युत प्रकल्प जलसंपदा विभागाने खाजगी प्रवर्तकांना चालविण्यास दिले. थोडक्यात ३४ विद्युत प्रकल्प जलसंपदा विभागाने उभारलेले आहेत, यातील आक्षेपार्ह बाब अशी आहे की, यातील एकही प्रकल्प २०२०-२१ मध्ये कार्यान्वीत झालेला नाही. सर्व प्रकल्प २०२० पूर्वी कार्यान्वीत झालेले आहेत, यातील एक प्रकल्प तर १९६२ मध्ये कार्यान्वीत झालेला आहे. एक प्रकल्प १९५२ मधील आहे, म्हणजेच महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी जो प्रकल्प कार्यान्वीत झाला आहे. असे असताना या प्रकल्पाचा उल्लेख २०२२ च्या अभिभाषणात करणे म्हणजे या सरकारचा कारभार कसा सुरु आहे याचा आरसा दाखविणारे आहे. स्वत: काही न करता दुसऱ्याचे श्रेय कसे लाटायचे. १९५२ मधील प्रकल्पाचा उल्लेख यामध्ये आहे असे मी माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो. माझ्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे तो मजकुर वाचतील.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, अभिभाषणानुसार माझ्या शासनाने एकूण २६३६ मेगावॅट क्षमतेचे ३४ जलविद्युत प्रकल्प कार्यान्वीत केले आहेत. एकूण १६० मेगावॅट स्थापित क्षमतेचे ३९ लघु जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून या शासनाने कार्यान्वीत केले असल्याचा उल्लेख आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन १९५२ च्या प्रकल्पांचा या अभिभाषणात शासन करते, जनतेला व विधिमंडळाला एवढे गृहीत धरुन सांगू नये. ४० विद्युत प्रकल्प खाजगीकरणातून उभे राहिले आहेत, पहिला प्रकल्प २००१ मध्ये पूर्ण झाला, १८ प्रकल्प १५ ते २०१९ मध्ये पूर्ण झाले, १.५ मेगावॅटचे प्रकल्प २०२१ व २०२० मध्ये पूर्ण करण्यात आले, ही वस्तुस्थिती असताना राज्यपाल महोदयांच्या तोंडी घातली जाते. १६० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभे केल्याचा खोटारडा आकडा आहे.

असुधारित प्रत

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छितो की, उपलब्ध वेळेपैकी आपण एक तास घेतला आहे, आपण बोला पण बाकीच्यांचा वेळ कमी करा.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी पाच मिनिटात कन्क्युड करतो. राज्यपालांच्या अभिभाषणात डिजीटल स्वाक्षरी केलेला सातबारा उताऱ्याच्या प्रती निशुल्क वितरीत करण्याचा निर्णय माझ्या शासनाने घेतला असल्याची घोषणा मुद्दा क्रमांक ५५ मध्ये केलेली आहे.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सभापती महोदय, घोषणा आणि वस्तुस्थिती काय आहे, हे राज्यातील जनतेला कळले पाहिजे. अद्याप ७/१२ उताऱ्याच्या डिजिटल स्वाक्षरी असलेल्या प्रती मोफत देण्याचा निर्णयच झालेला नाही. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सन २०२१-२२ मध्ये विशेष मोहीम राबविण्यात आलेली आहे. या मोहीमेंतर्गत ७/१२ उताऱ्याची अद्ययावत प्रत एका खातेदारास एकदाच मोफत उपलब्ध करुन द्यावी असे स्पष्ट आदेश शासन निर्णय क्र.२०२१/२९५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. ही देखील एक खोटारडी घोषणा आहे. शेतकऱ्यांना वर्षातून केवळ दोन-तीनदा ७/१२ च्या उताऱ्याची आवश्यकता भासते. ७/१२ चा उतारा येथून पुढे मोफत मिळणार नाही तर त्याचे शुल्क द्यावे लागणार आहे.

सभापती महोदय, अनाथ मुला-मुलींना शिक्षणात व नोकरीत एक टक्का आरक्षण दिल्याचे सरकार सांगत आहे. परंतु सरकारने यातही केवळ घोषणाच केल्याचे दिसते. दिनांक २३ ऑगस्ट,२०२१ रोजी शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. परंतु प्रत्यक्षात निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही हे म्हाडाच्या सरळसेवा भरती परीक्षेची दिनांक १७.०९.२०२१ रोजीची जाहिरात बघितली तर आपल्या लक्षात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गट-क व गट-ड संवर्गाच्या पदांसाठी दिलेली जाहिरात बघावी. मी माहिती घेतली असता मला अशी माहिती मिळाली की, वन विभागातील श्री.नारायण इंगळे नावाच्या एकाच व्यक्तीला आरक्षणाचा लाभ मिळालेला आहे. ऑगस्ट,२०२१ पासून जवळपास राज्यात केवळ एकाच व्यक्तीला या आरक्षणाचा लाभ मिळालेला आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने १,७९,००० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केलेल्या असून त्यातून ३,३०,००० रोजगार निर्मिती होईल, असे सांगण्यात आले आहे. राज्य शासनाने गुंतवणूक करारावर स्वाक्षऱ्या केल्या. परंतु प्रत्यक्षात किती गुंतवणूक झाली ? रोजगार निर्मिती झालेली आहे काय हे सरकारला सांगता आले नाही. हवामान बदलावरचे भाष्य देखील तशाच

प्रकारचे

श्री.प्रवीण दरेकर.....

आहे. इलेक्ट्रीक वाहन उद्योग समुहांकडून ९ हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव आलेले आहेत. त्या माध्यमातून १० हजार रोजगार निर्माण होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु आता पर्यंत किती उद्योग सुरु झाले ? सरकार केवळ अंदाज वर्तवित आहे. अनेक विषय आहेत, मी या सर्व विषयांचा ऊहापोह करत नाही. वरळी येथील ना.म.जोशी मार्ग, बीडीडी चाळ इत्यादी विषय आहेत. मी त्या संदर्भात अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी बोलणार आहे.

सभापती महोदय, मी शेवटची अभिभाषणावरील कविता सांगून माझे भाषण पूर्ण करतो.

"शिवरायांचा मावळा भगव्याकडे पाहून म्हणाला,
सत्ता येताच असा कसा रे तूझा रंग उडाला,
मावळे आम्ही भाबडे, झुकत होतो फक्त शिवछत्रपतींपुढे,
मात्र आमचा राजा कुर्निसात करतो नवाबांपुढे,
हिंदुत्त्वाचा अभिमान सत्तेमुळे आम्ही गहाण टाकला,
बाळासाहेबांचा सेनानी इतका मिंधा कसा रे झाला,
शिवरायांचा मावळा, वाघाकडे पाहुन म्हणाला,
सत्तेचे कुरण समोर येता, इतका का रे भेदरला,
त्या ठिकाणी टिकेची डरकाळी वाघ तरी फोडत होता,
परंतु सत्तेसाठी आपण कुठे लपत होता,
हिंदुत्त्वासाठी रस्त्यावर तू प्राणपणाने लढत होता,

असुधारित प्रत

घड्याळाला हातावर चढवून शिवबंधन तोडत नव्हता,

शिवरायांचा मावळा छत्रपतींना पाहून म्हणाला,

श्री.प्रवीण दरेकर.....

माफ करा महाराज, सत्तेपुढे तुमचा विसर पडला,

माफ करा महाराज, सत्तेपुढे तुमचा विसर पडला,

संभाजी नगर, धाराशिव सत्तेसाठी विसरुन जाऊ,

मराठी माणसाचा स्वाभिमान तुर्तास तरी गुंडाळून ठेवू

दसरा मेळाव्यात हिंदुत्त्वाचा राग आळवू

महापालिकेच्या खूर्चीसाठी मराठी अस्मिता दाव्याला बांधू

शिवरायांचा मावळा शिवरायांना म्हणाला माफ करा महाराज,

पण तुमचा काळ वेगळा होता,

तेवढा गड-खिंड लढविणारा तानाजी होता,

माफ करा महाराज, तुमचा काळ निराळा होता,

तेव्हा भवानीपुढे स्वराज्याची शपथ घेणारे शिवराय होते.

माफ करा महाराज, पण तुमचा काळ निराळा होता,

तेव्हा औरंगजेब, शायिस्तेखान यांना नेस्तनाबूत करणारा मावळा होता

आता सत्तेसाठी तलवार म्यान करणारा मावळा-सेनापती दिसत आहे.

आता सत्तेसाठी आम्ही हिंदुत्त्व विसरत आहोत,

आता सत्तेसाठी हिंदुत्त्वाची बोली लावणारे राज्यकर्ते आहेत,

शिवरायांचा मावळा शिवरायांना म्हणाला.

धन्यवाद ! जय हिंद !जय महाराष्ट्र!

---------

**सभापती :** माझी सभागृहाला एक सूचना आहे. खरे तर, मी जे म्हणालो होतो तेच होत आहे. माननीय विरोधी पक्षनेते एक तास बोलले. भारतीय जनता पार्टीचे जवळपास ११ सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. आपल्याला ही संख्या थोडी कमी करता आली तर ती करावी. आता सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा कायंदे यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आपले मनोगत व्यक्त करावे.

डॉ.मनिषा कायंदे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी माझे नाव पुकारले होते. परंतु माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बोलण्याचा आग्रह धरल्यामुळे आपण मला थांबण्याची विनंती केली.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या निमित्ताने मला शासनाच्या कामगिरीविषयी उल्लेख करावयाचा आहे. कोविड-१९ या सार्वत्रिक साथीच्या रोगीमुळे पतीचे निधन झालेल्या विधवा महिलांना शासनकीय योजनांचा लाभ देण्यासाठी वात्सल्य अभियान सुरु करण्यात आले आहे. साथीच्या रोगामुळे कुटुंबातील कर्ता पुरुष गमाविलेल्या ग्रामीण भागातील विधवांना उपजीविकाचे साधन निर्माण व्हावे यासाठी देखील वीरभद्रकाली ताराराणी स्वयंसिद्ध योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे साथीच्या रोगामुळे आर्थिक ताण सहन कराव्या लागलेल्या राज्यभरातील ५६ हजार कलाकारांना राज्य शासनाने भरीव मदत केली. त्यांच्या ८४७ संघटनांच्या मार्फत ३५ कोटी रुपये इतकी रक्कम अर्थसहाय्य म्हणून वितरित करण्यात आलेली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सरकारवर टीका केली. परंतु मला असे वाटते की, त्यांनी ही आकडेवारी वाचलेली नसावी. एखाद्या व्यक्तीच्या तक्रारीवरुन टीका करणे योग्य नाही. राज्य

असुधारित प्रत

शासनाने ज्यांना मदत केली त्याकडे मात्र त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. कोविड-१९ सार्वत्रिक साथीच्या रोगामुळे अर्थव्यवस्थेमध्ये मंदी आली होती. संपूर्ण जयगाला

डॉ.मनिषा कायंदे.......

आर्थिक मंदीचा फटका बसला होता. महाराष्ट्र शासनाने मॅग्नेटिक महाराष्ट्र-२ अंतर्गत ९८ गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केलेल्या असून या माध्यमातून १,९१,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ३,३०,००० रोजगार निर्मितीचा अंतर्भाव असलेल्या योजनांची सुरुवात होणार आहे. आपण सकाळी वर्तमानपत्रात वाचले की, मुंबईवर आणखी एक चक्रीवादळ येणार असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने विशेषत: माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी हिरिरीने सहभाग घेऊन माझी वसुंधरा अभियान-१ आणि त्यानंतर माझी वसुंधरा अभियान-२ अंतर्गत नद्यानाल्यांची साफसफाई, जैव-विविधता वाढविण्यासंदर्भात किंवा ती होती तशी पुनरुज्जीवित करण्यासाठी हरितक्षेत्र निर्माण केले. यामुळे वनक्षेत्र वाचविण्याचे काम केलेले आहे. जी वनक्षेत्रे धोक्यात होती ती पुन्हा वनक्षेत्रांमध्ये जोडून माझी वसुंधरा अभियान सुरु करण्यात आले आहे. मागील काळात ३३ हजार कोटी झाडे लावल्याचे सांगण्यात आले. परंतु त्या झाडांचे पुढे काय झाले हे आपल्याला माहिती नाही. त्यामध्ये देखील मोठा घोटाळा झाल्याचे समोर आले होते. अशा प्रकारच्या गाजावाजा करणाऱ्या योजना न राबविता किती झाडे लावली याचा नेमका हिशेब या निमित्ताने देण्यात आलेला आहे. यामध्ये परिणामी ३,७१,००० कार्बनडाय ऑक्साईड उत्सर्जन कमी करण्यासाठी हे अभियान राबविण्यात आलेले आहे. जेवढी झाडे लावली त्याचाच हिशेब दिला जात आहे. त्याच प्रमाणे लहान मुलांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरणीय अभ्यासक्रमाची सवय लागावी किंवा मुलांनी त्या दृष्टीने अभ्यास करावा यासाठी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत पर्यावरण अभ्यासक्रम विकसित करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.सोनावणे....

असुधारित प्रत

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे.....

महाराष्ट्र राज्य असे पहिले राज्य आहे की, त्यांनी वातावरणीय बदलाबाबतची चेतावनी दिलेली आहे. हवामान बदलातील प्रभाव कमी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली वातावरणीय बदल परिषद स्थापन करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र राज्य हे अग्रगण्य आहे.

सभापती महोदय, ग्लासगोमध्ये वातावरणात बदल करण्यासंदर्भातील परिषद झाली होती. यामध्ये प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्व आपल्या राज्याला मिळाले याचा देखील मला सार्थ अभिमान वाटत आहे.

सभापती महोदय, महिलांवर ॲसिड हल्ले होत आहेत. यामध्ये पीडित महिलांना आणि मुलींना मनोधैर्य योजनेंतर्गत १० लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे. तसेच अजाणिका अमृत महोत्सव २० ते २५ डिसेंबर या कालावधीत सुशासन सत्पाह राबविण्याची गरज आहे. यासंदर्भात शासनाकडून नीटपाणे कामे केली जात नाहीत म्हणून विरोधी पक्ष सातत्याने आमच्यावर टीका करीत आहे. अनेक प्रकारची विश्लेषणे लावली जात आहेत. मला त्याबाबतीत कोणताही उल्लेख करावयाचा नाही. सन २०१९-२०२० आणि सन २०२०-२०२१ या वर्षी महाविकास आघाडी शासनाचा देशात दुसरा क्रमांक लागलेला आहे हे मला या ठिकाणी अभिमानाने सांगावेसे वाटते. विरोधी पक्षांच्या राज्यामध्ये त्यांचा कोणताही क्रमांक लागलेला नाही.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थामधील ४८८ शाळांचा राज्यातील आदर्श शाळा म्हणून विकास करण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्व शाळांचा यामध्ये अंतर्भाव व्हावा म्हणून प्रयत्न केला जात आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील बीडीडी चाळींचा पुनर्विकास हा महत्वाचा प्रश्न आहे. यासंदर्भात शासनाने बीडीडी चाळीत वर्षानुवर्षे राहणाऱ्या लोकांसाठी ५०० स्क्वे.फु.ची सदनिका दिली जाणार आहे. हा अत्यंत महत्वाकांक्षी ऐतिहासिक प्रकल्प शासनाने राबविलेला आहे.

डॉ. मनिषा कायंदे.....

सभापती महोदय, राज्यातील अनेक गावांमध्ये महिलांना डोक्यावर हंडा घेऊन पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. जलजीवन मिशन योजनेंतर्गत ग्रामीण भागातील ९७ लाख ५८ हजार घरांसाठी नळ जोडणी कार्यक्रम राबविला जाणार आहे. हा महत्वाकांक्षी निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला आहे. नाशिक जिल्ह्यात प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून एक विषय सर्वांसमोर आला होता. महिला भगिनी दोन बांबूवर चालून डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणत असल्याचे दृष्य सर्वांनी पाहिलेले आहे. ही घटना लक्षात आल्यानंतर माननीय पर्यावरण मंत्री महोदयांनी आणि स्थानिक शिवसैनिकांनी मिळून एका आठवड्यात त्या ठिकाणी एक छोटासा पूल बांधून दाखविलेला आहे. अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यातील संबंधित गावांमधील महिला भगिनींचे कष्ट कमी केलेले आहेत. चौथे महिला धोरण आणले जाणार आहे. या अनुषंगाने महाविकास आघाडी सरकार महिला भगिनींसाठी काय करणार आहे ते समजून येणार आहे. यासंदर्भात बैठका झालेल्या आहेत. उद्या मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिवस आहे. १०५ पानांचा ड्राफ्ट आहे. त्यामध्ये महिला भगिनींसाठी कोणत्या योजना आणल्या जाणार आहेत, त्याचा गोषवारा त्यामध्ये अंतर्भूत केलेला आहे. महिलांसाठी जे धोरण आणले जाणार आहे, त्यामध्ये ट्रान्स जेंडरसाठी एक वेगळे धोरण आणावे अशी मी शासनाला आग्रहपूर्वक विनंती करीत आहे. १९११ च्या जनगणनेनुसार देशात ट्रान्स जेंडरची संख्या ४.८८ लाख एवढी होती. गेल्या १० वर्षाच्या काळात त्यामध्ये किती वाढ झाली याची संख्या आता उपलब्ध नाही. महिला आणि ट्रान्स जेंडर या दोन्ही घटकांचा त्यामध्ये स्वतंत्रपणे विचार व्हावा आणि त्यासाठी स्वतंत्र धोरण आणण्याची गरज आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात त्याची संख्या ४० हजार ८९१ इतकी होती. यामध्ये साक्षरतेचे प्रमाण ६७.५७ टक्के होते. सन २०१९ मध्ये केंद्र शासनाने ट्रान्स जेंडर प्रोटेक्शन ॲक्ट मंजुर केलेला आहे. हा कायदा मंजुर होण्यापूर्वी केरळ राज्याने सन २०१५ मध्ये ट्रान्स जेंडर प्रोटेक्शन ॲक्ट मंजुर केला होता. त्यानुसार त्यांनी धोरण आणले होते. केरळ राज्याच्या धर्तीवर तामिळनाडू राज्याने देखील सर्वप्रथम ट्रान्स जेंडर प्रोटेक्शन ॲक्टसाठी धोरण आणले होते. आपल्या शेजारील कर्नाटक सरकारने

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे.....

गेल्याच महिन्यात एक मोठा निर्णय घेतला जाणार असल्याचे समजले आहे. टिचींग सेक्टरमध्ये देखील ट्रान्स जेंडर कम्युनिसाठी १ टक्का जागा राखीव आहेत. त्यामुळे हे नवीन महिला धोरण येणार आहे. त्या समितीमध्ये आमची मते घेण्यात आली. त्या समितीच्या बैठकीमध्ये हा मुद्दा मी सर्वांच्या निदर्शनास आणून दिलेला आहे. सदरहू बैठकीत महिला धोरण घाईघाईत न आणता थोडा उशिर झाला तरी चालणार आहे. महिला आणि एल.जी.ब्यू.क्यू.टी. ही जी कम्युनिटी आहे. त्यासाठी स्वतंत्र धोरण आणावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत

**सभापती** : मी एक विषय माननीय विरोधी पक्षनेत श्री. प्रवीण दरेकराच्या निर्दशनास आणून दिला होता. मला आपल्या सर्वांचा अभिप्राय घ्यायचा आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे कमी करावीत अशी माझी विनंती आहे. आपण पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असतो, त्यामुळे पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात, अशी माझी सर्वांना विनंती आहे.

विधानसभेने ओबीसी आरक्षणासंदर्भात विधेयके मंजुर केलेली आहेत. ती मध्यांतरानंतर मंजुर केली जाणार आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, आपल्याच पक्षातील सन्माननीय सदस्य असे म्हणत आहे की, ते विधेयक आताच चर्चेला घेऊन मंजुर करावे. त्यानुसार आता विधेयक मंजुर केले जाणार आहे. त्यावर एकही सन्माननीय सदस्य बोलणार नाही असे काल ठरले आहे. तसेच सदरहू विधेयक एकमताने मंजुर केले जाणार आहे. काल माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेते यांच्या सहमतीने तसे ठरलेले आहे. आपल्याला विधेयकावर बोलण्याचा अधिकार आहे. आपल्याल हट्टच करायचा असेल तर मग मला नाईलाज आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, जे सर्वानुमते ठरलेले आहे, त्याबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. न बोलता विधेयक मंजुर करणे हे काही बरोबर नाही.

**सभापती** : काल माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेते यांच्या सहमतीने ठरलेले आहे.

आता माननीय श्री. छगन भुजबळ यांनी विधेयक क्रमांक-५ मांडावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

**पृ.शी.** : मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. V OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-५, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-५, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी सभागृहाला पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने सदरहू विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-५ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न एकमताने संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-५ एकमताने संमत झाले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. VI OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-६, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-६, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी सभागृहाला पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने सदरहू विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ६ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-६ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न एकमताने संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-६ एकमताने संमत झाले आहे.

---------

अप्रकाशित प्रत

**सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ५ व ६ बाबत**

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, राज्य सरकारने ओबीसी आरक्षणासंदर्भातील विधेयके दोन्ही सभागृहात आणून संमत केल्याबद्दल आमच्या मनात शंका नाही. ही दोन्ही विधेयके सभागृहांनी संमत केली असून त्यास आमचे समर्थन आहे. सदरहू दोन्ही विधेयके सभागृहाने एकमताने संमत केली आहेत.

सभापती महोदय, मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, यापूर्वी दिनांक १३/१२/२०१९ आणि दि.०४/०३/२०२१ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने जे आदेश दिले त्यावर मला विस्तृत बोलायचे नाही. त्या आदेशाबाबत सर्वांनाच कल्पना आहे. राज्य सरकार कुठे चुकले, काय काय झाले, काय हातातून गेले यावर ऊहापोह करुन काही उपयोग नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, ही विधेयके संमत करण्यामागील जो हेतू आहे त्यानुसार कार्यवाही झाली पाहिजे. माननीय सर्वोच्च न्यायालयात जे मुद्दे निर्माण होतील, राज्य निवडणूक आयोगात जे मुद्दे निर्माण होतील त्यावर सरकार आणि आपण सर्वांनी योग्य पद्धतीने मांडणी केली पाहिजे. राज्यातील ओबीसी समाजाला आरक्षण मिळण्यासाठी उच्चस्तरीय वकिलांची नेमणूक करायची असल्यास करावी किंवा अन्य काही करायचे असल्यास ते करावे. परंतु यामध्ये कोणताही किंतु-परंतु येता कामा नये. आम्ही या विषयाच्या बाबतीत सरकारच्या मागे आहोत. गेल्या दोन वर्षात जे झाले ते आता होता कामा नये, एवढीच आपण काळजी घ्यावयास पाहिजे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय,....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर आपल्याला या विधेयकावर चर्चाच करावयाची होती तर हे विधेयक चर्चेविना कशाला संमत केले ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण मला विधेयकावर बोलू देत नाही आणि अभिनंदन सुद्धा करु देत नाही.

असुधारित प्रत

**सभापती** : मी आपणास सांगू इच्छितो की, आपण अशाप्रकारे माझ्यावर आरोप करु शकत नाही. या विधेयकाच्या बाबतीत शुक्रवारी झालेल्या बैठकीत आपल्या सर्वांसमवेत चर्चा झाली होती. त्या बैठकीत जे ठरले त्यानुसार मी कामकाज करीत आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सरकारने ओबीसी समाजाच्या दृष्टीने अत्यंत चांगली विधेयके आणून संमत केल्याबद्दल मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत काही दोष-दुरुस्त्या असतील तर त्या बाबतचा विचार विधेयक आणण्यापूर्वी राज्य सरकारने केला असेल. आज सकाळी माननीय श्री.अजितदादा पवार आणि माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी बैठक बोलाविली होती. त्या बैठकीत या दोन्ही विधेयकांना दोन्ही सभागृहाच्या आम्ही विरोधी पक्ष नेत्यांनी सहमती दर्शविली होती. संपूर्ण सभागृह या विधेयकाच्या पाठीशी आहे. ही दोन्ही विधेयके एकमताने संमत केलेली आहेत. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु ही विधेयके माननीय सर्वोच्च न्यायालयात टिकली पाहिजेत अशा प्रकारची दक्षता सुद्धा युद्ध पातळीवर हाती घेतली पाहिजे आणि ती घ्यावी अशी माझी मागणी आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी मांडलेली दोन्ही विधेयके सभागृहाने एकमताने संमत केल्याबद्दल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अभिनंदन केले आहे. माझा स्वत:चा किंवा विरोधी बाजूच्या कोणाचाही या विधेयकांना विरोध नाही, उलट या विधेयकांना आमचे समर्थनच आहे. या निमित्ताने मला एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, या विधेयकान्वये निवडणूक आयोगाचे अधिकार शासनाने स्वत:कडे घेतले आहेत. परंतु अशा प्रकारे निवडणूक आयोगाचे अधिकार स्वत:कडे घेण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, आपण प्रत्येक वेळी अशा प्रकारचे मुद्दे उपस्थित करुन सभागृहाचे वातावरण बिघडवित असता. मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्य सरकारला असे अधिकार आहेत. जर आपल्याला हे पटत नसेल तर आपण सर्वोच्च न्यायालयात जाऊन त्यास आव्हान द्यावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, माझा व्यक्तिश: किंवा आमचा कोणाचाही या विधेयकांना विरोध नाही. परंतु आमच्या मनात ज्या शंका येत आहेत त्या बाबत मी बोलत आहे. कारण मागे सुद्धा अशाच प्रकारचा आदेश काढण्यात आला होता, परंतु तो सर्वोच्च न्यायालयात टिकला नाही. त्यामुळे आज जी विधेयके संमत केली आहेत ती टिकविण्यासाठी काय करणार आहात, हे समजणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच जे जज्जमेंट दिले आहे त्यात राज्य सरकारला फाडून टाकले आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्वांनाच वाटते की, ओबीसी समाजाला निवडणुकीमध्ये प्रतिनिधित्व मिळणे हा त्यांचा हक्क आणि अधिकार आहे. परंतु हे करीत असताना ते सर्व नियमांच्या चाकोरीमध्ये बसवायचे आहे.

नंतर श्री.कांबळे.

श्री. अजित पवार ....

याकरिता सकाळी एक महत्त्वाची बैठक झाली आणि त्यामध्ये ज्या काही सूचना होत्या, त्या सर्वांचा अंतर्भाव केला आहे. माझी एकच विनंती आहे की, आपण येथे काही जरी बोललो तर उद्या जर कोणाला हे होऊ नये असे वाटत असेल तर माहिती काढतात आणि न्यायालयात सादर करतात. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आता हे विधेयक मंजूर झाले आहे. त्यामुळे पुन्हा त्याबाबतची चर्चा करण्यापेक्षा ते कसे टिकेल, आपल्याला कशा अडचणी येणार नाहीत या सर्व गोष्टींची खबरदारी आपण घेऊ या.

**सभापती** : ते कसे टिकेल याबाबतच्या सुधारणा सांगाव्यात.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, वाटल्यास सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल तर त्यांनी लॉबीमध्ये यावे. मी, माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ आणि तुम्ही, आपण बसू आणि तुमच्या ज्या काही शंका-कुशंका असतील त्यांचे निरसन आम्ही करु.

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी ३.३० वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी २.५२ ते ३.३० वाजेपर्यंत मध्यंतर)

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा
**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु....

**सभापती** : विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांचे भाषण पूर्ण केले आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाषणाला सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाविकास आघाडी शासनाने राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात ज्या बाबी मांडल्या त्या नक्कीच अभिनंदनीय आहेत. त्या बाबी अतिशय वेगळया पध्दतीच्या आहेत म्हणून त्यावर मी बोलणार आहे. प्रत्येक वेळी अभिभाषणात सर्वसाधारणपणे वेगवेगळ्या विकासात्मक बाबी असतात, भविष्यात शासन काय करणार आहे त्याचा उल्लेख असतो. त्यातून सरकारच्या कारभाराचे दर्शन महाराष्ट्राला होत असते. या वेळच्या अभिभाषणाचे वैशिष्टय असे आहे की, एका मोठ्या संकटातून जग, देश व महाराष्ट्र गेला आहे. १८९३ मध्ये प्लेगच्या साथीने देशात मोठे थैमान घातले होते. त्यावेळी देशाची लोकसंख्या ३० कोटी होती. कोरोनाचे संकट आले त्यावेळी देशाची लोकसंख्या जवळपास १५० कोटीच्या आसपास आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटी असताना शासन याला तोंड देत आहे. या रोगाची लागण परदेशातून आलेल्या भारतीयांकडून झाली. त्याची सुरुवात केरळ राज्यात प्रथम व त्यानंतर मुंबईत झाली. केरळ व महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कोरोनाची लागण झाल्यानंतर ती सगळीकडे वाढत गेली व ती हळूहळू देशभर पसरत गेली. मुंबईत लोकसंख्येची घनता जास्त असल्यामुळे या रोगाचा प्रसार मोठ्या

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते....

प्रमाणात होत होता. कोरोना लाटेचा परिणाम मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात होत असताना महाराष्ट्राला लाभलेले मुख्यमंत्री आदरणीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी कुटुंबप्रमुख म्हणून या लाटेला समर्थपणे तोंड देत असताना सर्वांना बरोबर घेतले. विरोधी पक्षाला त्याबाबत मी धन्यवाद देतो. त्यावेळी विरोधी व सत्ताधारी असा कोणताही विषय नव्हता. सर्वच लोक चिंतेत होते. कोरोना आपल्या घरात कसा येणार नाही यापेक्षा इतरांना आपण मदत कशी करु या चिंतेत असलेले लोकप्रतिनिधी मी पाहिले आहेत. माझे काय होते यापेक्षा लोकांना कसे वाचविता येईल याकरिता समर्पित भावनेने काम करणारे नगरसेवक, आमदार व कार्यकर्ते पाहिले आहेत. या सर्वांच्या मागे ठामपणे उभे राहणारे माननीय मुख्यमंत्री यांचे नेतृत्व मी पाहिले आहे. संकटकाळी योध्दयाला पुढे नेण्याकरिता समर्थ सेनापती लागतो ते सेनापतीत्व आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी दिले. या अभिभाषणावर बोलत असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सांगितले की, अभिभाषणातील सर्वात जास्त पाने कोरोना संदर्भात आहेत. जगाला थक्क करणारे संकट आले व ते महाराष्ट्रात असताना त्याला समर्थपणे तोंड देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात सर्वांनी सहकार्य केले. काहींना कोविड योध्दे संबोधण्यात आले. त्यांनी समर्पित होऊन कामे केली व ही लाट परतवून लावली व अनेकांचे जीव वाचविले म्हणून त्याची नोंद अभिभाषणात घेण्यात आली. त्यामुळे ही पाने जास्त आहेत. शासकीय भाषेत असे नमूद केले आहे की, अमुक केले, तमुक केले, व्हेटिंलेटर किती दिले. अमुक किती दिले, तमुक किती दिले अशा प्रत्येक गोष्टीत उणीवा काढायच्या असतील तर आपण जाणीवा नष्ट करतो काय असा प्रश्न निर्माण होतो. आपणाला हे विषय मांडण्याकरिता पुरवणी मागण्या आहेत तसेच इतर वेळी हे विषय मांडू शकता. आज या माध्यमातून अभिभाषणाचे अभिनंदन करीत असताना विश्वासार्हता निर्माण करणारे भाष्य सर्वांच्या मुख्यातून यायला पाहिजे. त्या अभिनंदनाचा हा विषय आहे. दोन तासापूर्वी मला माहिती मिळाली की, जुलैपासून चौथी लाट येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. अशी लाट येऊ नये व आली तरी आपण समर्थपणे तोंड देऊ. त्याबाबत आता आपण अनुभवी आहोत. कोरोना काळातील अनेक बाबी यामध्ये अंतर्भूत करता आल्या

श्री.दिवाकर रावते.....

असत्या पंरतु त्या मांडता येत नसतील म्हणून नमूद केल्या नसतील. सन्माननीय मंत्री महोदय श्री. आदित्य ठाकरे हे महापालिकेच्या वॉररुमध्ये सतत हजर असत. ही बाब माननीय मंत्री श्री. अनिल परब यांना माहिती असेल. त्यांचा मुख्यमंत्री महोदयांशी सतत संपर्क होता. कोणत्या भागात किती रुग्ण आहेत, ग्रामीण भागात लाट पसरत असताना मुंबईत ये-जा करणारे लोक होते त्यामुळे जास्त परिणाम दिसून येत होता. रुग्णवाहिका रोज सकाळी जात असताना जे रस्त्याच्या कडेला राहतात त्यांचा आवाज त्यांना ऐकायला येत होता. आपणा सर्वांना दूर्ध्वनी येत होते की, साहेब ही व्यवस्था करा, हॉस्पीटलची व्यवस्था करा, रुग्णालयात पेशंटसाठी जागा नाही. रुग्णवाहिका नाही.व्हेटिलेटर नाही, पेशंटला बाहेर ठेवण्यात आले आहे. त्या वेळी कोणालाच काही कळत नव्हते की, कोविड म्हणजे नेमका काय आजार आहे. त्यावेळी अनेक लोकांना रुग्णालयात नेता आले नाही व ॲडमिट करता आले नाही. त्यावेळी मंत्री महोदय श्री. आदित्य ठाकरे यांनी मला असे सांगितले की, ७०० ते ८०० रुग्णवाहिका संपूर्ण महाराष्ट्रात तयार ठेवल्या आहेत. दूरध्वनी आल्यावर १० मिनिटात रुग्णवाहिका तेथे पोहचेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. ही सर्व माहिती सर्व पदाधिकारी आमदार व कार्यकत्यांना दिली होती. त्यांचे मोबाईल क्रमांक जाहीर करण्यात आले होते. या क्रमांकावर तातडीने संपर्क करावा. इतक्या तत्परतेने जाणीव ठेवणारे नेतृत्व महाराष्ट्राला लाभले आहे. त्यामुळे अभिभाषणात कोरोनाची किती पाने आहेत याचा विचार न करता महाराष्ट्रातील मुख्यमंत्री महोदयांनी काय कामे केली याबाबत विचार करावा. सभागृहात विरोधी पक्ष व सत्तारुढ पक्ष आहे. आपण एकमेकांवर टीका करीत असताना काय खोचले व काय टोचले यापेक्षा यात काय कमतरता राहिली ती भरुन काढण्यासाठी सूचना करणे महत्वाचे असते. मी विरोधी पक्ष नेत्यांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी कोविडबाबत जास्त नकारात्मक विषय मांडले नाहीत. मुख्यमंत्री महोदयांनी संपूर्ण महाराष्ट्रात सतत संपर्क ठेवला आहे. आपले कोणी तरी आले व आपल्याशी कोणी तरी बोलत आहे याबाबत त्यांना आधार वाटत होता. कोविड संदर्भात मुख्यमंत्री महोदय आज बोलणार आहेत असे जाहीर केल्यानंतर लोक आशेने वाट पाहत होते व त्यातून जनतेला आधार

श्री.दिवाकर रावते...

मिळत होता व कोविडची लाट परतवून लावण्यासाठी सामाजिक मानसिकता निर्माण करण्याचे काम झाले ते टाळता येणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला व लोकप्रतिनिधीला अभिमान वाटायला पाहिजे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते........

कोविड काळात महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारचे काम केलेले आहे. महाराष्ट्राने केलेल्या कामाची नोंद जागतिक पातळीवर घेतली गेली. मुंबई व्यवस्थित सांभाळली पाहिजे यासाठी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात रात्रंदिवस काम करीत होते आणि प्रशासनाने देखील त्यांना चांगल्या प्रकारे साथ दिली. त्यामुळे आपण प्रशासकीय अधिकाऱ्यांना मनापासून धन्यवाद देऊन त्यांचा गौरव केला पाहिजे. त्यावेळी प्रशासकीय अधिकारी अंगचोरपणा न करता मैदानात उतरले. मला आठवते की, कोविडची पहिली लाट संपल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी दूरध्वनीच्या माध्यमातून जाहीररीत्या कोविड योद्धांचे अभिनंदन केले. कोविड योद्धांना आधार देणे आवश्यक होते. कारण कोविड योद्धे टिकले तर लोक टिकतील अशी जी भावना निर्माण करण्यात आली ती महत्वाची आहे. मला एका गोष्टीचा नक्की अभिमान वाटतो. मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या कामाची जागतिक पातळीवर नोंद घेण्यात आली. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात या संदर्भात उल्लेख नसल्यामुळे मी हे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री.इकबाल सिंह चहल यांचा कोविड योद्धांचे प्रमुख म्हणून १५ वेळा सन्मान करण्यात आला. हा केवळ श्री.चहल यांचा एकट्याचा जागतिक सन्मान नाही तर तो मुख्यमंत्री महोदयांच्या नियोजन पद्धतीचा, कोविड योद्धांचा सन्मान आहे, हे नमूद करताना मला आनंद होत आहे. श्री.चहल यांना जागतिक, राष्ट्रीय व राज्य स्तरावर असे एकूण १५ सन्मान मिळाले. ते सन्मान खूप महत्वाचे आहेत. अशा प्रकारचा सन्मान देशात कोणत्याही आयुक्तांना, अधिकाऱ्यांना प्राप्त झालेला नाही, हे नमूद करताना मला अभिमान वाटत आहे. हा सन्मान केवळ श्री.चहल व कोविड योद्धे यांचा नाही तर त्यांचे नेतृत्व करणारे माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा आणि तुमचा, आमचा सर्वांचा आहे. कोविड काळात कोणत्याही राज्याने केलेल्या कामाची नोंद जागतिक पातळीवर घेतली गेली नाही. महाराष्ट्र राज्याने केलेल्या कामाची जागतिक पातळीवर नोंद घेण्यात आलेली आहे. आपण कोविड काळात खूप चांगले काम केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते........

सभापती महोदय, धारावीमध्ये मोठ्या प्रमाणावर कोरोना रुग्ण आढळत होते. आपल्याला धारावीची चिंता वाटत होती. मुख्यमंत्री महोदय स्वत: धारावीकडे लक्ष देत होते. मातोश्रीच्या बाजूला दोन मिनिटांवर धारावी आहे. मातोश्रीपासून धारावी जवळ आहे म्हणून नाही तर मुख्यमंत्री महोदयांचा धारावीशी जवळचा संबंध आहे. धारावीमध्ये मोठ्या प्रमाणावर कोरोना रुग्ण आढळत होते. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची बदली झाली. त्यानंतर त्यांच्या जागी श्री.चहल यांची नियुक्ती करण्यात आली. मी स्वत: श्री.चहल यांच्या बरोबर दूरध्वनीवरुन संपर्क साधत होतो. श्री.चहल कोविड कीट परिधान करुन धारावीमध्ये पाहणी करण्यासाठी गेले होते. ती सर्व दृष्ये इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून प्रसारीत झालेली आहेत. मी त्यांना सांगितले की, आपण कोविड कीट परिधान करुन पाहणी करु नये. आपल्याला लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावयाचा असेल तर मास्क व हँड ग्लोव्हज घालून पाहणी करावी. त्याप्रमाणे त्यांनी धारावीमध्ये जाऊन पाहणी केली. श्री.चहल व जी साऊथ विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्री.किरण दिघावकर यांनी धारावीमध्ये जाऊन पाहणी केली. त्यांनी कोविड काळात ज्या पद्धतीने परिस्थिती हाताळली ते आपण सर्वांनी ऐकले व वाचले आहे. धारावी पॅटर्न जगात चर्चीला गेला आणि जगातील अनेक छोट्या देशांनी धारावी पॅटर्न स्वीकारला. जागतिक साथीच्या रोगावर परिणामकारक उपचार करण्याचे सामर्थ्य असलेल्या महाराष्ट्रातील मुंबई शहरात धारावी पॅटर्न निर्माण करुन तो जगातील अनेक छोट्या देशांनी स्वीकारावा ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोविड विषयी किती पाने लिहिलेली आहेत याबाबत विचार करण्यापेक्षा साथीच्या रोगावर मात करण्यासाठी आपण जे काम केले ते अभिमानास्पद आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री.किरण दिघावकर यांच्या मी सतत संपर्कात होतो. कोविड काळात जे काम केले त्यावर त्यांनी पुस्तक छापलेले आहे. कोविडची साथ, समाजावर होणारे परिणाम, लोकांची

श्री.दिवाकर रावते........

मानसिकता, लहान मुलांपासून मोठ्यांनी घ्यावयाची काळजी हे सर्व या पुस्तकात नमूद केलेले आहे. मला धारावी पॅटर्न समजून घ्यावयाचा होता. त्यांनी पुस्तक छापून तो लेखी स्वरुपात सर्वांसाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. भविष्यात ज्यावेळी कोणी कोविडवर पीएचडी करील त्यावेळी हे पुस्तक आणि धारावी पॅटर्न उपयोगी ठरेल. मला खात्री आहे की, जगाच्या पाठीवर ज्यावेळी कोणी कोरोनावर पीएचडी करील त्यावेळी भारतातील महाराष्ट्रातील मुंबई शहरातील धारावी पॅटर्नचा उल्लेख केल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी प्रथम इंग्रजी भाषेत पुस्तक लिहिले. सदर पुस्तकाची ४ दिवसांपूर्वी मराठी आवृत्ती प्रसिद्ध झालेली आहे. मी त्यांना विनंती केली की, देशातील सर्व वाचनालयांमध्ये हे पुस्तक मिळाले पाहिजे. हे पुस्तक सर्व वाचनालयांमध्ये पाठविण्यात येणार आहे. कोविड काळात महाराष्ट्र राज्याने गौरवशाली काम केलेले आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात श्री.इकबाल सिंह चहल, श्री.सुरेश काकाणी, श्री.किरण दिघावकर यांनी धारावीमध्ये अतिशय चांगले काम केले. धारावीतील कोरोना रुग्णांची संख्या शुन्यावर आल्यानंतर आता कोरोना संपला असे लोकांना वाटत होते. मी हे मुद्दाम सांगत आहे. सन्माननीय सदस्यांनी कोविड संदर्भात उल्लेख केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, कोविड काळात १ लाख ४० हजार कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत देण्यात आली. शासनाने जवळपास ७०० कोटी रुपये मदत दिलेली आहे. आपण नुकसान झाल्याचे सांगितले. मी सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पावर ताण आला होता. राज्य शासनाकडे महसूल कमी जमा होत होता. कोविडसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागत होता. आपण इतरांकडून मदत घेतली त्याबाबत विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला. तो उल्लेख ९० टक्के, १० टक्के असा होता. कोविड काळात ज्या सोईसुविधा निर्माण करावयास पाहिजे होत्या त्या आपण निर्माण केलेल्या आहेत. कोविड काळात मुख्यमंत्री महोदयांनी खंबीरपणे नेतृत्व केले हे आपल्याला नाकारता येणार नाही आणि ते राज्यातील सर्व कुटुंबांनी स्वीकारले आहे. महाराष्ट्रात आमचा मुख्यमंत्री आहे, माझा मुख्यमंत्री आहे अशी भावना लोकांमध्ये निर्माण करणारे ते

अग्रिम प्रत

श्री.दिवाकर रावते........

पहिले मुख्यमंत्री आहेत, हे आपल्याला स्वीकारावे लागेल. आमचा कुटुंब प्रमुख आमच्या बरोबर बोलतो, आमची काळजी घेतो असा आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. त्यामुळे अर्धा रोग बरा होण्याची क्षमता निर्माण होते. त्यावेळी जीएसटी कराचे ३० हजार कोटी रुपये केंद्र शासनाकडून मिळाले असते तर अधिक मदत झाली असती. परंतु केंद्राकडून ती रक्कम मिळाली नाही म्हणून राज्याच्या अर्थसंकल्पावर ताण पडला. आपला मुद्दा अशा पद्धतीचा होता. हे सुरुच असते. कोरोनाच्या काळात राज्याच्या तिजोरीत पैशाची अडचण आहे किंवा इतर कोणतीही कारणे न देता संकटाला सामोरे जाण्याची क्षमता सरकारने दाखविली आणि गोरगरीबांसाठी सोईसुविधा निर्माण करुन दिल्या हे महत्वाचे आहे. राज्य शासनाकडे पैसे असो किंवा नसो याची चिंता न करता मी जनतेच्या जीविताची काळजी घेईन असे काम करणाऱ्या मुख्यमंत्री महोदयांना आज घराघरात सन्मान मिळत आहे, हे मी आवर्जून सांगू इच्छितो.

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते .....

हे सर्व करीत असताना इतर गोष्टी बंद होत्या का. कोविड काळात दोन वर्ष तुम्ही आम्ही कसे वागत होतो, एखाद्याला कोविड झाला तर संपूर्ण कुटूंबाला व्हायचा. ही परिस्थिती होती. मी माझ्या शिवसैनिकांना व आमदारांना पाहिले तेव्हा कोणी घरात राहात नव्हते. विरोधी पक्षाच्या सदस्यांनाही मी धन्यवाद देतो. लोकप्रतिनिधींनी यावेळी कोठेही पळ काढला नाही. याचे कारण मुख्यमंत्री महोदयांनी आपणास मानसिक सामर्थ्य दिले होते हे नाकारता येणार नाही. त्यावेळी कोणताही पक्ष न पाहता आपण मैदानात उतरत होतो. मुख्यमंत्री हा नेता आपणास समर्थन देतो हे आपणास नाकारता येणार नाही. केवळ कोविड नव्हता. अतिवृष्टी झाली, वादळे आली. या वयात एवढा मोठा आजार असतानासुध्दा आदरणीय शरद पवार साहेब स्वत: बाहेर पडायचे व सगळीकडे फिरायचे. मी बोलत होतो की, एवढया आजारपणात ते कशासाठी फिरतात. बाकीचे सर्व लांब रहायचे. झाडाला टेकून लांबून चर्चा करायचे हे आपण पाहिले आहे. महाराष्ट्रात कोणी माघार घेतली नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर व विधानसभा विरोधी पक्षनेतेही फिरत होते. त्या फिरण्यामागे चिंताही होती. पण आपण कोठे माघार घेतली नाही. कोविडची प्रचंड मोठी लाट महाराष्ट्रात आली असताना आपण मात करु शकलो ते अभिनंदनीय आहे. त्यावेळी सर्व शांत होते का. मी जास्त बोलत नाही.

सभापती महोदय, कोकणासाठी खास करुन ७३६० कोटीचे नुकसान झाले त्यावर सरकारने १५००० अधिक ५५०० असे २० हजार कोटी रुपये कोकणावर खास खर्च केले. ते मिळावेत याकरीता आपण धावत होतो. जाहीर झाले, पण देतात की नाही असे होते. विरोधी पक्षाची भूमिका सकारात्मक असते. ती टीकात्मक नसते, दिले गेले पाहिजे हे श्रेयाचा विषय नसतो. त्या काळात आपण लोकांना आधार दिला त्याच्या अभिनंदनाचा हा विषय आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय श्री.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात रस्त्याची कामे झाली होती, कामाची यादी पाहिली, याबाबतचे निर्णय पाहिले तर संपूर्ण देशात श्री.नितीन गडकरी हे त्यांच्या खात्याचे मंत्री म्हणून जसे प्रसिध्द आहेत तसे

श्री.दिवाकर रावते .....

महाराष्ट्राचे नितीन गडकरी हे श्री.एकनाथ शिंदे आहेत हे मला अभिमानाने साांगावे लागेल एवढी त्यांची कामे आहेत याबद्‌ल दुमत नाही व ते स्वीकारावे लागेल.

सभापती महोदय, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग हा ७७ टक्के पूर्ण झालेला आहे. नागपूर ते शिर्डीपर्यंत तो चालू होईल. त्यातून वाहतुकीची समृध्दी निर्माण होणार आहे त्याला फार मोल आहे. कारण मालवाहतुकीचे महत्व अधिक आहे, मालवाहतुक जेवढी जलद होते तेवढी त्या प्रदेशाची प्रगती होते. कोकणातील नवीन रस्त्याबाबत मी सांगू इच्छितो. रेवस ते सिंधुदुर्ग सागरी मार्गाबाबत हा विषय आहे. या मार्गासंदर्भात कॉंक्रीटीकरण इत्यादी काम हाती घेण्यात आले आहे. हा मार्ग झाला तर कोकणात वेगळया प्रकारची समृध्दी येईल. वर्षानुवर्षे या सभागृहात मी पाहिले आहे व अनुभवले आहे की, कोकण प्रत्येक बाबतीत उपेक्षीत असतो. कोकणाची दुर्दशा होते याला कारण वाहतुक हाच विषय आहे. कोकणातील वाहतुक सुधारली तर कोकणातील समृध्दी वाढेल. त्या दृष्टीने शासनाने उचललेल्या पावलाबद्दल मी शासनाचे मनापासून आभार मानतो व धन्यवाद देतो.

सभापती महोदय, डिजीटल स्वाक्षरीचा सात बारा उताऱ्याबाबत उल्लेख झाला आहे. आपण टीकात्मक बोलण्यापेक्षा सकारात्मक बोलावे. हे झाले तर शेतकऱ्याला कोणाकडे दात विचकायला लागणार नाहीत. माझे काम करतो का, एवढे करतो का, तुमचे काय असेल ते घ्या पण मला लगेच द्या. असे न होता त्याच्या मोबाईलवर त्याला सात बारा उतारा उपलब्ध होईल. हे काम झाले नसेल तर तातडीने केले गेले पाहिजे व याला गती दिली पाहिजे. असे या सभागृहाच्या माध्यमातून अभिनंदन करताना त्याबाबत उल्लेख केलेला आहे. विरोधी पक्षाने टीकाच केली पाहिजे असे नाही तर आग्रह धरला पाहिजे. कारण महाराष्ट्राची समृध्दी ही सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष दोघांची समान जबाबदारी आहे. सरकारने विरोधी पक्षाची टीका सकारात्मकतेनेच घेतली पाहिजे. मी मंत्री असताना विरोधी पक्षाने त्या विभागाकरीता सकारात्मक काही सांगितले आहे या भूमिकेतून मी बघत होतो. टीका म्हणून कधी

श्री.दिवाकर रावते .....

श्री.दिवाकर रावते .....

पाहिले नाही. श्रेय हा विषय नसतो, काही झाले तरी शेवटी सरकारला श्रेय मिळत असते. सरकारच्या समृध्दीचा गौरव होत असतो, तसे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार येथे उपस्थित नाहीत. त्यांनी मनापासून अभिनंदन केले होते. संभाजी महाराजांचे नाव घेऊन खूप लोक व ब्रिगेड आंदोलन करतात. पण संभाजी महाराजांसाठी कधी कोणी भांडले नाही किंवा बोलले नाही. संभाजी महाराज उपेक्षीत राहिले, तुम्हाला त्याची कल्पना आहे. म्हणून मी उपमुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन केले होते की, त्यांनी पुरवणी मागण्यांद्वारे ३०० कोटी रुपये आणले होते. संभाजी महाराजांच्या समाधीस्थळाचा पुनर्जीवन करण्याचा निर्णय घेतला होता, तो राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात यायला हवा होता. कारण हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, स्वाभीमान, आनंद व अभिमानाचा विषय आहे. मला खात्री आहे की, ते वाचत असताना प्रचंड टाळया पडल्या असत्या. संभाजी महाराजांच्या समाधी स्थळाचे पुनर्जीवन माझे सरकार करीत असल्याचे राज्यपालांनी वाचले असते तर आपणास अभिमान वाटला असता. पण ठाकरे सरकारच्या काळात हे होते याचा मला अभिमान आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांनी याबाबत पुढाकार घेतला, बैठका घेतला, एकत्र काम केले याचा मला मनापासून आनंद वाटतो. माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात हे देखील यासोबत गतीने पुढे आहेत, त्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, हा कोणी टीकेचा विषय म्हणून घेऊ नये. पण सैन्याला कधी जात असते का. सैन्याला राष्ट्र असते व देशाचा प्रमुख त्यांचा प्रमुख असतो, सेनापती असतो. सैन्य राष्ट्राकरीता लढते, ज्याचे आहे त्याकरीता लढते. १ जानेवारी रोजीचा महाराष्ट्राचा शौर्य दिनाचा यामध्ये उल्लेख आलेला आहे. शौर्यदिन कसा ते मला कळाले नाही. तानाजी मालुसरे यांनी ज्या दिवशी सिंहगडावर त्यांची आहुती दिली तो शौर्यदिन असू शकतो. लाख मरो पण लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे ही इर्षा घेऊन बाजीप्रभू देशपांडे लढले. छत्रपती शिवाजी महाराज सांगत असताना आपण

श्री.दिवाकर रावते .....

श्री.दिवाकर रावते .....

मुलांना तानाजी व बाजीप्रभूच सांगतो. तो आपला शौर्यदिन असू शकतो. देशाच्या सिमेवर लढणाऱ्या सैनिकांचा १५ ऑगस्ट हा शौर्यदिन असतो.

सभापती महोदय, संभाजी महाराजांबद्दल सर्वांना वाटणारा अभिमान अजिबात चुकीचा आहे असे माझे मत नाही. याचे कारण सांगतो. माझ्या वाचनात ती पुस्तके आहेत. त्या काळात त्या समाजाला वागवले जात होते, अपमानास्पद जगावे लागत होते, त्या काळात सैन्यात भरती झाल्याने गावात सन्मान मिळत होता, त्यामुळे सैन्यभरती होत होती. इंग्रजांच्या काळात त्या भरतीचा सन्मान मोठा होता, त्यांनी त्यावेळी निर्माण केलेली महार रेजिमेंट आजही सैन्यामध्ये आहे. त्या रेजिमेंटमध्ये जाण्याकरीता प्रत्येक सैनिक उत्सुक असतो. ते शौर्याचे प्रतिक आहे. त्यामुळे त्यांना वाटत असलेला अभिमान चुकीचा असल्याचे माझे अजिबात मत नाही.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते.....

त्या काळामधील परिस्थितीप्रमाणे ते होते. ब्रिटिशांनी निर्माण केलेला तो स्तंभ आहे. त्याचा शौर्यदिन आपण कसा काय..(अडथळा).... करु शकतो ? मी त्यांचा सन्मान केला, हेच तर तुमच चुकतय...., मी त्यांचा सन्मानच केलेला आहे, ते का असे वागतात, हेही मी सांगितलेले आहे. धर्म बदलून परत धर्मात येणाऱ्यांपेक्षा हे बरे आहे ना, माझा विषय तो नाही. अहो, ते शौर्य किती मोठे होते ? त्या सैन्यातील २६५ इंग्रज सैनिक मारले गेलेले आहेत, ते त्या समाजाचे असतील ते त्यावेळी मारले गेले होते. या बाजून स्वराज्याच्या वतीने लढणारे सहाशे लोक मारले गेले. शौर्य किती मोठे असेल ? परंतु आक्रमण कोणावर होते ? लढाई कोणती होती ? छत्रपतींच्या स्वराज्यावरील लढाई होती. त्यावेळी महाराष्ट्र राज्याचा त्यामध्ये त्यावेळी संबंध नव्हता. छत्रपतींनी महाराष्ट्र राज्य निर्माण केले होते. त्यावेळी त्याची माझी आता काही तक्रार नाही. ते सर्व बरोबर आहे. त्याकरिता १०० कोटी रुपयांचा निधी निर्माण केलेला आहे, त्याचे मी संबंधित मंत्रीमहोदयांकडे स्वागत केलेले आहे. केवढा प्रचंड मावळा समाज तेथे जातो, तेथे व्यवस्था असली पाहिजे. मी स्वत: त्याचे स्वागत केलेले आहे. आज यामध्ये जे आलेले आहे. याबाबत माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्राचा शौर्यदिन तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांचा असू शकतो. तेव्हा त्यांचा सन्मान आपण करणार आहोत, तो केला पाहिजे, तो सन्मान करीत आहोत, त्याबाबत तक्रारच नाही. त्याकरिता सर्व व्यवस्था करण्याकरिता १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. तो सन्मान करावाच !

सभापती महोदय, या अशा ज्या गोष्टी असतात, त्या कुठेतरी असुधारित राहता कामा नये. हा टिकेचा विषय नाही. हल्ली छत्रपती ज्यांना जसे कळले, तसे ते सांगितले जातात. ज्यांना जसे कळले, ते छत्रपती खरेतर बारा-बलुतेदारांचे नेते होते. छत्रपती हे कोणत्या एका समाजाचे नेते नव्हते. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्य मिळविलेले आहे.

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, या अभिभाषणावरील प्रस्तावावर विचार मांडत असताना मनापासून शासनाच्या पुढील गतीकरिता कटिबध्द राहू, या सभागृहातून सकारात्मकतेने पुढे जाण्याकरिता साथ देऊ, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------------

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल जे भाषण करतात,ते म्हणजे शासनाच्या वतीने पुढील वर्षभराची वाटचाल दाखविणारा आरसा असतो. शासनाच्या वतीने बोलत असताना शासनाचेच काही लोक त्यावर टिका-टीप्पणी करतात, हा भाग वेगळा आहे. त्याबद्दल बोलून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु नवीन प्रथा देखील सुरु होत आहेत, हरकत नाही....

सभापती महोदय, मुळात हे सर्व जे माननीय राज्यपाल महोदयांचे जे भाषण आहे, त्यामध्ये एकूण ७२ मुद्दे काढण्यात आलेले आहेत. यामधील ३० मुद्दे केवळ आणि केवळ कोविडकरिता समर्पित केलेले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील हे संपूर्ण अभिभाषण जर पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, हे संपूर्णपणे कोविडला समर्पित केलेले आहे. याचा दुसरा अर्थ असा होतो की, कोविडव्यतिरिक्त आपल्याकडे सांगण्यासारखे काहीही नाही. ज्या काही उर्वरित बाबी आपण सटर-फटर माननीय राज्यपाल महोदयांच्या तोंडून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे, ते भाषण वाचणे त्यांनाही नकोसे वाटले असेल, म्हणूनच त्यांनी ते भाषण पूर्णपणे वाचलेले नाही. कोविडला समर्पित करत असताना देखील या भाषणात एवढे ३० मुद्दे केवळ कोविडकरिता घेत असताना यात जेवढया काही कोविडकरिता केलेल्या उपाययोजना आहेत, खरेदी, अन्य गोष्टींची काळजी घेतलेली आहे, याबाबत जो शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, त्याच्याबाबत जर काही थोडाफार उल्लेख केला असता, तर महाराष्ट्राच्या ज्ञानात भर पडली असती. याच्याबाबत एवढे काही लिहिले गेले, बोलले गेले, चर्चा देखील झालेली आहे. एवढी चर्चा व मंथन होत असताना त्याचा अभिभाषणामध्ये उल्लेखही नाही, यापेक्षा दुर्दैव ते कोणते ? सरकार किती निगरगट्ट झालेले आहे, सरकारला कशाशी काही देणे-घेणे नाही, अशा पध्दतीची वागणूक आणि भावना सरकारची चालू आहे. एवढे करुन देखील आपण मात्र छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहु महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महनीय,वंदनीय, आदरणीय नेत्यांची नावे

घेऊन हे केले जात आहे. त्यांचे जे उच्च विचार आहेत, त्यांचे अनुकरण करुन आपला राज्यकारभार चांगला, भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक, व्यवस्थितपणे करण्याच्या ऐवजी आपण काय करताय तर भ्रष्टाचाराने पूर्णपणे बरबटलेले हे सरकार देत आहात. पूर्णपणे या महनीय थोर व्यक्तींच्या विचारांना साथ देऊन, त्यांच्या विचारांप्रमाणे कारभार करण्याऐवजी त्या विचारांना मुठमाती देऊन महाराष्ट्राच्याच लेकरांना, जनतेला मात्र हे सरकार वाऱ्यावर सोडत आहे. याबाबत मात्र या भाषणामध्ये एवढया पुस्तकामध्ये एक देखील शब्द नाही. याबाबत हे दुर्दैवच आहे, असे म्हणावे लागेल. कोविडबाबत एवढे मुद्दे लिहिलेले असताना कोविडमध्ये सर्वसामान्यांचे किती हाल झाले, त्याबाबत देखील सरकारने उल्लेख केलेला नाही. या सरकारने कोविड काळात सगळया लोकांना, सर्व जनतेला मरणाच्या दारावर सोडले होते. याकरिता त्यावेळी सरकारने जर चांगल्या उपाययोजना केल्या असत्या तर अनेक लोक मरणापासून वाचले असते, असा माझा दावा आहे.

सभापती महोदय, सन २०२० मध्ये जो काळ होता, त्यावेळचा काळ आठवा, त्यावेळी पहिली लाट आली होती. त्यावेळी या मुंबई व इतर मोठमोठया शहरांमधून सर्व लोक, कुटुंबेच्या कुटुंबे संसार पाठीवर घेऊन लहान मुले डोक्यावर, काखेवर घेऊन वडिलधारी मंडळींना देखील पाठीवर घेऊन हे प्रवास करीत होते. नाशिक येथे जाताना किंवा अन्य ठिकाणी जाताना त्यांचे काय हाल होत होते, ते आम्ही स्वत: डोळयांनी पाहिलेले होते. त्या सर्व लोकांकरिता साधी पाण्याची सोयही या सरकारने केली नव्हती.

**सभापती :** सन्माननीय सदस्य आपले भाषण सुरु होऊन दहा मिनिटे झालेली आहेत. मी घडयाळ पाहत आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आता तर माझ्या भाषणाला सुरुवात झालेली आहे. सभापती महोदय आमच्यावर अन्याय करणार नाही, अशी अपेक्षा आहे.

श्री.विनायक मेटे.....

सभापती महोदय, रस्त्याच्या कडेला साधी पाण्याची व्यवस्था देखील सरकारने केलेली नाही. पाणी-पाणी करीत काही लोक गेलेले आहेत. त्यांना पाणी नाही, सावली नाही, जेवण नाही, जाण्या-येण्याची सोयही नव्हती. असा सगळा तो काळ सर्व लोकांनी पाहिलेला आहे. हजारो लोक तांडेच्या –तांडे पायी उन्हातान्हातून चालत होते. ते चित्र पाहिल्यानंतद अक्षरश: रडू येत होते. ते कधी आणि कोणी सोडले यापेक्षा त्यांना केंद्र शासनाने मदत केलेली आहे, तेही महत्त्वाचे आहे. ...(अडथळा) सरकारला यावर काय बोलायचे आहे, ते उत्तरामध्ये बोलावे. ...(अडथळा)....आपल्याला काय यातून खोडायचे आहे ते तुमच्या उत्तराच्या वेळी खोडावे.

श्री.शशिकांत शिंदे ( खाली बसून ) : सभापती महोदय...

सभापती महोदय, मला संरक्षण देण्यात यावे. माझ्या भाषणामध्ये जाणीवपूर्वक व्यत्यय आणला जात आहे.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अमरनाथ राजुरकर)**

श्री. विनायक मेटे.....

माननीय सभापती महोदयांनी मला संरक्षण द्यावे. सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य माझ्या भाषणात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांना माननीय सभापती महोदयांनी तंबी देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, हजारो लोक उन्हाताणात जात होती. आपल्या सरकारने त्या लोकांना आसरा दिलेला नाही. त्याचा माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणात त्यांचा उल्लेख केला असता तर खूप काही चांगले झाले असते. पण त्यांचे दु:ख कळायला, वेदना समजायला आपल्याकडे मन नाही. महाविकास आघाडी सरकारमधील सन्माननीय सदस्यांची मने भ्रष्टाचाराच्या अवतीभवती फिरत आहे. अशा सर्व लोकांना आपल्या शासनाने वाऱ्यावर सोडलेले आहे. काही लोकांचा अपघातामध्ये मृत्यू झालेला आहे. काही लोकांनी औरंगाबादला आसरा घेतलेला आहे. आपण सदनात एकमेकांना विरोध करीत असतो. पण जी लोक विनाकारण अपघातात मृत्युमूखी पडलेली आहेत, त्याला कोण जबाबदार आहे असा माझा प्रश्न आहे. आपण पक्षीय दृष्टीकोनातून भाषणे करीत असतो. हजारो लोक मृत्युमूखी पडलेली आहेत, त्याला कोण जबाबदार आहेत असा माझा प्रश्न आहे. सरकार त्यांची जबाबदारी घेणार आहे नाही असा माझा प्रश्न आहे. सरकार त्या लोकांची जबाबदारी घेणार नाही. कारण महाविकास आघाडीचे सरकार हे गेंड्याच्या कातडीचे आहे. महाविकास आघाडीचे सरकार केवळ जबाबदारी ढकलण्याची कामे करीत आहेत. मोठमोठ्या घोषणा दिल्या जातात. राज्यातील सर्व कुटुंबांना महाविकास आघाडी सरकारने वाऱ्यावर सोडलेले आहे. माझे कुटुंब आणि माझी जबाबदारी असे म्हणत

असुधारित प्रत

महाविकास आघाडी सरकारने त्यांना वाऱ्यावर सोडलेले आहे. माझे कुटुंब आणि माझी जबाबदारी असे म्हणत घरच्या कुटुंबातील मुलांची, मुलींची आणि

श्री. विनायक मेटे.....

नातेवाईकांची काळजी घेतलेली आहे. महाराष्ट्रातील कुटुंबांची महाविकास आघाडी सरकारने राखरांगोळी केलेली आहे. याबद्दल शासनाला काहीच वाटले नाही. मी कोविडवर आता कुठे बोलण्यासाठी सुरुवात केलेली आहे. यामध्ये आपल्या सर्वांना वाईट अनुभव आलेले आहेत. कुटुंबातील व्यक्ती कोरोनावर उपचार करण्यासाठी दवाखान्यात गेल्यावर साधा बेडसुध्दा मिळत नव्हता एवढी भीषण वाईट परिस्थिती होती. कोकणातील लोकांनी पुण्यात किंवा गोव्याला जाऊन उपचार केले आहेत. मराठवाड्यातील लोकांनी औरंगाबाद, मुंबई किवा हैद्राबादला जाऊन उपचार केले आहेत. खाजगी हॉस्पिटल ४ ते ५ लाख रुपये घेतल्याशिवाय पेशंटला ॲडिमिट करुन घेत नव्हती. अनेक लोकांनी खाजगी हॉस्पिटमधील वैद्यकीय देयके पाहून गळफास घेतलेला आहे. बीड जिल्ह्यात खाजगी हॉस्पिटलमधील वैद्यकीय देयके पाहिल्यानंतर दोन लोकांनी गळफास लाऊन आत्महत्या केलेली आहे. यासाठी कोण जबाबदार आहे ? मुंबईतील वैद्यकीय देयकासाठी जे नियम लावता तेच नियम खेड्यापाड्यातील हॉस्पिटलसाठी लावली पाहिजेत. मुंबईत ५ हजार रुपयांचा दर असेल तर खेड्यापाड्यात देखील ५ हजार रुपयांचाच दर लावला पाहिजे. अशा लोकांना महाविकास आघाडी सरकारने आत्महत्या करण्यास प्रवृत्त केलेले आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या माध्यमातून आपली पाठ थोपटून घेत आहात. याची काही तरी जनाची नाही तर मनाची लाज वाटली पाहिजे. याचे शाप आपल्याला मिळणार आहे. हे साधे नाही. रुग्णालयात उपचार करण्यासाठी खाटा मिळत नव्हत्या. डॉक्टर कोणते उपचार करीत होते हे पेशंटच्या नातेवाईकांना सांगत नव्हते. एक रेमडेसिवर इंजेक्शन दहा ते पंधरा लोकांना दिली जात होती. इंजेक्शन दिल्याचे सांगितले जात होते. पण प्रत्यक्षात पेशंटला इंजेक्शन दिले आहे किंवा नाही, हे कोणालाही कळत नव्हते. कोविडच्या काळात डॉक्टरांनी भरमसाठ पैसे कमाविले आहेत. ज्यावेळी

ओरड झाली त्यावेळी त्याची चौकशी करण्यासाठी एका कारकुनची नियुक्ती करण्यात आली. कारकुनला पगार किती, हॉस्पिटलचे वैद्यकीय देयक किती ? याचा कधी तरी

श्री. विनायक मेटे.....

विचार केलेला आहे काय ? कोविडच्या काळात अनेकांनी हात धुऊन घेतलेले आहेत. मरणाच्या दारात असलेल्या माणसालासुध्दा लवकर मारण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केलेले आहे. लसीकरणाच्यासंदर्भात महाविकास आघाडी सरकारने स्वत:चे कौतूक केलेले आहे. ही केंद्राने दिलेली लस आहे. याचा अर्थ केंद्र शासनाने राज्यावर उपकार केलेत असे मी म्हणणार नाही. व्हेंटिलेटर आणि रेशन देण्यासाठी केंद्र शासनाने मदत केलेली आहे. आपण केंद्र शासनाप्रती एकही कौतुकाचे वाक्य माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात केलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचे मत, विचार चांगले आहे. पण ते सरकारला रुचत नाही. जे सकारात्मक विचार आहेत ते महाविकास आघाडी सरकारला आवडत नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचे विचार महाविकास आघाडी सरकार स्वीकारत नाही. माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय श्री. एकनाथ शिंदे साहेबांचे कौतुक केलेले आहे. याच धर्तीवर केंद्र शासनाचे तरी कौतुक करण्याची आवश्यकता होती. पण तेवढा मनाचा उदारपणा आपल्यामध्ये नाही. आपले संकुचित विचार आहेत.

सभापती महोदय, ओबीसी आरक्षणाच्या संदर्भातील विधेयक एकमताने सदनात थोड्याच वेळापूर्वी मंजुर करण्यात आलेले आहे. याबद्दल मी फारसे बोलणार नाही. पण त्याची काळजी १०० टक्के घेतली पाहिजे. यापूर्वी ओबीसीच्या विधेयकामध्ये फसविण्याचे काम केलेले आहे. असे फसविण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून होता कामा नये याबाबतची काळजी घेण्यात यावी. ओबीसी समाजाला कोविडच्या काळात महाविकास आघाडी सरकारने मदत केलेली नाही. महाविकास आघाडी सरकार निषक्रिय झाले असे म्हटले तर ते चुकीचे होणार

नाही. ओबीसी समाजातील लोकांना महाविकास आघाडी सरकारने वाऱ्यावर सोडले आहे. त्यांचे राजकीय आरक्षण महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे घालवावे लागले आहे.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी बोलत आहे. जे विधेयक एकमताने मंजुर झालेले आहे त्यावर पुनश्च हरकत घेऊन विचार व्यक्त करणे संयुक्तिक होणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी वक्तव्ये केलेली आहेत ती रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावीत, अशी माझी सूचना आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी सदरहू विधेयकासंदर्भात माझी शंका उपस्थित केलेली आहे. ओबीसी समाजाला मिळालेले राजकीय आरक्षण हे महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे रद्द झालेले आहे. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने सन २०१८ मध्ये मराठा समाजाला आरक्षण दिले होते. हे महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे रद्द झालेले आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.....

परंतु तुम्ही चांगल्या पद्धतीने बाजू मांडू शकला नाहीत म्हणून ते आरक्षण रद्द झाले.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझी हरकत आहे. या सभागृहामध्ये जे शब्द वापरण्यात आले आहेत ते चुकीचे आहेत. सन्माननीय सदस्यांनी *** असा जो शब्दप्रयोग केला आहे तो रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जर चुकीचा शब्दप्रयोग किंवा असंसदीय शब्दप्रयोग केला असेल तर तो रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चांगल्या पद्धतीने मुद्दे मांडत असताना सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे सातत्याने त्यांच्या भाषणात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**सभापती** : ठीक आहे. जर सन्माननीय सदस्यांनी असंसदीय शब्दप्रयोग केला असेल तर तो रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, *** हा असंसदीय शब्द नाही. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना या शब्दाचा एवढा का राग येतो हे माहीत नाही. *** एवढाच त्याचा अर्थ आहे. परंतु सभापती महोदय, आपण या बाबतचा निर्णय घ्यावा.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, विशिष्ट समाजाच्या विषयी सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे करीत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर संसदेमध्ये विधेयकाच्या माध्यमातून राज्याला अधिकार देण्यासंदर्भातील निर्णय झाला. याचा अर्थ पूर्वी या दोन्ही

---

*** आदेशानुसार विलोपित.

श्री.अशोक चव्हाण....

सभागृहांना अधिकार नसताना पूर्वीच्या सरकारने घेतलेला तो निर्णय होता. एकंदरीत मागच्या सरकारने सभागृहाची दिशाभूल करुन केलेला तो कार्यक्रम होता. रेकॉर्डवर चुकीचे जाऊन सभागृहाची दिशाभूल होऊ नये एवढीच माझी अपेक्षा आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, सभागृहाला अधिकार नाही, ॲटर्नी जनरल म्हणतात की, शासनाला या बाबतचा अधिकार नव्हता. यामुळेच केंद्र सरकारला, राज्य सरकारला अधिकार देण्याबाबतचा निर्णय घ्यावा लागला. संसदेमध्ये विधेयक संमत झाल्यानंतर राज्याला तशा प्रकारचा अधिकार मिळाला. परंतु विरोधी बाजूचे सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, आताच्या सरकारने या विषयी योग्य कार्यवाही केली. मी या बाबत विधानसभेमध्ये खुलासा केला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी माझे भाषण संपविणार होतो. परंतु सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांची मी भाषण संपवावे अशी इच्छा दिसत नाही. त्यांना वाटते की, मी अजून बोलले पाहिजे.

सभापती महोदय, मी एवढेच सांगत होतो की, माननीय राज्यपालांनी राज्य सरकारच्या वतीने राज्याला उद्देशून भाषण केले. कोविड परिस्थितीमुळे कोणीच सुखी नाही. परंतु त्या बाबतचा उल्लेख अभिभाषणात करण्यात आला नाही. तसेच राज्यातील कोणताही समाज राज्य सरकारच्या कामगिरीवर खूश नाही. उलट मागच्या सरकारने जे जे दिले ते सर्व काढून घ्यायचे काम आताच्या सरकारच्या नाकर्तेपणामुळे झाले आहे आणि तो समाज पूर्णत: वाऱ्यावर सोडला आहे.

सभापती महोदय, मी ओबीसीच्या राजकीय आरक्षणाबद्दल बोललो, तशाचप्रकारे मराठा समाजाच्या आरक्षणाबद्दल सुद्धा बोललो. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण जे बोलले, ते कसे योग्य नाही हे मी सप्रमाण सिद्ध करु शकतो. परंतु आता मला वेळ नाही. जर आपण माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या काळातील काढत असाल तर आपण त्यावेळी गप्प का बसला होता ? आज ज्याप्रकारे ओबीसी समाजाला आरक्षण

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे....

देण्याची विधेयके एकमताने संमत केली तशाच प्रकारे त्यावेळी सुद्धा एकमताने विधेयक संमत केले होते. जर तुम्हाला त्यात चूक वाटत होती तर आपण त्यावेळी का गप्प बसला ? शिवसेना पक्षाच्या नेतृत्वाखाली आताचे सरकार आहे, त्या पक्षातील अर्धे मंत्री मागच्या सरकारमध्ये होते. ते त्यावेळी का गप्प होते, ते काय करीत होते ? पूर्वी चुकीचे केले जात होते तर ते चालत होते काय आणि आता असे काय झाले ? माझे एवढेच म्हणणे आहे की, आपण महाराष्ट्रात चुकीचा संदेश देता कामा नये.

सभापती महोदय, धनगर समाजाच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नाही, मागासवर्गीयांच्या बाबतीत उल्लेख नाही. या बद्दल आम्हाला खेद व्यक्त करु द्यावा. आताचे सरकार कसे निष्क्रीय आहे साधा उल्लेख देखील अभिभाषणात नाही. या संदर्भातील उल्लेख उत्तरामध्ये करावा, एवढ्यासाठीच मी आठवण करुन देत आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा अभिभाषणात उल्लेख नाही. हे सरकार ऊठसूठ शिवाजी महाराजांचे नाव घेते, परंतु त्यांच्या बाबतीत काहीच उल्लेख करीत नाही. माननीय मुख्यमंत्री गेल्या अडीच वर्षांच्या काळात स्मारकाच्या बाबतीत केवळ १० मिनिटांची बैठक घेतात. त्यांच्या इतर गोष्टींबाबत मी काही बोलणार नाही. सध्या ते ऑनलाईन मिटींग घेतात, माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्या माध्यमातून ऑनलाईन मिटींग घेतात. तशाच प्रकारची बैठक आयोजित करण्यात त्यांना काय अडचण आहे ? आता सुद्धा ते बैठक घेऊ शकतात. अडीच वर्षात तुम्हाला शिवाजी महाराजांसाठी अडीच मिनिटे वेळ मिळत नाही. तुम्हाला शिवाजी महाराजांच्या नावाने मते चालतात, सरकार चालते, सर्व काही चालते. एवढेच नव्हे तर तुम्ही पैसे सुद्धा महाराजांच्या नावाने खाता, यापेक्षा काय वाईट असावे ?

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, हे सरकार शिवाजी महाराजांचे नाव घेत असताना त्यांची जयंती सुद्धा साजरी करु देत नाही. आपणास महाराजांबद्दल एवढा तिटकारा कशासाठी आला आहे ? एवढेच नव्हे तर शिवाजी महाराजांची जयंती शासनाच्या वतीने एका तारखेला साजरी करायची आणि पक्षाकडून दुसऱ्या तारखेला साजरी करायची हे कितपत योग्य आहे, ही कोणती पद्धत आहे ? मुख्यमंत्री म्हणून, मंत्री म्हणून आपण शिवनेरी किल्ल्यावर जाऊन फुले वाहता आणि पक्ष म्हणून वेगळी भूमिका घेता......

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे विनाकारण सभागृहाचे वातावरण वेगळ्या दिशेला घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करीत असताना मुद्देनिहाय बोलण्यास सांगावे किंवा त्यांना आता खाली बसण्यास सांगावे. जर ते आमच्या बाबतीत आक्षेपार्ह वक्तव्ये करीत असतील तर त्याची उत्तरे सुद्धा आम्हाला द्यावी लागतील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्यानुसार या चर्चेच्या उत्तराच्या भाषणात मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्या बाबतीत खुलासा करण्यात यावा. या महाराष्ट्राला हे कळू द्यावे की, मुख्यमंत्री म्हणून शिवजयंती साजरी करण्याची खरी तारीख १९ फेब्रुवारी आहे की पक्ष म्हणून तिथीनुसार जी साजरी केली जाते ती खरी तारीख आहे. आपण कृपया दुटप्पी भूमिका घेऊ नये एवढेच या निमित्ताने सांगतो व येथेच थांबतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी छत्रपतींच्या संदर्भात आणि शासनाच्या संदर्भात जे वक्तव्य केले ते वेदनादायक एवढ्यासाठीच आहे की, त्यांनी माननीय राज्यपालांचे अभिभाषण वाचल्याचे दिसत नाही. या अभिभाषणाची सुरुवातच छत्रपतींच्या नावाने आहे. अभिभाषणाच्या सुरुवातीलाच "छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी छत्रपती

श्री.दिवाकर रावते....

शाहू महाराज ....." यांच्या नावांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यानंतरचा मुद्दा जर सन्माननीय सदस्यांनी वाचला असता तर ते अशा प्रकारे बोलले नसते. त्या मुद्यात नमूद आहे की, "माझ्या शासनाचा, महाराष्ट्राच्या सीमावर्ती क्षेत्रातील मराठी भाषिक जनतेच्या हक्कांसाठी उभे राहण्याचा निर्धार आहे. १६ डिसेंबर, २०२१ रोजी बेंगळुरुमध्ये झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या विटंबनेचा आणि बेळगावमधील मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अध्यक्षांवर शाई फेकल्याच्या कृत्याचा माझे शासन तीव्र निषेध करीत आहे...." या सरकारने अभिभाषणात ही नोंद घेतली आहे. आपल्याला सुद्धा माहीत आहे की, त्या ठिकाणी काय झाले होते. मी एवढेच सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची सुरुवातच अशी आहे.

----------

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करीत असताना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी अनेक मुद्यांमध्ये हात घातला आहे. नागपूर करारामध्ये महाराष्ट्राच्या निर्मितीपासून उपराजधानी नागपूरमध्ये विधिमंडळाचे एक अधिवेशन घ्यावे, असे नमूद आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

आतापर्यंतच्या इतिहासात कधीही घडल्या नाहीत अशा घटना या सरकारच्या काळात घडत आहेत. मागच्या २ वर्षांत नागपूरला अधिवेशन न घेणे, विदर्भाच्या, मराठवाड्याच्या जनतेला न्याय न देणे, नागपूर कराराचे उल्लंघन करणे, ठरल्याप्रमाणे न वागणे असे घडले आहे. कारणे अशी सांगत आहेत की, नागपूरमध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाकरिता जागा उपलब्ध नाही. सुरेश भट सभागृहासारखे सभागृह आहे, त्यामध्ये अडीच हजार व्हीव्हीआयपी बसू शकतात एवढी क्षमता आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण तेथे होऊ शकले असते. सांगण्यात आले की, नागपूरमध्ये एमएलए हॉस्टेल कोविड सेंटर केले आहे. तुम्हाला एमएलए हॉस्टेल १५ दिवसांपूर्वी, १ महिन्यांपूर्वी दुरुस्त करता आले असते. मुंबईमध्ये सन्माननीय सदसय हॉटेलमध्येच राहतात. नागपूरमध्ये ५०-१०० चांगली हॉटेल्स आहेत. त्यांची तेथे व्यवस्था करता आली असती. तुम्ही विदर्भ, मराठवाडा येथील जनतेकरिता मागच्या २ वर्षांत एकही काम केले नाही. तुम्हाला भीती वाटली. विदर्भ, मराठवाडा येथे जर अधिवेशन झाले असते तर अडीच-तीन लाख लोकांचा मोर्चा सरकारविरुध्द निघाला असता. सरकारने या भीतीने नागपूरला अधिवेशन घेतले नाही. विदर्भ व मराठवाडा येथील जनतेवर २ वर्षांत १ हजार अन्याय केल्यामुळे आज तुम्हाला नागपूरात येण्याची भीती वाटत आहे. त्यामुळे आपण नागपूरमध्ये अधिवेशन घेत नाही असा आमचा समज झाला आहे.

सभापती महोदय, कोरोनाची कारणे बिलकुल नाहीत. नागपूरात कोरोना होता आणि मुंबईत नव्हता का ? माझी आजही सरकारला विनंती आहे की, तुम्ही २ वर्षे विदर्भ, मराठवाडा यांच्यावर अन्याय केला आहे, पण आता तरी किमान पुढील अधिवेशन नागपूरात घेणार की नाही याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या उत्तरामध्ये नमूद झाले पाहिजे. माननीय संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत. उत्तर देणाऱ्यांनी नमूद केले पाहिजे की, नागपूर कराराचा पुन्हा भंग करणार आहे की विदर्भातील जनतेला न्याय देणार आहे की अन्याय करणार आहे,

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

याबाबत सरकारकडून सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, आम्हाला दु:ख होत आहे की, कायदा करुन विदर्भ वैधानिक विकास मंडळ तयार केले, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ तयार केले, उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ तयार केले, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ तयार केले. मग आज तुम्ही कोणत्या कायद्याने, अधिकाराने ही मंडळे बरखास्त केली आहेत ? आज विदर्भ वैधानिक विकास मंडळ नसेल, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ नसेल तर कोण अनुशेष कॅल्क्युलेट करणार आहे, रस्त्यांचा काय अनुशेष झाला आहे, जलससिंचनाचा काय अनुशेष झाला आहे, विजेचा काय अनुशेष झाला आहे हे कोण कॅल्क्युलेट करणार आहे, कोण त्याचा लेखाजोखा तयार करणार आहे, विदर्भ वैधानिक विकास मंडळ नसेल, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ नसेल, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ नसेल तर कोण कशावरुन रस्त्याचा बॅकलोग करणार, कशावरुन बजेटमध्ये भरपाई करणार, तुम्ही अर्थसंकल्प मांडताना कोणत्या विषयावर अर्थसंकल्प मांडणार आहात, तुम्हाला कोणाकडून त्याचे आकडे आले आहेत ? आकडेवारीच योगय आली नाही तर बजेट योग्य होणार नाही आणि बजेटच योग्य झाले नाही तर महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेला, उभ्या राज्याला न्याय मिळणार नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या उत्तरात वैधानिक विकास मंडळे सुरु करणार आहात की नाहीत की त्यांना तुम्ही कायमस्वरुपी बंद केले आहे याची स्पष्टता येथे येत नाही, तरी याची स्पष्टता आली पाहिजे.

सभापती महोदय, मला वाईट वाटत आहे की, जवळपास ७ हजार कोटी रुपयांची अवकाळी पावसाची नुकसानभरपाई अजुनही सरकारकडे प्रलंबित आहे. या बजेटमध्ये ती किती देण्यात येईल किंवा किती येईल हे मला माहीत नाही. आपण सर्व विभागीय आयुक्तांचा विचार केला पाहिजे. कोकण विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभागीय आयुक्त, नागपूर विभागीय आयुक्त अशाप्रकारे सर्व विभागीय आयुक्तांनी मागणी केली आहे. अवकाळी पावसाच्या नुकसानीचे पैसे, घरांचे पैसे ७

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

हजार कोटी रुपये सरकारकडे थकीत आहेत. ते शेतकऱ्याला मिळाले असते, त्यांच्या घरात, खात्यात गेले असते तर आज सरकारने जी हुकूमशाही केली आहे ती झाली नसती. मला वाईट वाटते. मी या खात्याचा मंत्री म्हणून काम केले आहे. आज दुर्भाग्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विजेच्या प्रश्नावर व्हिडिओ काढून आत्महत्या कराव्या लागत आहेत. शेतकरी म्हणत आहे की, वीज कंपनीच्या चुकीच्या निर्णयामुळे मी यापुढे शेतकऱ्याच्या घरात जन्म घेणार नाही, अशी माझी मानसिकता झाली आहे, त्यामुळे मी आत्महत्या करीत आहे, असा व्हिडिओ आला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात यापूर्वी अशी आत्महत्येची लाजीरवाणी घटना कधीही व्हिडिओ काढून घडलेली नाही. पंढरपूरमध्ये अशी घटना घडत आहे.

सभापती महोदय, माननीय ऊर्जामंत्री कारण असे देत आहेत की, मागच्या सरकारच्या चुकीमुळे .... मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, तुम्ही सरकारमध्ये मंत्री होता, तुम्ही मला सांगितले होते की, मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या शेतात जायचे नाही आणि वीज कनेक्शन कापायचे नाही. तुमचा आदेश आम्ही ऐकला आहे. मला आठवते की, सन २०१८ मध्ये नागपूरला माननीय श्री. शरद पवार साहेबांनी हल्लाबोल आंदोलन केले होते. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी मिळून ते आंदोलन केले होते. आपले सरकार होते. त्यावेळी माननीय श्री. शरद पवार साहेबांनी भाषणात सांगितले होते. अजुनही माझ्याकडे त्याची क्लिप आहे. आता लाव रे तो व्हिडिओ असे करता येत नाही. पण तो व्हिडिओ संपूर्ण राज्यात पाठविता येईल. माझ्याकडे तो व्हिडिओ आहे. माननीय श्री. शरद पवार साहेबांनी असे म्हटले होते की, शेतकरी अडचणीत आहे, मराठवाडा, विदर्भ येथील शेतकरी अडचणीत आहे. शेतकऱ्याचे वीज कनेक्शन कापू नका, शेतकऱ्याच्या वीज बिलाची वसुली करु नका, शेतकऱ्याचा शेतसारा वसूल करु नका, शेतकऱ्याचे सिंचनाचे पैसे वसूल करु नका. हल्लाबोल कार्यक्रमामध्ये माननीय श्री. शरद पवार साहेबांनी ८ मिनिटे ऊर्जा खात्यावर भाषण दिले होते. आम्ही त्यांच्या

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

भाषणाचा आदर केला. मी त्यांच्या भाषणाची क्लिप माननीय श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांना दिली. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांनी सभागृहात घोषणा केली की, आम्ही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापणार नाही. मला अभिमान आहे. आपण ५ वर्षांत किती तरी वेळा आम्हाला आदेश दिले. व्यक्तिगतरित्या केबिनमध्ये बोलावून आदेश दिले की, शेतकऱ्यांच्या बाजूने रहावे. आम्ही मागच्या विरोधी पक्षाची, सरकारमधील आमच्या सर्व सहकाऱ्यांची, आमच्या सहकारी पक्षाची प्रत्येक गोष्ट ऐकली.

सभापती महोदय, मला अभिमान आहे की, महाराष्ट्राच्या इतिहासात ४५ लाख शेतकऱ्यांना २८ हजार कोटी रुपयांची वीज दिली. एकाही शेतकऱ्याचे वीज कनेक्शन मागच्या ५ वर्षांत कापले नाही. आमच्या सरकारने ते पाप केले नाही. आम्ही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कधीही कापले नाही. सन २००५ ते सन २०१५ च्या काळात साडे सात लाख शेतकऱ्यांनी डिमांड भरली होती, पण वीज कनेक्शन मिळत नव्हते. त्यांना वीज कनेक्शन देण्याचे काम केले. सन २००५ ते सन २०१५ च्या डिमांड होत्या. आमचे सरकार सन २०१५ मध्ये आले. सन २०१५ ते सन २०१९ च्या काळात साडे सात लाख वीज कनेक्शनच्या अनुशेषाचा कोटा दूर केला. आम्ही शेतकऱ्याला मदत करण्याचे काम केले. माननीय मंत्री श्री. अजित पवर यांनी खाते सोडले तेव्हा १४ हजार कोटी रुपयांची थकबाकी होती. आम्ही सरकार सोडले तेव्हा ४२ हजार कोटी रुपयांची थकबाकी होती. मान्य आहे. पण मला सभागृहाच्या पटलावर सांगायचे आहे की, ४२ हजार कोटी रुपयांची थकबाकी असुनही आपण तीन कंपन्यांची बॅलन्स शीट बोलवावी, तीनही कंपन्या नफ्यामध्ये ठेवण्याचे काम मागच्या माननीय श्री. देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये केले आहे. आता दावा होत आहे की, मागच्या सरकारने पैसे वसूल केले नाहीत म्हणून आम्हाला कनेक्शन कापावे लागत आहेत. मी आजही सांगत आहे की, शेतकऱ्यांना वीज दिल्यामुळे कधीही कंपन्या डबघाईस येत नाहीत. कंपन्या भ्रष्टाचार केल्यामुळे डबघाईस येतात. तुम्ही

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

तीनही कंपन्यांचा भ्रष्टाचार थांबवा. तुम्ही शेतकऱ्यांना वीज देऊन देखील कंपन्या चालवू शकता. शेतकऱ्यांना वीज दिली तर कधीही कंपन्या डुबत नाहीत. तुमच्या कंपन्या भ्रष्टाचारामुळे डुबलेल्या आहेत. आमच्या सरकारच्या काळात ४२ हजार कोटी रुपयांची थकबाकी असुनही या सर्व कंपन्या नफ्यामध्ये होत्या तर मग या सरकारला काय झाले आहे ?

सभापती महोदय, थकबाकीच्या नावाखाली या कंपन्या डबघाईस आल्या. आता या कंपन्यांना वसुली करण्याशिवाय मार्ग नाही असे चालले आहे आणि ही वसुली कशी ते पहावे. किती मुघलशाहीने वागायचे ? एखाद्या शेतकऱ्याने पैसे भ्ंरले नसतील पण १० शेतकऱ्यांनी पैसे भरले तरी त्यांचे कनेक्शन कापायचे का ? कंपन्यांनी शेतकऱ्यांची वीज बिल वसुली का केली नाही याला तेव्हाही कारण होते आणि ते आपल्याला माहीत आहे, त्या काळात असे कारण होते की, विजेच्या बिलाचा ताळमेळ लागत नव्हता, शेतकऱ्यांनी किती वीज वापरली हे पाहण्याकरिता आम्ही आयआयटीची कंपनी तयार केली, आम्ही या संदर्भात त्रयस्थ कंपनीला नेमले.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सभापती महोदय, श्री.प्रताप होगाडे यांनी आमच्या असे लक्षात आणून दिले की, शेतकऱ्यांच्या नावे ज्या वीज बिलांची थकबाकी काढण्यात आली ती खोटी आहे. विजेची चोरी होते व ती शेतकऱ्यांच्या नावे दाखविण्यात येते. शेतकऱ्यांकडून थकबाकी वसूल करण्यात येते. पाच एचपीचा पंप साडेसात एचपीचा दाखविण्यात आला. साडेसात एचपीचा पंप १० एचपीचा दाखविण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांना देण्यात आलेली विजेची सर्व देयके नष्ट करावीत. आयआयटी यांनी असा रिपोर्ट दिला होता की, शेतकऱ्यांच्या नावे चुकीची वीज देयके आली आहेत. शेतकऱ्यांच्या नावे चुकीच्या वीज देयकांची वसुली होत आहे. त्यावेळी माननीय देवेंद्र फडणवीस सरकारने स्टे दिला होता व त्या काळात विजेची कनेक्शन कापण्यात आली नाहीत. या सरकारला मागील पैसे वसूल करण्याचा कोणताही अधिकार नाही. या सरकारची अतिशय वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. हे सरकार शेतकऱ्याच्या मुळावर उठले आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या या सरकारमुळे होत आहेत. मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, मी मागील अधिवेशनाच्या वेळी सभागृहात नव्हतो. विधानसभेमध्ये उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी असे सांगितले होते की, यानंतर शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन आम्ही कापणार नाही. तिसऱ्या दिवशी उर्जामंत्री असे सांगतात की, आम्ही शेतकऱ्यांची वीज कनेक्शन कापू. सरकार असे असते काय ? सरकारची सामुहिक जबाबदारी नाही काय ? उप मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आश्वासन ऊर्जा मंत्री पाळत नाहीत. ऊर्जा मंत्री महोदयांनी दिलेले आश्वासन उप मुख्यमंत्री महोदय पाळात नाहीत. या सरकारमध्ये हा काय प्रकार सुरु आहे. सर्व सहकाऱ्यांना माझे असे सांगणे आहे की, यापुढे महाराष्ट्रात अशी परिस्थिती निर्माण होणार आहे की, महाराष्ट्रातील मंत्र्यांना देखील आंदोलन करावे लागेल. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या उत्तरात याबाबत मंत्री महोदयांनी सविस्तर माहिती दिली पाहिजे. शेतकऱ्यांच्या वीज बिलांचा संपूर्ण हिशोब केल्याशिवाय कोणतेही वीज कनेक्शन कापणार नाही असे सरकारने आश्वासन द्यावे. माझा असा दावा आहे की, शेतकऱ्यांना पाच वर्षे वीज दिली व त्यांचे कनेक्शन कापले नाही तरी या कंपन्या डुबत नाहीत. १.२० रुपये युनिट प्रमाणे असणारी वीज

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

सरकारकडून १.८० रुपये प्रमाणे मिळते. आपण कमी दराची वीज घेऊ शकतो. सोलरची वीज घेऊ शकतो. वीज विकत घेताना पैसे वाचवू शकतो. कोळश्यामध्ये पैसे वाचविता येतात. आमच्या सरकारमध्ये तिन्ही कंपन्या नफ्यात होत्या तर आता महाविकास आघाडी शासनाला काय झाले. या कंपन्या कोणत्या कारणामुळे डबघाईस आल्या ? मंत्री महोदय लोकांना सांगत आहात की, आमच्या वीज कंपन्या डबघाईस आल्या ? महाराष्ट्राचे नाव कशासाठी खराब करीत आहात ? महाराष्ट्र डबघाईस आला असे मंत्री सांगत आहेत. शेतकऱ्यांची वीज कनेक्शन कापणार नाही असे ठोस आश्वासन सरकार देत नाही तोपर्यंत या अधिवेशनाला काहीही अर्थ राहणार नाही. या अधिवेशनाकडे ४५ लक्ष शेतकरी म्हणजे ३ कोटी जनता सरकारच्या आश्वासनाची वाट पाहत आहे. वीज कंपनीचे कर्मचारी ट्रान्सफार्मर घेऊन पळत आहेत, ट्रान्सफार्मवर कापून नेत आहेत. फिडर तोडून नेत आहेत. अनेक मतदारसंघात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मघाशी विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, अत्यंत वाईट पध्दतीचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे.

सभापती महोदय, अभिभाषणात असे नमूद केले आहे की, माझ्या शासनाने एकूण २६३६ मेगावॅट स्थापित क्षमतेचे ३४ जल विद्युत प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. एकूण १६० मेगावॅट क्षमतेचे ३९ लघु जल विद्युत प्रकल्प खाजगीकरणातून कार्यान्वित केले आहेत. माझे शासन म्हणजे डिसेंबर, २०१९ ते आजपर्यंत या कालावधीत या महाविकास आघाडी शासनाने एक मेगावॅट वीज निर्माण केल्याचे दाखवून द्यावे. १९५२ पासून हे प्रकल्प सुरु आहेत. माननीय श्री.शरद पवार यांनी त्यासाठी पुढाकार घेतला, त्यानंतर माननीय श्री.अजित पवार यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर माननीय श्री.सुनील तटकरे यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर माझ्या काळात काही कामे झाली आहेत. त्यामुळे २६३६ मेगावॅट क्षमता स्थापित झाली. आता हे सरकार सांगते की, आमच्या काळात झाले. २६३६ मेगावॅटचा जलविद्युत प्रकल्प स्थापित करुन वीज

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

निर्माण करण्यासाठी २० वर्षे लागतात. माननीय राज्यपाल यांच्या भाषणातून किती खोटी माहिती जनतेला सादर केली जात आहे.

सभापती महोदय, अभिभाषणात असे नमूद केले आहे की, माझ्या शासनाने प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत ९ प्रकल्प पूर्ण केले असून २ लाख ६४ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण केली आहे. बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत १९ प्रकल्प पूर्ण केले आहेत यातून ३ लक्ष ७७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण केली आहे. बळीराजा ही योजना कोणाची आहे या सरकारने या योजनेवर एकतरी पैसा खर्च केला आहे काय ? माननीय श्री.नितीन गडकरी हे केंद्रात जलसंपदा मंत्री असताना ही योजना सुरु केली. राज्यातील जेवढे प्रकल्प बंद होते ते सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने निधी दिला होता. या मध्ये राज्य शासनाचा कोणताही हिस्सा नाही त्यामुळे खोटी माहिती का छापण्यात येत आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात खोटी माहिती हे सरकार का देत आहे. अशा प्रकारे या अभिभाषणात २० खोटी उदाहरणे आहेत. हे मी सर्व सांगणार नाहीत.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, आदिवासी वाडे व पाड्यांपर्यंत इंडस्ट्रीला वीज देण्याचा निर्णय सभागृहात झाला. मी मंत्री असताना सभापती महोदयांनी चार वेळा बैठक घेतली होती. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात विजेचे दर वाढल्यामुळे तेथील कंपन्या बाहेर जात आहेत त्यामुळे त्यांना विजेमध्ये अनुदान देण्यात यावे. १२०० कोटी रुपयांचे अनुदान प्रत्येक वर्षाला उद्योगांना दिले. त्यामुळे त्या कंपन्या तेथेच थांबल्या. दोन वर्षापासून उद्योगाना देण्यात येणारे अनुदान आता बंद करण्यात आले. असा प्रकार दोन वर्षे सुरु ठेवला तर जालन्यापासून कोकणापर्यंतच्या राज्यातील सर्व स्टील इंडस्ट्री महाराष्ट्रातून बाहेर गेल्याशिवाय राहणार नाहीत. इंडस्ट्रीअल अनुदान या शासनाने बंद केले आहे. इंचलकरंजी पासून जालना ते औरंगाबाद येथील हातमाग उद्योगाबाबत सभापती महोदयांनी चार वेळा बैठक घेतली होती. त्या बैठकीत असे सांगण्यात आले होते की,

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

टेक्सटाईल्स इंडस्ट्री अडचणीत आहेत त्याचे अडीच रुपये विजेचे अनुदान कायम ठेवा ते कमी करु नका तर ते वाढवा. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात टेक्सटाईल्स इंडस्ट्रीचे विजेचे अनुदान वाढविण्यात आले. सरकारने त्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा दिला होता. त्यामुळे तेथील सर्व कंपन्या सुरु राहिल्या होत्या. आज सर्व कंपन्या तेथून बाहेर जाण्याच्या मार्गावर आहेत. उद्या इचलकरंजीमध्ये एकही इंडस्ट्री उरणार नाही अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. या अभिभाषणाच्या माध्यमातून माझी सरकारला विनंती आहे की, राज्याच्या हिताचे काही तरी करा. आज १८ महिन्यापासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मंत्रालयात नाहीत. प्रशासनावर कोणाचे नियंत्रण आहे. त्यांची तब्येत खराब आहे त्याबाबत मला जास्त बोलायचे नाही.

सभापती महोदय, मंत्री महोदय काय करीत आहेत. १२ कोटी जनतेसाठी कोण काम करीत आहे. राज्यातील मंत्री पालकमंत्री म्हणून काम करण्यास तयार नाहीत. राज्यातील मंत्री फक्त आपल्या मतदारसंघापुरते काम करीत आहेत. सामुहिक जबाबदारी कोणीच स्वीकारायला तयार नाही. काल मंत्री मंडळाच्या बैठकीचा रिपोर्ट आला. मंत्रिमंडळाच्या बैठकीला फक्त १२ टक्के मंत्री उपस्थिती होते. असे असेल तर या सरकारचा कारभार कसा चालेल. त्यामुळे १२ कोटी जनतेला हे सरकार कसा काय न्याय देणार आहे. सामुहिक जबाबदारी म्हणून काम केले पाहिजे. मंत्रिमंडळाच्या बैठकीतील हजेरीचा रिपोर्ट अतिशय वाईट आहे. देशाला लाजविणारा हा रिपोर्ट आहे. बैठकीला मंत्री उपस्थित राहत नाहीत. मुख्यमंत्री महोदयांची तब्येत खराब असेल तर इतर मंत्री महोदयांनी सांभाळून घ्यायला पाहिजे. पालक मंत्री म्हणून मंत्री काम करीत नाहीत. मतदारसंघापुरते मंत्री काम करीत आहेत. हे राज्याच्या दृष्टीने अतिशय वाईट आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात मंत्रिमंडळाच्या बैठकीला एक मंत्री महोदय एक मिनिट उशिरा आले तर दार बंद होत होते. त्यांना सांगितले जात होते की, पुढील बैठकीला अशी चूक करु नका. सरकार कसे चालवायचे असते याचा विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातील जनतेला वाचविणे हे सरकारचे काम आहे. १२ कोटी जनतेला न्याय देण्याचे काम

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

सभागृहाच्या माध्यमातून झाले पाहिजे. इतकी विनंती करतो, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात १२ मुद्दे खोटे छापण्यात आले आहेत. ते अभिभाषणातून कमी करावे. सरकारने जे खोटे छापून घेतले त्याबाबत मी खेद व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होण्याची संधी मला आपण दिली त्याबाबत मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. एक ते दोन महत्वाचे मुद्दे मी मांडतो. माझ्यापूर्वी अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात सरकारच्या बाजूने व विरोधात बाजू मांडली आहे. विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण मी लक्ष देऊन ऐकले आहे. कोरोनाच्या काळात या सरकारने निव्वळ निष्काळजीपणा केला असे येथे वारंवार सांगण्यात येते ते अतिशय चुकीचे आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी..........

त्यामुळे माझ्या सारख्या कार्यकर्त्याला त्या संदर्भात बोलणे क्रमप्राप्त ठरते. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर अनेक संकट आली, चक्रीवादळ आली, कोरोना महामारीचे संकट आले. गृह, अर्थ, सहकार, सामाजिक न्याय, अन्न व नागरी पुरवठा, जलसंपदा विभाग अशा सर्वच विभागाच्या मंत्र्यांनी राज्यातील जनतेला आधार देण्याचे काम केले. देशाचे पंतप्रमाधान माननीय श्री.नरेंद्र मोदी यांनी सुद्धा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे साहेबांच्या कार्याचे कौतुक केले. एवढेच नाही तर पद्मविभूषण दिवंगत श्रीमती सिंधुताई सपकाळ यांनी स्वत: मुख्यमंत्री महोदयांना फोन करुन "बाळा, राज्यावर एवढे संकट असताना सुद्धा तू राज्याची पालकाप्रमाणे काळजी घतो" असे सांगितले. हा भावनीक संवाद आजही यु-ट्युबवर उपलब्ध आहे. मात्र विरोधी पक्षाकडून सोईचे तेवढे बोलले जाते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी काही चुका निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी अभिभाषणातील मुद्दा क्र.३ वरुन विरोधी पक्षाकडून गोंधळ करण्यात आला आणि नाईलाजास्तव राज्यपाल महोदयांना सभागृहातून बाहेर जावे लागले.

सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकारने माझे कुटुंब माझी जबाबदारी, शिवभोजन थाळी, रिक्षा चालकांना १५०० रुपये मदत किंवा किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत २० लाख १६ हजार मेट्रीक टन विक्रमी धानाची व १ काटी २५ लाख क्विंटल कापसाची खरेदी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या रकमांचे प्रदान केले याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने रत्नागिरी, रायगड व इतर क्षेत्रात आलेल्या तौक्ते चक्रीवादळापासून ते महापुरासारख्या अनेक नैसर्गिक आपत्तींना तेवढ्याच ताकदीने सामोरे जाऊन नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्युमूखी पडलेल्या व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेल्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून १५ हजार कोटी रुपये आणि राज्याच्या अर्थसंकल्पातून अतिरिक्त ५,५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री

श्री.अमोल मिटकरी..........

श्री.अजित पवार साहेबांचे आभार मानतो. विधिमंडळाने मागील अधिवेशनात महिला व बालकांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यासाठी शक्ती विधेयक संमत केले. या कायद्याचा पुढील काळात निश्चितच चांगला परिणाम दिसून येणार आहे.

सभापती महोदय, भीमा-कोरेगांव विकास आराखड्याबाबत सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी चांगला निर्णय घेतलेला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान स्थळाच्या विकास आराखड्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. एवढेच नाही तर गाव तेथे संविधान सभागृह ही महाराष्ट्र शासनाची चांगली योजना आहे. ज्या ठिकाणी फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा परिपाक असेल अशा संविधान सभागृहाची नवीन संकल्पना आपल्या सरकारने आणलेली आहे. माझ्या शासनाने कोविड काळात आशियाई विकास बँकेकडून अर्थसहाय्य मिळालेल्या ५ हजार कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. या योजनेंतर्गत सुमारे १ हजार किलो मीटर लांबीच्या रस्त्यांची दर्जावाढ व काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यास देखील मान्यता देण्यात आली असून त्या अंतर्गत १० हजार कोटी रुपये खर्चातून २ हजार किलो मीटर रस्त्यांची दर्जावाढ करण्यात येणार आहे. कोरोना काळात केंद्र शासनाने खासदारांना विकास कामासाठी एक रुपया सुद्धा निधी दिला नाही. राज्य शासनाने आमदारांच्या स्थानिक विकास निधीत कपात केली नाही. त्यामळे आमदारांना मतदारसंघातील कामे करताना....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, केंद्र शासनाने खासदारांना विकास कामांसाठी निधी दिला नाही. खासदारांना देण्यात येणारा निधी कोविडसाठी वापरण्यात आलेला आहे, हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, वित्तमंत्री महोदयांनी राज्यातील आमदारांच्या स्थानिक विकास निधीमध्ये एक कोटी रुपयांची वाढ केली हे आपण

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी..........

मान्य केले पाहिजे. विकास कामांमध्ये अडचण निर्माण होईल असे काम महाराष्ट्र शासनाकडून झालेले नाही. परवा सादर होणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पात अनेक कामे प्रस्तावित होतील. मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी त्यांच्या भाषणात २७ वेळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा उल्लेख केला. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा मनापासून सन्मान करता याचा आम्हाला अभिमान आहे. परंतु राज्यपाल महोदय अभिभाषणातील तिसऱ्या मुद्यावर का बोलले नाहीत किंवा छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जे अपशब्द उच्चारले त्याबाबत खुलासा का करण्यात येत नाही असे प्रश्न आम्ही विचारतो. परंतु त्यासाठी आम्हालाच टार्गेट केले जाते. आपण सर्वांनी महाविकास आघाडी सरकारकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. मघाशी विरोधी पक्षनेत्यांनी काव्य सादर केले. मी एक काव्य सादर करुन माझ्या भाषणाचा समारोप करणार आहे.

"चिखलातील कमळाला हल्ली चिखल मुक्त व्हावे वाटे,
बाणाविना चैन पडेना मोह सत्तेचा सदा दाटे,
'अटल' काळी कमळाचाही आदर भाव होत असे,
मनामनात घराघरात मनकी बात रोज दिसे,
सत्तेसाठी हल्ली हपापे बघा कशी कमळाबाई,
खुर्चीवर बसण्याची कसली झाली तुला ग घाई ?
मान नाही अन बाणही नाही कशी एकाकी पडली,
हातावरची घड्याळ तुझ्या कमळाला एकटी नडली,
घड्याळ-धनुष्य नाव ऐकता तुझी छाती का फाटे,
बाणाविना चैन पडेना मोह सत्तेचा सदा दाटे,

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी..........

बघू नको स्वप्न सत्तेचे, भविष्यवाणी सोडून दे,
घड्याळ-बाण-पंजा सर्वांशी थोडेतरी जुळवून घे,
संकटकाळी या मातीशी बेईमानी तू करु नको,
मी पुन्हा येईन असे कधी अभिमानाने तू बोलू नको,
उद्धवाचे सरकार असे हे, अजित पर्व नव अवतरले,
विकासाच्या झंझावातामुळे कमळ अख्खे विरधळले"

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काही गोष्टींचा सरकारकडून उल्लेख करण्यात आलेला नाही या गोष्टीचा खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शेतकरी राज्याचा कणा आहे. सन्माननीय सदस्यांनी अभिभाषणाचे समर्थन किंवा खेद व्यक्त करताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. राज्यापालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या निमित्ताने वेगवेगळया विषयांवर चर्चा झालेली आहे. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य गावातून येतात, त्यांची नाळ शेतीशी जोडलेली आहे. शेतकऱ्यांची मुले सभागृहात लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात शेतकऱ्यांच्या अडचणींचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तालुक्यात भूमी अभिलेख कार्यालय आहे. माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. शेतकऱ्यानी तातडीने शेत जमिनीची मोजणी करण्यासाठी अर्ज करुन फी भरलेली असताना देखील दोन-तीन वर्षे मोजणी होत नाही आणि जमिनीची मोजणी झाली तर खुणा टाकण्यासाठी वर्ष-वर्ष कर्मचारी तेथे जात नाहीत. अनेक लोकप्रतिनिधी तालुक्यातील संबंधित अधिकाऱ्यांना फोन करतात. आमच्याकडे कर्मचारी नाहीत असे उत्तर दिले जाते. या निमित्ताने मी महसूल मंत्री महोदयांना विनंती करतो की, राज्यात कर्मचारी कमी असल्यामुळे कॉन्ट्रॅक्ट बेसवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. आता जमीन मोजणीच्या क्षेत्रात अत्याधुनिक सुविधा आलेल्या आहेत. शासनाने कॉन्ट्रॅक्ट बेसवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली तर राज्यातील शेतकऱ्यांना खूप मोठी मदत होईल.

यानंतर श्री.गागरे......

श्री.गोपिचंद पडळकर .....

त्यांचे रोजचे हेलपाटे वाचतील. मोजणी करुन दिल्यावर मी तर असा प्रसंग पाहिला आहे की, आज मोजणी केलीतर १० फूट इकडे शेतकऱ्यांना त्यांची जागा व दिशा दाखवतात. परत त्यांच्यात भांडणे होतात, पुढील शेतकऱ्याने परत अर्ज केला व तो मोजणीला आता तर तिकडचा १० फूट सोडतो व इकडचे २० फूट अशी दिशा दाखवतो. अशा प्रकारे घराघरात, भावकी, गावात मोजणी विषयावर मोठी भांडणे चालू आहेत. त्याबाबत आपण योग्य तो उचित निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, सात बारा उताऱ्यामध्ये अनेक चुका झालेल्या आहेत, आपल्या माध्यमातून दुरुस्ती चालू आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांना मनस्ताप होते. त्यांचा काही दोष नाही. सातबारा उतारा ऑनलाईन प्रक्रिया करीत असताना अशा अनेक गंभीर चुका या प्रक्रियेत झाल्या आहेत, आपण या विषयी लक्ष घालावे. शेवटी शेतकरी वाचला तर देश वाचेल, महाराष्ट्र वाचेल.

सभापती महोदय, या सभागृहात राज्यपाल महोदयांबाबत अनेक स्टेटमेंट केली गेली, मागील अधिवेशनात खालच्या सभागृहात लोकप्रतिनिधी बोलताना तारतम्य बाळगावे अशा पध्दतीची भूमिका मांडली गेली. लोकप्रतिनिधींनी बोलताना तारतम्य बाळगळे गेले पाहिजे या मताचे आम्ही सर्व लोकप्रतिनिधी आहोत. परंतु या लोकप्रतिनिधींनी जनतेसाठी या सभागृहात आणले, तुम्ही सत्ताधारी किंवा विरोधी पक्षात असाल. आपली बांधिलकी महाराष्ट्रातील जनतेबरोबर आहे, परंतु प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार करायचा. प्रत्येक ठिकाणी चुकीच्या लोकांची बाजू घ्यायची. अशी पध्दत चालू आहे, टक्केवारीशिवाय कोणतेही काम करायचे नाही असे होऊ नये याचीसुध्दा लोकप्रतिनिधींनी काळजी घेणे गरजेचे आहे, नाही तर लोका सांगे ब्रम्हज्ञान, आपण कोरडे पाषाण असा ब्रम्हउपदेश देऊन चालणार नाही त्यामुळे स्वत: कृती करावी लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत या सभागृहात चर्चा होते. अभिभाषणावर बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांबाबत अनेक सदस्यांनी मत व्यक्त केले कारण महाराजांचा उल्लेख अभिभाषणात आहे. असे असताना एका पक्षाचा आमदार पायात बुट घालून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयावर चढतो.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर .....

तेव्हा तुम्ही तोंडाला पट्टया लावून गप्प बसता. मग बाकीचे विषय काढून राजकारण केले जाते. या गोष्टीचा सारासार विषय आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, पंढरपूर तालुक्यातील मगरवाडी गावातील सुरज जाधव नावाचा मुलगा होता, त्याने फेसबुक लाईव्ह करुन शेतकऱ्याच्या पोटी जन्माला येणे हे पाप आहे, शेतकरी हा असमर्थ आहे, शेतकऱ्याच्या पोटी परत जन्म नको असे म्हणून औषध प्यायला व स्वत:चे जीवन संपवून घेतले. ही प्रगतशील महाराष्ट्रासाठी शोभणारी गोष्ट नाही मी या गोष्टीचा जाहीर निषेध करतो. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, विजेच्या बाबतीत आपले किती चुकीचे धोरण आहे. आटपाडी मध्ये सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत व आम्ही शेतकरी मोर्चा काढला होता. या मोर्चाद्वारे अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांच्या बिलाबाबत मागणी मांडली. त्यात बिलात मोठया चुका व फरक होता. ५ एचपीला ७.५ एचपीचे बील, ७.५ एचपीला १० एचपीचे बील अशा चुकीच्या पध्दतीने बिले शेतकऱ्यांना दिली गेलेली आहेत. शेतकरी पैसे भरायला तयार आहे, परंतु तुम्ही त्यांना चुकीची बिले देता, त्यांची वीज कनेक्शन तोडत आहात. ज्या डीपीवर ५० कनेक्शन आहेत त्यातील २० लोकांनी पैसे भरलेले असताना सुध्दा तुम्ही पुर्णत: डीपी उतरवून घेता. शेतकऱ्यांनी कर्ज काढून रब्बी पिकाची पेरणी केली आहे, ती पिके आता हातातोंडाला आलेली आहेत, अशा वेळी त्यांच्या शेतातील वीज कनेक्शन कापल्यामुळे आधीच कर्जबाजारी झालेला शेतकरी परत हवालदिल झालेला आहे. म्हणून या सभागृहात सांगतात की, कोणतेही वीज कनेक्शन कट केले जाणार नाही. मागील अधिवेशनानंतर प्रेस कॉन्फरन्स झाली तेव्हा सांगितले की, सर्व शेतकऱ्यांनी वीज बील भरा नाही तर तुमची कनेक्शन कापली जातील अशी दुटप्पी भूमिका घेतली गेली, मी सरकारला सांगू इच्छितो की, या अधिवेशनात महाराष्ट्रातील शेतकऱ्याची वीज कनेक्शन कट केली जाणार नाही, महाराष्ट्रातील गावागावात वीज कंपनीमार्फत कँप भरवले जातील व त्याद्वारे शेतकऱ्यांना आवाहन केले जाईल की, ज्यांची बिले चुकीचे दिलेली आहे, वाढवून दिलेली आहे, ती बिले दुरुस्त करुन दिल्यानंतर तुम्ही

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर .....

ती वीज बीले भरावीत. अशा प्रोग्राम राज्य सरकारने राबवावा. कोणत्याही शेतकऱ्याची वीज कट केली जाणार नाही असे आपल्या माध्यमातून सरकारने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सांगावे अशी मी विनंती करतो व थांबतो.

------------

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर बोलताना खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. राज्यपालांच्या भाषणात दिसून येते की, हे सरकार शेतकऱ्यांना विसरलेले आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत या सरकारची भूमिका सांगते की, आधारभूत किंमतीने धान्य खरेदी केले, आधारभूत किंमतीने केंद्र सरकार पैसे देते, तुम्ही त्यात वेगळे असे काय केलेले आहे. दुसऱ्या बाजूला सुक्ष्म शास्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत २०० कोटीचे अर्थसहाय दिले. त्यात केंद्राचा ६० व राज्याचा ४० टक्के हिस्सा आहे. हे सोडले तर शेतक-यांसाठी या अर्थसंकल्पात काही दिलेले आहे असे मला निश्चितपणे दिसून येत नाही. शेतकरी महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून हरवला आहे का असे या अभिभाषणातून दिसते. राज्यात डिसेंबर महिन्यात अवकाळी पाऊस झाला, गारपीट झाली, मोठी प्रमाणात भाजीपाला, फळबागांचे नुकसान झाले. पण यासाठी अमुक रक्कम शेतकऱ्यांना देत आहोत हे कोठेही दिसले नाही. महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजना तुम्ही राबविली. या कर्जमुक्ती योजनेत जे शेतकरी नियमित कर्ज भरत आहेत त्यांना ५० हजार रुपये देतो म्हणाला होता, त्यासाठी काय करणार आहात हे अभिभाषणात दिसून आले नाही. दुसऱ्या बाजूला देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात महापुरामध्ये राज्यातील शेतकऱ्यांना मदत व पुनवर्सनच्या माध्यमातून द्यावयाच्या भरपाईच्या तुलनेत चार पट भरपाई दिलेली होती. त्यावेळी शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ केले होते. पण आपण शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा निर्णय घेतल्याचे कोठेही दिसत नाही. देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात विकास कामासाठी शासनाने शेतकऱ्यांची जमीन काढून घेतली तर त्याला चार पट नुकसान भरपाई दिली जात होती. ती तुम्ही कमी करुन टाकली. शेतकऱ्यांचे तुम्ही नुकसान केले. दुसरीकडे कोविडमध्ये मोठे काम केल्याचे तुम्ही सांगत आहात. कोविड काळात लोकांना बेड, रेमेडीसिव्हर, ऑक्सीजन, व्हेंटीलेटर मिळत नव्हते. खाजगी दवाखान्यात लाखापासून २० लाखापर्यंत बिले त्यांनी भरली आहेत. तो काळ आठवला तर अंगावर शहारे येतात. एका बाजूला विरोधात ही मंडळी होती. तेव्हा मराठा समाजाविषयी यांच्या मनात मोठा पुळका होता. पण मराठा समाजाला आरक्षण कधी देणार आहे व कसे देणार आहे याचा कृती कार्यक्रम या अभिभाषणात

श्री.सदाभाऊ खोत .....

दिसून येत नाही. ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाबाबत या सरकारची काय भूमिका येथे कोठेही दिसून येत नाही. एका बाजूला राज्यात अडीच हजार शेतकऱ्यांनी या दोन वर्षात आत्महत्या केलेल्या आहेत. याची जरा सुध्दा लाज किंवा शरम या सरकारला वाटायला तयार नाही.

यानंतर श्रीमती नाफडे ......

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.........

एका बाजूला शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. आपल्या लेकरा-बाळांना, घराला सोडून जाताना त्यांच्या मनाला वेदना होत असतील की नाही, याची जाणीव सरकारला नाही. काल परवा जळगाव जिल्हयामध्ये एका शेतकऱ्याने मक्याच्या शेतीच्या आत अफुची लागवड केली होती. का केली त्याने अफुची लागवड ? त्यालाही हे सरकारच कारणीभूत आहे. त्या शेतकऱ्यालाही हे सरकार तुरुंगात टाकायला निघालेले आहेत. सभागृहात गृह राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. यावर सरकार म्हणणार की, अफुची लागवड करायला परवानगी नाही. परंतु एकेकाळी तुमच्याच राज्यात, आपल्याच मंत्रीमंडळातील सहकाऱ्याने सांगितले होते की, आम्ही हर्बल तंबाखू पिकवित आहोत. याकरिता सरकारने यावर असा पंचनामा करावा की, या शेतकऱ्याने अफुची लागवड केलेली नव्हती. आपल्या वक्तव्यामुळे त्या शेतकऱ्याने हर्बल तंबाखूची लागवड केलेली होती. त्या शेतकऱ्याला हे सरकार माफ करणार आहे का ? अशा पध्दतीने शेतकरी खऱ्या अर्थाने ही लागवड का करायला लागला, याचा आपण विचार करायला तयार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी हल्लाबोल मोर्चाबाबत सांगितलेले आहे. हा मोर्चा सर्व महाराष्ट्रात निघाला होता. "विजेचे बिल देणार नाही, कर्जमाफी शंभर टक्के झाली पाहिजे, शेतसारा भरण्यात येणार नाही," असा हा "हल्लाबोल" मोर्चा होता. आता आपले सरकार आल्यावर "गल्ला-बोल" मोर्चा आपला सुरु झालेला आहे. आता त्यातील हल्ला बाजूला पडलेला आहे, आणि "गल्ला बोल" मोर्चा चालू झालेला आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने बघितले तर या अभिभाषणातून महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर, बारा-बलुतेदार, युवक याला काहीही मिळालेले नाही. या सर्वांना केवळ एकच मिळाले, ते म्हणजे "आवताण गावाला आणि वडापाव जेवायला" अशी स्थिती आता राज्याची झालेली आहे. सर्व गावाला आमंत्रण दिले जात आहे, परंतु जेवायला मात्र वडापाव दिला जात आहे. खऱ्या अर्थाने कोणाला मदत मिळालेली नाही. चांगल्या पध्दतीने मदत दिली गेली पाहिजे, ही भावना आज या सरकारमध्ये दिसून येत आहे. दुसऱ्या बाजूला मंत्र्यांच्या बाबतीत बोलायची तर काही सोयच नाही.

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत....

प्रत्येक मंत्री हा त्याच्या मतदारसंघाचा सुभेदार आहे, कोण काय घोषणा करीत आहे, त्याचा काही ताळमेळ लागत नाही.

सभापती महोदय, आज राज्यातील शेतकऱ्यांचे डोळे या अधिवेशनाकडे लागलेले आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये मागील सरकारच्या काळात शेतकऱ्यांची वीज कधीही कापलेली नव्हती. आता ट्रान्सफॉर्मर जळला तरी तो बदलून मिळत नाही. दुसऱ्या बाजूला निम्म्या शेतकऱ्यांनी त्या ट्रान्सफॉर्मरवरील विजेचे बिल भरले तरीदेखील ट्रान्सफॉर्मर जोडला जात नाही. कनेक्शन सर्वत्र कापायचा सपाटा या सरकारने लावलेला आहे. पन्नास हजार कोटी रुपये येणे आहे असे सरकार म्हणत आहे. सरकारने शेतकऱ्यांचे एचपी वाढविलेले आहे. साडेतीन चे पाच, पाचचे साडे सात, साडेसातचे दहा एचपी केलेले आहे. यावरील भार शासनाने वाढविलेला आहे. एका बाजूला शासनाचे जे अनुदान आहे, "१.५६ पैसे, १.८० पैसे "हा अधिभार असेल, संबंधित अनुदान आणि भार वाढवून सरकारकडून दुप्पट पैसे घेतलेले आहेत. शेतकरी कोणत्याही वीज कंपनीचे देणे लागत नाही. वीज कंपन्या या सरकारचे देणे लागत आहेत. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्याला वीज १०० टक्के फुकट मिळाली पाहिजे. एका बाजूला आपण विरोधात असताना राज्यभर मोर्चे काढत होता, आता राज्यातील शेतकरी गावा-गावात आंदोलन करत आहे. जर कोणी आंदोलन करायला लागला तर त्याला तुरुंगात टाकले जात आहे, ही काय आपली दादागिरी आहे का ? हे सरकार हुकुमशहा आहे का, हे सरकार काय हिटलर आहे का ? जरा कुठे शेतकऱ्यांनी आंदोलन केले की, त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांना तुरुंगात टाकण्यात येते. त्यावर असे सांगण्यात येते की, शासनाकडून कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. हाच महाराष्ट्रातील शेतकरी एक दिवस आपल्याला कायदेशीररित्या पायाखाली तुडविल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, सुरज जाधव नावाचा जो शेतकरी तरुण होता, त्याने आत्महत्या केलेली आहे. त्याने असे सांगितलेले आहे की, पुन्हा मला शेतकऱ्याच्या

श्री.सदाभाऊ खोत.....

पोटी जन्माला यायचे नाही. हे सरकार आमचा आवाज ऐकत नाही. अशी भूमिका जर तरणाबांड शेतकऱ्याचा मुलगा मांडत असेल आणि हे सरकार त्याकडे उघडया डोळयाने खऱ्या अर्थाने पाहत असेल तर या सरकारपेक्षा एखादा दरोडेखोर तरी परवडला, निदान तो गरिबाच्या घरावर तरी दरोडा टाकत नाही. सरकारने महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या घरावर दरोडा घातलेला आहे. याकरिता आम्ही या ठिकाणी या सरकारचा निषेध करीत आहे. या महाविकास आघाडी सरकारने या शेतकऱ्याच्या घराची राख रांगोळी केलेली आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून फलक फडकवित घोषणा देत असतात. )

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर आणि सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी सोलापूर जिल्हयातील पंढरपूर येथील सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्याने फेसबुक लाईव्ह करुन विष आत्महत्त्या केलेली आहे, ही घटना सांगितलेली आहे. राईट ऑफ इन्फर्मेशन अंतर्गत मी हा मुद्दा पुढे नेत आहे.

सभापती महोदय, सरकारच्या नाकर्त्या भूमिकेमुळे राज्यातील शेतकरी आज पूर्णपणे हवालदिल झालेला आहे.  सरकार नैसर्गिक आपत्तीमुळे झालेली नुकसान भरपाई देत नाही.  दुसऱ्या बाजूला ऐन हंगामामध्ये शेतकऱ्यांची वीज तोडली जाते. सात-बारा कोरा करु असे आश्वासन देणारे सरकार कर्जमाफी देखील पूर्णपणे देत नाही. या सर्व गोष्टी पाहता आज शेतकरी पूर्णपणे हताश व हवालदिल झालेला आहे. म्हणून मी या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीचा पुनरुच्चार करीत आहे. शासनाने ही बाब गांभीर्याने घ्यावी. याबाबत मी आता अशी मागणी करीत आहे की, परवा दिनांक ०४ मार्च,२०२२ रोजी सोलापूर येथे सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्याचा जो प्रसंग झालेला आहे, त्या बळीराजाने आत्महत्त्येचटोकाचे पाऊल उचललेले आहे. पुन्हा जन्म मिळाला तर शेतकरी म्हणून मिळू नये, अशा प्रकारची भूमिका घेतलेली आहे. " माझे आयुष्य इतकेच होते. मला शेतकरी म्हणून पुन्हा जन्म घ्यायचा नाही.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकवित घोषणा देत वेलमध्ये येतात. )

श्री.प्रवीण दरेकर......

कारण शेतकरी हा असमर्थ आणि दुबळा असतो," असे उद्विग्न उद्‌गार त्याने काढलेले आहेत. या आघाडी सरकारला शेतकऱ्यांची काळजी नाही, असा आरोप सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्याने केलेला आहे. सरकार या ठिकाणी दारुवरील कर दीडशे टक्क्यांनी कमी करीत आहे, परंतु शेतक-यांची वीज बिले मात्र सरकार माफ करीत नाही. सुरज जाधव या शेतकऱ्याचा बळी या महाविकास आघाडी सरकारने घेतलेला आहे. असे असताना शासन दारुचा दंड माफ करत आहे. शेतकऱ्याला मात्र कर्जमाफी दिली जात नाही. आत्महत्त्या केलेल्या सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना तातडीने शासनाने मदत जाहीर करावी. राज्यातील कोणत्याही शेतकऱ्याची वीज थकित बिले म्हणून खंडित करु देऊ नये, ही मी मागणी करीत आहे. मी संसदीय कामकाज मंत्री यांना विनंती करीत आहे की, पीक कर्ज, कर्जमाफी....अडथळा.....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

मी संसदीय कार्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, कर्जमाफी, पीक कर्ज, वीज पुरवठा, शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत सभागृहामध्ये आताच्या आता शासनाने घोषणा करावी.

ॲड अनिल परब : ठीक आहे. सभापती महोदय, शासनाने याबाबत घोषणा करण्याबाबत मान्य केलेले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

सभापती : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------------------

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित घोषणा देत असतात. )

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माझी आपल्या माध्यमातून सरकारला, संसदीय कार्यमंत्री महोदय, राज्याच्या महसूल मंत्री महोदयांनाही माझी विनंती आहे की, सरकार म्हणून आपण जाहीर करावे की, कोणत्याही शेतकऱ्याचे वीज कनेक्शन तोडले जाणार नाही. आताच्या आता ही घोषणा शासनाने करावी. अन्यथा कामकाज चालू दिले जाणार नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

सभापती महोदय, सरकारने याबाबत आताच्या आता कोणत्याही परिस्थीत शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडण्यात येणार नाही, असे जाहीर करावे.

-------------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी. :** सन २०२१-२०२२ च्या पुरवणी विवरणपत्रावर चर्चा

**मा.सभापती :** पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा पहिला दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर आज चर्चा घेण्यात येईल. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहेच. तसेच कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पुरवणी मागण्यांवरील चर्चेस प्रथेप्रमाणे त्या-त्या विभागाच्या संबंधित मा.मंत्री यांनी उत्तर द्यावयाचे आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

**शीर्षक** : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या.

**सभापती :** खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील:-

१) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - जी-६, ओ-२, ओ-१०, ओ-९,

२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एच-७, एच-८

३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - एम-३

४) गृह मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - बी-१०

५) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - आर-१

६) अल्पसंख्याक विकास व औकाफ,कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - झेडए-२

७) ग्रामविकास मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - एल-३

८) शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - ई-२, ई-४

९) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - डी-५, डी-८

१०) सहकार, पणन मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - व्ही-२

११) परिवहन, संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - बी-४

१२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एन-३, एन-४

असुधारित प्रत

**सभापती.......**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकवित व घोषणा देत असतात.)

सन २०२१-२०२२ च्या पूरक मागण्यांवर सभागृहाने विचार केला आहे. अशा गोंधळसदृश्य परिस्थितीत मला सदनाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत आहे.

सभागृहाची बैठक उद्या मंगळवार,दिनांक ०८ मार्च,२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून १९ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक ८ मार्च,२०२२ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

असुधारित